दैनिक "वृत्तमानस" साठी पाठविण्यात येणाऱ्या बातम्या आणि अन्य कार्यालयीन कामासाठी कृपया editorvm22@gmail.com या मेल वर पत्रव्यवहार करावा

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | बुधवार, ३१ जानेवारी २०२४ | वर्ष- २७ | अंक-२२१ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये




इम्रान यांना 10 वर्षांचा तुरुंगवास

पान 8

## अशोक सराफ यांना ‘महाराष्ट्रभूषण’



प्रतिनिधी
मुंबई

ज्येष्ठ मराठी चित्रपट आणि नाट्य अभिनेते अशोक सराफ यांना कला क्षेत्रातील भरीव योगदानासाठी 2023 वर्षांचा मानाचा ‘महाराष्ट्र भूषण’ पुरस्कार जाहीर झाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबत घोषणा केली आहे. मुख्यमंत्र्यांनी अशोक सराफ यांच्याशी बोलून त्यांचं अभिनंदनही केलं आहे. अशोक सराफ यांच्या मराठी चित्रपटसृष्टीतील योगदानासाठी त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. आयत्या घरात घरोबा, एक डाव भुताचा, वजीर, भस्म्या, खरा वारसदार, धुमधडाका, गंमतजंमत, अशी ही बनवाबनवी अशा अनेक चित्रपटांमध्ये त्यांनी दर्जेदार भूमिका साकारल्या आहेत. हम पाच या मालिकेत त्यांनी साकारलेला आनंद माथुर तर आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहे. अशोक सराफ यांनी मराठीसोबतच हिंदी चिंत्रपटांमध्येदेखील खूप चांगल्या भूमिका साकारल्या आहेत. सध्या ते शेंटिमेंटल या चित्रपटात मुख्य भूमिकेत झळकत आहेत.कधी नायक, कधी सहनायक तर कधी खलनायक अशा बहारदार भूमिका अशोक सराफ यांनी साकारल्या. महत्त्वाचं म्हणजे, फक्त अभिनयच नाही तर, त्यांनी अनेक सिनेमांमध्ये गाणीही गाऊन, प्रेक्षकांना सूरमयी अनुभव दिला.

सविस्तर वृत्त पान ३

# ‘मविआ’मध्ये अखेर ‘वंचित’ची एंट्री

## सहा पक्षांचा महाविकास आघाडीत समावेश

प्रतिनिधी
मुंबई

महाराष्ट्रासह देशात लोकसभा निवडणुकीचे वारे वाहत आहेत. या पार्श्वभूमीवर आज विरोधी बाकावरील महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक पार पडली. या बैठकीत लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपासह एनडीए विरोधी रणनिती निश्चित करण्यात आली असून सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे ‘मविआ’मध्ये वंचित बहुजन आघाडीचा अधिकृतपणे समावेश झाला आहे. येणाऱ्या 2 फेब्रुवारी रोजी होत असलेल्या मविआच्या बैठकीत वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर स्वतः सहभागी होणार आहेत.

बैठकीनंतर संजय राऊत म्हणाले की, सकाळपासून प्रदीर्घ चर्चा झाली आहे. आमच्या महाविकास आघाडीमध्ये सीपीएम, सीपीआय, आप, जनता दल युनायटेड, वंचित बहुजन आघाडी, समाजवादी पार्टी या सगळ्यांचा समावेश महाविकास आघाडीत झाला आहे. त्यामुळे आघाडी अधिक मजबूत झालेली आहे. बैठकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) व शिवसेना (ठाकरे गट) हे मविआतील 3 प्रमुख पक्षांचे नेते उपस्थित होते. शिवसेनेकडून खासदार संजय राऊत व विनायक राऊत तर राष्ट्रवादीकडून जयंत पाटील व जितेंद्र आव्हाड तसेच काँग्रेसकडून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात, अशोक चव्हाण व मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांची उपस्थिती होती. पान २ वर

## अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी, 146 विरोधी खासदारांचे निलंबन रद्द

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

सर्वपक्षीय बैठकीत सरकारने सर्व पक्षांना अर्थसंकल्पीय अधिवेशन शांततेत पार पाडण्याचे आवाहन केले. संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान निलंबित करण्यात आलेल्या 146 खासदारांचे निलंबन रद्द करण्यात येणार आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी झालेल्या सर्वपक्षीय बैठकीनंतर केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी मंगळवारी ही घोषणा केली.

मंत्री प्रल्हाद जोशी म्हणाले की, सरकार प्रत्येक मुद्द्यावर चर्चा करण्यास तयार आहे. आम्ही आधीच सांगितले होते की, इंडिया आघाडी फक्त फोटोशूटपुरती आहे. आघाडीचा मृत्यू जवळ आला आहे. ती ब्रेन डेड झाली आहे. काँग्रेसचे खासदार प्रमोद तिवारी यांनी माध्यमांशी बोलताना सर्वपक्षीय बैठकीत राहुल गांधींच्या आसाम दौऱ्यावर झालेला हल्ला आणि राज्य सरकारने घातलेल्या निर्बंधांचा मुद्दा उपस्थित केला. हेमंत सोरेन, लालू प्रसाद यांच्यासह विरोधी पक्षांच्या नेत्यांना लक्ष्य करण्यासाठी सीबीआय आणि ईडीच्या गैरवापराचाही उल्लेख केला.

संसदेत मंगळवारी झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, पीयूष गोयल आणि 30 पक्षांचे 45 नेते उपस्थित होते.

### मंत्र्यांच्या भूमिकेला विरोधी पक्षनेत्यांचे समर्थन

## आम्ही एकत्र लढू, वडेट्टीवारांची भुजबळांना साथ



मुंबई

महाराष्ट्र सरकारमध्ये किती ओबीसी मंत्री आहेत, हे पाहावं लागेल. जे आहेत, ते सत्तेसाठी शेपूट घालून बसले आहेत. परंतु छगन भुजबळ ओबीसी बांधवांच्या हक्कांसाठी भांडत आहेत. आमचा त्यांना पाठिंबा आहे, असं जाहीर करताना आमच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आम्ही एकत्र आहोत, असे विधान विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले.

राज्यातील विविध ओबीसी संघटनांबरोबर मुंबईत विजय वडेट्टीवार यांची बैठक पार पडली. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. वडेट्टीवार म्हणाले, छगन भुजबळ ओबीसी हिताची भूमिका मांडत आहेत. त्यांच्या भूमिकांना आमचा पाठिंबा आहे. इतर नेते सत्तेसाठी शेपूट घालून बसलेले असताना भुजबळ ओबीसी हक्कांसाठी भांडतायत. त्यामुळे बहुजनांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आम्ही एकत्र आहोत. २० तारखेला संभाजीनगरमध्ये होणाऱ्या विराट सभेला आम्ही भुजबळ यांना निमंत्रित केले असल्याचे त्यांनी सांगितले.

## 12 गड-किल्ल्यांचा युनेस्कोकडे नामांकनासाठी प्रस्ताव

प्रतिनिधी
मुंबई

महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूच्या जिंजी किल्ल्याला युनेस्कोच्या २०२४-२५ जागतिक वारसा स्थळांच्या यादीमध्ये नामांकनासाठी केंद्र सरकारने प्रस्ताव पाठविला आहे. याबद्दल आनंद व्यक्त करतानाच या किल्ल्यांना असलेला शौर्य, पराक्रम आणि रयतेच्या कल्याणाचा वारसा आणि ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता, त्यावर अंतिम मोहोरही उमटेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

गेली अनेक शतके ताठ मानेने उभे असलेल्या या किल्ल्यांवर ऐतिहासिक वारशाची मोहोर उमटवण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रातील साल्हेर, शिवनेरी, लोहगड, खांदेरी, रायगड, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग या ११ आणि तामिळनाडूच्या जिंजी किल्ल्यांचा प्रस्ताव युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादी (World Heritage List) मध्ये नामांकनासाठी पाठविण्यात आला आहे. युनेस्कोच्या प्रतिष्ठित व्यासपीठावर महाराष्ट्राला नामांकन ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

## छत्तीसगडध्ये नक्षलवाद्यांचा हल्ला 3 जवान शहीद, 14 जखमी

रायपूर

छत्तीसगडमधील सुकमा-विजापूर जिल्ह्यातील सीमावर्ती भागातील टेकलगुडेम गावातील सीआरपीएफ कॅम्पवर नक्षलवाद्यांनी मोठा हल्ला केला. या हल्ल्यात ३ जवान शहीद झाले, तर १४ जवान जखमी झाले आहेत.

आज ३० जानेवारी रोजी सुकमा पोलीस स्टेशन जगरगुंडा परिसरात नक्षलवादी कारवायांना आळा घालण्यासाठी सुरक्षा शिबिर लावण्यात आले होते. शिबिरानंतर सीआरपीएफचे कोब्रा सैनिक जोनागुडा-अलिगुडा परिसरात शोध मोहीम राबवत होते. यावेळी माओवाद्यांनी जवानांवर गोळीबार केला. सुरक्षा दलांनीही माओवाद्यांच्या गोळीबाराला चोख प्रत्युत्तर दिल्याचे समजते.

# सरकार 25 लाख महिलांना देणार इलेक्शन लॉलीपाप

सुनील ओसवाल
मुंबई

लोकसभा निवडणुकीची घोषणा होण्याअगोदर राज्यातील शिंदे -फडवणीस -अजित पवार सरकारने मतदारांना विशेष करून महिलांना इलेक्शन लॉलीपॉप म्हणून साडी दिली जाणार आहे. महाराष्ट्रातील २४ लाख ८० हजार अंत्योदय रेशन कार्डधारक कुटुंबातील महिलांना शासनाच्या माध्यमातून दरवर्षी प्रत्येकी एक साड़ी भेट म्हणून दिली जाणार आहे. यात मुंबई ,ठाणे आणि पालघर या जिल्ह्यातील सुमारे १ लाख ६३ हजार लाभार्थींचा समावेश असल्याचे सांगण्यात आले.

राज्यात २६ जानेवारीपासून साडीचे वाटप होणार म्हणून सरकारने जाहीर केले होते पण तसे झाले नाही. महिलांवर प्रभाव टाकण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याची चर्चा सुरु आहे. राज्याच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने १० नोव्हेंबर २०२३ रोजी अंत्योदय शिधापत्रिकांवर प्रति शिधापत्रिका एक साडी मोफत देण्याचा निर्णय घेतला होता. आता या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात येत आहे.

पान २ वर

### 355 रु. किंमतीच्या साड्यांचे महाराष्ट्रात होळीपूर्वी होणार वाटप

**३५५ रुपयांची साडी**

शासनाच्या निर्णयानुसार महामंडळ ३५५ रुपयांप्रमाणे साडीची खरेदी करणार आहे. २०२३-२४ या वर्षासाठी महामंडळाच्या माध्यमातून प्रत्येकी ३५५ रुपयांप्रमाणे साडीची खरेदी होणार आहे. तथापि, महामंडळाला हा सारा खर्च राज्य शासनाच्या माध्यमातून पुरवला जाणार आहे.

**दरवर्षी एक साडी**

महिलांना दरवर्षी एक साडी मोफत मिळणार असून, साडीचे वितरण रास्तभाव दुकानदारांच्या माध्यमातूनच केले जाणार आहे. म्हणजेच आता रेशन दुकानांवर फक्त अन्नधान्यच मिळणार नसून, अन्नधान्यासोबतच साडीचेदेखील वितरण होणार आहे.

| जिल्हा | लाभार्थी |
|---|---|
| मुंबई | ४,४५२ |
| ठाणे | ५९,५०५ |
| पालघर | ९८,०६८ |
| रत्नागिरी | ३८,७३० |
| नाशिक | १,७६,५५२ |






२ वृत्तमानस
पालघर, मुंबई
मुंबई, बुधवार, ३१ जानेवारी २०२४

*मुंबई : मरोळ पाईपलाईन, अशोक नगर येथे डीमोलेशन रीकंस्ट्रक्शनच्या अंतर्गत गेली तीन वर्षे तोडलेले शौचालय अदयाप नव्याने उभारलेले नाही नाही. त्यामुळे महिला नागरीक, जेष्ठ नागरीक यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. एक महिना झाला आपल्या अधिकाऱ्याने नारळ वाढवुन उद्घाटन करण्यात आले, पण अदयाप पर्यंत कुठल्याही प्रकारचे काम चालू करण्यात आले नाही. जर आठ दिवसामध्ये शौचालयाचे काम चालू केले नाही तर, बुधवारी ७ फेब्रुवारी रोजी अशोक नगर मधील रहिवाशी आपल्या कार्यालयाबाहेर धरण आंदोलन करतील, याची संपुर्ण जबाबदारी आपलीच राहील,असा इशारा शिवसेना विलेपार्ले विधानसभा प्रमुख ,माजी नगरसेवक सुभाष कांता सावंत यांनी मुंबई महानगरपालिका के विभागाचे उपमुख्य अभियंत्यांना निवेदनाद्वारे दिला आहे.*



## थोडक्यात

### मुख्य जलवाहिनी फुटली; नालासोपारात पाणी टंचाई

**वसई:** मुख्य जलवाहिनी फुटल्यामुळे नालासोपारा पश्चिमेला पाणी टंचाई निर्माण झाली असून,दुरुस्ती पुर्ण झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. नालासोपारा पश्चिमेला गॅस पाईप लाईन टाकण्याचे काम प्रगतीपथकावर आहे.तसेच अनेक संकुलाची कामे,रस्ता उभारणी,रुंदीकरणाची कामे सुरु आहेत. अशा कामातून मंगळवारी पहाटे साडेचार वाजता पालिकेच्या इ प्रभाग कार्यालयासमोरील मुख्य जलवाहिनी फुटली.श्री प्रस्था एम.बी.आर. मधून परीसराला पाणी पुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी फुटल्यामुळे चक्रधरनगर,श्रीप्रस्था परीसर,पाटणकर पार्क,साई नगर,सिध्दीविनायक नगर,श्री प्रस्था चौथा रोड,लक्ष्मीनगर,छेडा नगर,दारुल मामुल,डांगे कॉम्पलेक्स,पांचाळ नगर,सोपारा गाव,समेळ पाडा या विभागातील पाणी पुरवठा बंद झाला आहे. या वाहिनीची दुरुस्ती करण्याचे काम युध्द पातळीवर हाती घेण्यात आले असून काम पुर्ण झाल्यानंतर शहरात टप्प्या टप्प्याने पाणी पुरवठा सुरळीत करण्यात येणार असल्याचे महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने कळवले आहे.

### सहलीसाठी भावाला सोडायला आलेल्या बहिणीचा शाळेच्या बस अपघातात मृत्यू

**नालासोपारा:** शाळेमार्फत आयोजित केलेल्या सहलीत जाणाऱ्या आपल्या भावाला सोडण्यासाठी आलेल्या बहिणीच्या शाळेच्या बसला अपघात झाल्याची दुर्दैवी घटना आज मंगळवार ता. 30 रोजी सकाळी 7 वाजता विरार मध्ये घडली आहे. या अपघातात बहिणीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेने शाळा आणि परिसरात दुःखाचा डोंगर कोसळला असून, शाळेने सहलही रद्द केली आहे. सिद्धी फुटाणे ( वय 19) असे अपघातात मयत झालेल्या बहिणीचे नाव असून, ही 5 वित शिकणाऱ्या भावाला घेऊन सहलीसाठी शाळेत घेऊन आली होती. विरार पूर्वेच्या गोपचरपाडा परिसरात नरसिंह गोविंद वर्तक ( एन जी व्ही) ही शाळा आहे. या शाळेच्या विद्यार्थ्यांची सहल आज मुंबईत जाणार होती. त्यामुळे सिद्धी ही आपल्या भावाला घेऊन शाळेत आली होती. सर्व मुले बसमध्ये बसली आणि पालक आपल्या मुलांना निरोप देण्यासाठी उभे होते. यावेळी शाळेच्या बस चालकाने बस मागे घेत असताना, ती बस बाजूच्या भिंतीला आदळली. यावेळी पाठीमागे उभी असलेल्या सिद्धीलाही त्याचा धक्का लागला आणि बसच्या धडकेत भिंत ही तिच्या अंगावर कोसळल्याने ती गंभीर जखमी झाली होती.जखमी अवस्थेत तिला विरारच्या संजीवनी रुग्णालयात दाखल केले असता तेथे उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.


**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# मराठा आरक्षण सर्वेक्षण; महापालिकेची दमछाक
## नेमलेल्या प्रगणकांचा काम अर्ध्यावरती सोडून पळ; यंत्रणाच तोकडी

**प्रतिनिधी**
■ **वसई**

सध्या राज्यभरात मराठा आरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राज्य शासनाने मराठा आंदोलनानंतर मराठ्यांना ओबिसीतून आरक्षण देत असल्याचा अध्यादेश पारित केला असला तरी त्यावर हरकती व सूचना मागविण्याचे काम सुरू आहे. तसेच राज्यभरात मराठा आरक्षणासाठी सर्वेक्षणाचे काम सुरू आहे. त्यासाठी 31 जानेवारीची मुदत आहे. मात्र वसई -विरार शहर महापालिकेत पालिकेच्या अपुऱ्या यंत्रणेमुळे आजच्या शेवटच्या दिवसापर्यंत सर्वेक्षणाचे काम पूर्ण होऊ शकणार नाही, असे चित्र आहे. 25 लाखांच्या लोकसंख्येत



अद्याप काही लाखही सर्वेक्षणही पूर्ण झाले नसल्याने सर्वेक्षणाचा तिढा वाढला आहे. कमी कालावधित जास्तीत जास्त सर्वेक्षण करताना पालिका कर्मचाऱ्यांची मात्र दमछाक होत आहे.

कमी मुदतीत जास्तीत जास्त सर्वेक्षणाचे काम पूर्ण व्हावे यासाठी वसई- विरार शहर महापालिकेने काही प्रगणक नेमले आहेत. मात्र हे प्रगणक क्लिष्ट सर्वेक्षणाच्या कामामुळे काम अर्धवट टाकून पळ काढत असल्याने पालिकेसमोर मोठे आव्हान आहे. पालिकेच्या कानाकोपऱ्यात तर अद्याप ही यंत्रणाच पोहोचली नसल्याचे चित्र दिसून येते. एका कुटुंबाचे सर्वेक्षण करताना प्रगणकास 20 ते 25 मिनिटे लागतात. त्यामुळे एकाच इमारतीत सर्वेक्षणाचे काम करताना अर्धा दिवस निघून जातो. त्यात 25 लाखांच्या लोकवस्तीतल गजबजलेल्या वसई-विरार शहरात सर्वेक्षणाचे काम करताना प्रगणकांची दमछाक होत आहे. तसेच एकाच इमारतीत खाली वर चढण्याने प्रगणकांची अक्षरश: दमछाक होत असल्याने काही प्रगणक अर्ध्यावरचन काम सोडून पळ काढत आहेत.

काही सोसायट्यांत तर या प्रगणकांस शिरूही दिले जात नसल्याने अद्याप बहुतांश सर्वेक्षणाचे काम रखडले आहे. दि. 23 ते 31 जानेवारी अशी सर्वेक्षणाची मुदत असल्याने कमी कालावधित लाखोंच्या लोकसंख्येचे सर्वेक्षण करण्यासाठी पालिकेकडे आज शेवटचा दिवस शिल्लक आहे. त्यामुळे पालिकेची त्यात पुरती दमछाक होणार आहे. तसेच बहुतांश सर्वेक्षणाचे काम रखडणार असल्याचे चिन्ह आहे.

# महाविकास आघाडीची महत्त्वाची बैठक जव्हार येथे संपन्न




**प्रतिनिधी**
■ **जव्हार**

येणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी तर्फे सर्व कार्यकर्ते एकत्र यावे यासाठी जव्हारच्या यशवंत नगर येथील "घाची" सभागृहामध्ये आज दिनांक ३० जानेवारी २०२४ रोजी ११-३० वाजता च्या दरम्यान बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीला शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख विकास मोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा आमदार सुनील भुसारा, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सेक्रेटरी किरण गहला, इत्यादी प्रमुख नेते उपस्थित होते.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख विकास मोरे यांनी सांगितले की, पालघर जिल्ह्यातून भाजपाला हद्दपार करून भाजपा मुक्त पालघर जिल्हा करूया यासाठी सर्वच महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी कामाला लागलं पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. याला दुजोरा देत आमदार सुनील भुसारा यांनी सांगितले की, विद्यमान सरकारच्या काळात सर्वच शासकीय योजनांचा बोजवारा उडाला आहे. सामान्य माणसाची कामे होत नसल्यामुळे या सरकारच्या विषयी जनतेत चीड निर्माण झाली आहे.

तर भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सेक्रेटरी किरण गहला यांनी सांगितले की, संविधान वाचवण्यासाठी हे हुकुमशाही सरकार उलथून टाकण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन निवडणूक काळामध्ये काम करणे गरजेचे आहे.

या बैठकीला शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रफुल्ल पवार, विक्रमगड विधानसभा समन्वयक विजय अंभिरे, शिवसेना तालुकाप्रमुख श्रावण खरपडे, शहर प्रमुख परेश पटेल, काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बळवंत गावित, तालुका अध्यक्ष संपत पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष संदीप माळी, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे यशवंत घाटाळ, बहुजन विकास आघाडीचे तालुकाध्यक्ष एकनाथ दरोडा, तसेच सर्व पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी व लोकप्रतिनिधी बहुसंख्येने उपस्थित होते.

# स्वस्त दरात फ्लॅट देण्याच्या बहाण्याने 2 कोटींची फसवणूक
## मुख्य आरोपी पकडण्यात गुन्हे शाखेला यश

**प्रतिनिधी**
■ **वसई**

स्वस्त दरात फ्लॅट मिळवून देण्याच्या बहाण्याने नागरिकांची फसवणूक करणा-या मुख्य आरोपीला अटक करण्यात गुन्हे शाखा-३ ला श आले असून,त्याने अशा प्रकार दोन कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे.

पोलीस आयुक्तालय हद्दितील वसई-विरार भागात स्वस्त दरात फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध असल्याची जाहिरात देऊन सामान्य नागरीकांची फसवणूक करणारी टोळी सक्रिय झाली होती.या घटनांची वरिष्ठांनी गांभीर्याने दखल घेवून या टोळीचा छडा लावण्याचे आदेश दिले होते. त्याअनुषंगाने गुन्हे शाखेने तपास केला असता,संतोष ठाकूर यांची राम पाटील (खरे नाव रामसिग देवरा),स्वप्नील हळदणकर,अमोल भोईर,राहुल सिंग (खरे नाव सुरज दुबे) आणि अरविंद दुबे यांनी आपसांत संगणमत करुन फ्लॅट देण्याच्या बहाण्याने ७ लाख ८३ हजार ५०० रुपयांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले.याप्रकरणी अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

रामसिंग जालमसिंग देवरा ला अटक करुन न्यायालयात हजर करण्यात आले असता,२ फेब्रुवारी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर करण्यात आली आहे. ही कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख,उपनिरीक्षक अभिजित टेलर,उमेश भागवत,हवालदार अशोक पाटील,सचिन पेरे, मुकेश तटकरे, सागर चारवकर, मनोज सकपाळ, सचिन पाटील, राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे,प्रविण वानखेडे,गणेश यादव,सागर सोनवणे,संतोष चहाण यांनी केली.

# आडणेच्या डोंगर पोखराची होणार चौकशी

**प्रतिनिधी**
■ **वसई**

विरार पूर्वेतील आडणे या गावाच्या उत्तरेकडील भागात सुरू असलेल्या सर्व खदाणी या अनधिकृत असून स्थानिक महसूल अधिकारी व या गावातील काही लोकप्रतिनिधी या अनधिकृत खदाणीला समर्थन देत असल्याने खदाणमाफिया संपूर्ण गावाला वेठीस धरत आहे. याबाबत जिल्हाधिकारी डॉ.गोविंद बोडके यांच्याकडे तक्रार केली असता त्यांनी या तक्रारीची गंभीर दखल घेत या संपूर्ण प्रकाराची लवकरच जिल्हाधिकारी यांच्याकडून लवकरच चौकशी होणार आहे. आडणे या गावाला स्वत: जिल्हाधिकारी डॉ.गोविंद बोडके हे भेट देणार असल्याचे समजते.

### जिल्हाधिकारी लवकरच देणार भेट

आडणे या गावात एक खदाणमाफियाने गेल्या काही वर्षांपासून आडणे गावाला अक्षरश: वेठीस धरले आहे. येथील ग्रामस्थांना ये-जा करण्यासाठी असलेला रस्ताच अवजड वाहतुकीमुळे खदाणमालकाने खराब केला आहे. त्यामुळे पावसाळयात नागरिकांना येथून त्रासदायक प्रवास करावा लागत आहे. दरम्यान, वसईचे तहसिलदार अविनाश कोष्टी याकडे गांभिर्याने लक्ष देत नसल्याने त्यांच्या कार्यपद्धतीवर संशय व्यक्त होत आहे.

सदर प्रकाराची जिल्हाधिकारी डॉ.गोविंद बोडके यांच्याकडे तक्रार केल्यानंतर त्यांनी याप्रकरणी चौकशी करण्याचे संकेत दिले आहेत. तसेच रात्रीच्यावेळी खदाणमालकाकडून खदाणीत मोठ्या प्रमाणात ब्लास्ट होत असल्याने आडणे गावातील घरांना तडा गेल्या आहेत. याबाबत डोंगर पोखरणाऱ्या उंदरांवर लवकरच जिल्हाधिकारी कारवाई करतील अशी अपेक्षा आहे.

# कादरी सय्यद नसीर यांना ईपीएसमध्ये पदव्युत्तर पदवी



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी (महापारेषण) चे मुख्य अभियंता (पारेषण) कादरी सय्यद नसीर यांनी इलेक्ट्रिकल पावर सिस्टम या विषयात पदव्युत्तर पदवी एम ई (ईपीएस) छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राप्त केली.

या पदवीचा अनिवार्य भाग म्हणून त्यांनी "एस ई पी आय सी कन्वर्टर फेड इंडक्शन मोटर ड्राईव्हसाठी पावर क्वालिटी इंप्रुव्हमेंट" या विषयावर सविस्तर अभ्यास करून आपला प्रकल्प सादर केला. प्रा. डॉ. नितीन जे. फडकुले यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली त्यांनी हा पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यांना विद्युत अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. सुनंदा घाणेगांवकर आणि जीईसीएचे प्राचार्य डॉ. संजय डंभारे यांचेही मार्गदर्शन लाभले.

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी त्यांच्या या यशाबद्दल त्यांना शुभेच्छा दिल्या. कादरी म्हणतात, "माझे यश हे महापारेषणाचे सर्व अधिकारी, सहकारी, मित्र आणि नातेवाईक यांच्या मदतीमुळे शक्य झाले. वय फक्त केवळ आकडा असून ते शिक्षण किंवा ज्ञान मिळविण्यासाठी अडथळा ठरत नाही.

# धारावीतील रावबहाद्दूर मैदानाच्या नूतनीकरणाच्या मागणीसाठी 'मूक धरणे'

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

धारावीतील संत कक्कया मार्गावरील रावबहाद्दूर एन.शिवराज मैदानाचे नुतनीकरण होऊन सहा वर्ष झाली आहेत. सध्या उद्यानाची नासधूस झाली आहे. धारावी नागरिक समिती, वुमेन्स वेल्फेअर फोरम, मुंबई झोपडपट्टी पोलीस पंचायत व हॅप्पीनेस जेष्ठ नागरिक संघ या संघटनांतर्फे पालिकेच्या परिमंडळ २ चे उपायुक्त रमाकांत बिरादार यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन देऊन २५ जानेवारी पर्यंत उद्यानाचे काम चालू करावे अन्यथा आंदोलन केले जाईल असा इशारा दिला होता. पालिका प्रशासनाने काहीही



हालचाल न केल्याने धारावी नागरिक समिती, वुमेन्स वेल्फेअर फोरम, मुंबई झोपडपट्टी पोलीस पंचायत व हॅप्पीनेस जेष्ठ नागरिक संघ या संघटनांतर्फे आज ता. 30 रोजी महात्मा गांधी पुण्यतिथी निमित्त पालिका प्रशासनाचा व लोकप्रतिनिधी यांचा निषेध नोंदवत मौन (मूक) धरणे आंदोलन उद्यानाच्या मुख्य प्रवेशद्वार येथे केले.

सहा वर्षांपूर्वी उद्यानाच्या नुतनीकरणास लाखो रुपये खर्च होऊनही अनेक दिवसांपासून उद्यान उदघाटना विना टाळ लावून ठेवण्यात आले होते. यामुळे स्थानिक रहिवाशी रोष व्यक्त करीत होते. उदघाटना नंतर दोन वर्षातच उद्यानाची दुरवस्था झाली. दिवसरात्र उद्यान उघडेच राहते. त्याचा गैरफायदा घेत कुणीही उद्यानात येऊन साहित्याची नासधूस करत आहे. सुशोभीकरण केलेल्या उद्यानात लहान मुलांसाठी झोपाळे, घसरघुंडी आदी खेळण्या व्यायामाचे साहित्य लावण्यात आले होते. या सर्व साहित्यांची मोडतोड झालेली आहे.

यावेळी जेष्ठ समाजसेवक दिलीप गाडेकर, जेष्ठ पत्रकार संजय शिंदे, शंकर खिल्लारे, गिरीराज शेरखाने, नंदकिशोर नारायणे, अलका साबळे, किरण खंदारे, दुर्गा जाधव आदी सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले होते. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे धारावी तालुका अध्यक्ष उलेश गजकोष, मनसे च्या संध्या डोईफोडे यांनी आंदोलनस्थळी येऊन आंदोलनाला पाठींबा जाहीर केला.

# वडाळा भागातील मैदानात राडारोडा टाकणाऱ्या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून देण्यात आलेल्या तक्रारीनुसार वडाळा येथील मोकळ्या मैदानामध्ये अनधिकृतपणे राडारोडा (डेब्रिज) टाकणाऱ्या पाच जणांविरोधात पोलिसांनी गुन्हा नोंद करत याकामी वापरण्यात आलेले आठ डंपर आणि एक पोकलँड संयंत्र ताब्यात घेतले आहे. संबंधित वाहनाची नोंदणी रद्द करण्याबाबत परिवहन आयुक्तांना लेखी कळविण्याचे निर्देशही अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. सुधाकर शिंदे यांनी दिले आहेत.



स्वच्छ, सुंदर आणि हरित मुंबईसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून व्यापक स्तरावर संपूर्ण स्वच्छता मोहीम (डीप क्लिनिंग ड्राइव्ह) राबविण्यात येत आहे. यासाठी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. इकबाल सिंह चहल, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. सुधाकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वत्र स्वच्छता अभियान सुरू आहे. त्यामध्ये मुंबईतील कानाकोपऱ्यातील रस्ते तसेच अन्य ठिकाणांची स्वच्छता राखण्यासाठी कार्यवाही केली जात आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून स्वच्छता मोहीम राबविण्यासोबतच रस्ते तसेच सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करत प्रदूषणास कारणीभूत ठरणारी व्यक्ती, बांधकाम व्यावसायिक तसेच अन्य संबंधितांविरोधात दंडात्मक तसेच अन्य कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. विविध भागांतील स्वच्छताविषयक कामकाजासाठी प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) जारी करण्यात आली असून पथकांची नेमणूक करत नियमभंग करणाऱ्यांविरोधात कारवाई केली जात आहे.

महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये राडारोडा (डेब्रिज) टाकण्यासाठी नियमानुसार परवानगी घेणे बंधनकारक आहे. तथापि, वडाळा येथील भक्ती पार्क मोनोरेल स्थानकाच्या बाजूला एमएमआरडीएच्या मोकळ्या मैदानामध्ये डंपरच्या साहाय्याने काही व्यक्ती अनधिकृतपणे राडारोडा टाकत होते. पर्यवेक्षक (घनकचरा व्यवस्थापन) शरद जुवाटकर, सहायक अभियंता कैलास वाटेकर, भारत पाटील, पुंडलिक सोहनी आणि बाबा गायकवाड यांच्या पथकाने घटनास्थळी जाऊन कार्यवाही केली. या वेळी त्यांना तिथे राडारोडाने भरलेले चार डंपर, चार रिकामे डंपर आणि एक पोकलँड संयंत्र आढळून आले. त्यानंतर लगेचच त्यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, मेहबुब पटेल (बोनसरी गाव), राजू केसबन नायडू (विजय नगर), रामदास मोनू प्रसाद (कुर्ला), मोहम्मद सलीम इबारत अली (भांडूप), उजैर अहमद मोहम्मद इसहार खान (वडाळा) या वाहनचालकांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पान १ वरुन

# 'मविआ'मध्ये अखेर 'वंचित'ची एंट्री

या बैठकीला वंचित बहुजन आघाडीच्यावतीने देखील प्रतिनिधी सहभागी झाले होते. जागावाटपासंदर्भात या चर्चा झाली. तसेच वंचितचा मविआत समावेश केला जावा, या ठरावावर चर्चा झाली. यासंदर्भात स्वतः प्रकाश आंबेडकर यांनी मविआ मध्ये समावेश झाल्याची अधिकृत घोषणा केली.महाविकास आघाडीची यापूर्वी 25 जानेवारी रोजी बैठक झाली होती. त्यात सीपीआय व सीपीएम नेत्यांशी चर्चा झाली होती. विशेषतः या बैठकीत प्राथमिक जागावाटप निश्चित झाले होते. महाविकास आघाडीत आज झालेला विविध पक्षांचा समावेश ही खूप सकारात्मक राजकीय घटना आहे. या सगळ्या पक्षांच्या प्रमुख नेत्यांची आणि त्यांच्या प्रतिनिधींशी व्यवस्थित चर्चा झालेली आहे. महाविकास आघाडी अधिक मजबुतीने पुढे जात आहे आणि नवीन नवीन मित्र आघाडीला मिळाले आहेत, असे संजय राऊत म्हणाले.

# सरकार 25 लाख महिलांना देणार इलेक्शन लॉलीपाप

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाची नोडल एजन्सी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ साड्यांचे गठ्ठे जिल्ह्यातील अंत्योदय शिधापत्रिकांच्या यादीनुसार प्रत्येक तालुक्यातील रास्तभाव दुकानांच्या नावानुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या तालुकास्तरावरील गोदामात पोहोचविणार आहे. जिल्ह्यात या योजनेची अंमलबजावणी करण्याची तयारी जिल्हा पुरवठा विभागाकडून करण्यात आली आहे. लाभार्थी महिलांना साडीसाठी ई-पॉस मशीनवर अंगठ्याचा ठसा दयावा लागणार आहे. होळीच्या सणापर्यंत म्हणजेच २४ मार्चपर्यंत राज्यभरात साड्यांचे वाटप करण्याचे उद्दिष्ट आहे.



*मुंबई : बुद्धिस्ट कल्चर असोसिएशनचे अध्यक्ष रविभाऊ गरुड यांचा जर्मनीचे भन्तेजी मास्टर हन दिनह यांनी बौद्ध धम्माच्या कार्यासाठी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्यावेळी जर्मनी व नार्वे बौद्ध भंतेजी व उपासक उपस्थित होते*

# ध्वनी व वायू प्रदूषणामुळे भांडुप तुळशेतपाड्यातील लोकांचे आरोग्य धोक्यात

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

भांडुप पश्चिम येथील तुलशेतपाडा व ९० फुटी रोडच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात इमारतीचे बांधकाम सुरू आहे. अनेक विकासक ४०/४० मजल्याच्या इमारती या भागात बांधत आहेत. सुरुवातीला या भागातील सर्वच लोक आनंदी होते कारण" विकास" होत आहे पण हाच विकास आज जीवघेणा झाला आहे.

या भागात सध्या मोठ्या प्रमाणात ध्वनी व वायू प्रदूषण झालेले आहे. या भागातील काही विकासक रात्री दोन /दोन वाजेपर्यंत काम करतात. रात्री १२ ते ३ वाजेपर्यंत बिल्डिंग मटेरियलच्या व तयार मिक्सिंग च्या गाड्या येत असतात त्यामुळे ध्वनी मोठ्या प्रमाणात होत आहे. विभागात वयोवृद्ध आजारी व्यक्ती व बालकांना याचा मोठ्या प्रमाणात दिवसभर त्रास होतो व येथील रहिवाशांना रात्रीची झोपही आवाजामुळे लागत नाही. याबाबत अनेक तक्रारी करूनही मुंबई महानगरपालिका अधिकारी व पोलिस काहीही कारवाई करत नाही.

याबाबत स्थानिक रहिवासी, शिक्षणतज्ञ रमेश खानविलकर यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, ही बाब सत्य आहे. तुळशेतपाडा भागात मोठ्या प्रमाणात ध्वनी व वायू प्रदूषण होत आहे शिवाय या बिल्डर व या भागातील विकासक केंद्र शासन व राज्य शासनाचा बांधकाम व विनाश कचरा नियम २०१६ व हवा प्रदूषण प्रतिबंध व हवा प्रदूषण कायद्याचा भंग करीत आहेत ही बाब अनेक महिन्यांपासून सुरू असून पालिकेचा एस - विभाग, पोलीस, मुंबई महानगरपालिका व प्राधिकरणाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. याबाबत मुख्यमंत्री, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व मुंबई महानगरपालिकेकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. प्रशासनानी तत्काळ कारवाई करावी अन्यथा मोठा जण आंदोलन उभे राहील असा इशारा रमेश खानविलकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलेल्या पत्रात दिला आहे.

### चुक दुरुस्ती

आम्ही दि २८/०१/२०२४ रोजीच्या वृत्तमानस हया दैनिकांत दिलेल्या जाहीर नोटीसीमध्ये मिळकतीच्या वर्णनात पहिला मजला असे वर्णन चुकुन टाकले आहे आता या चुकदुरूस्ती नोटीसनुसार मिळकतीच्या वर्णनात सदनिका क्र ३०५, बी विंग, पहिला मजला, त्याऐवजी सदनिका क्र ३०५, बी विंग, तिसरा मजला, वैभव नगरी को-ऑप हौसिंग सोसायटी, कल्याण शिळ रोड, काटाई, डोंबिवली पूर्व असे वाचाण्यात यावे.

सही / -
**ॲड. श्री. सुयोग गणेश देव**
ऑफिस नं. ४, स्वनंदादीश, गोपाळ नगर लेन नं. १, डोंबिवली पूर्व, जिल्हा ठाणे

### जाहिर नोटीस

याद्वारे संबंधीतांना कळविण्यात येते की, श्री. मंगळ चाण्या कातकरी उर्फ मंगल गोपाल पवार, रा. उसगाव, पो. गणेशपुरी, ता. भिवंडी, जि. पालघर यांची मौजे. पेल्हार, ता. वसई, जि. पालघर येथिल मिळकतीचे क्षेत्र:

| गट नं. हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार |
|---|---|---|
| ३१६/२ | ०.२०.७० | २.६७ |

वरील मिळकत त्यांनी आमच्या अशिलांना विकण्याचे मान्य व कबुल केले आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाही इसमाचा, व्यक्तीचा, कब्जा, गहाण, दान, दावा, वारस, वहीवाट, लिज, भाडेपट्टा व अन्य हक्क हितसंबंध असेल तर तो त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत निमस्वाक्षरी कारांना लेखी खुलासा ए/४, ओमकार बिल्डिंग, मथुरा नगर, टाकी रोड, नालासोपारा पूर्व, ता. वसई, जि. पालघर या त्यांच्या पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह कळवावा अन्यथा तसा हक्क हितसंबंध नाही असे समजुन विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल.

सही/-
ॲड. पुजा दि. पाटील
(खरेदीदाराचे वकिल)

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Political Editor : **Surendra Mulik,** Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Seven**
**Issu - 221**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ राजकीय संपादक : **सुरेंद्र मुळीक,** निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**


**वर्ष- सत्तावीस**
**अंक - २२१**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## मिस सिनियर फॅशन शो ला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुंबई :** कुटुंबाची जबाबदारी सांभाळत स्वकर्तुत्वाने आपले स्वतंत्र क्षेत्र गाजवण्यासाठी महिलांना प्रथमच खुले व्यासपीठ देण्यासाठी त्यांच्या गुणांना पारखण्यासाठी मुंबईत मिस सिनियर फॅशन पेजेंट इंडिया 2024 चे आयोजन करण्यात आले होते. या शो ला विविध राज्यातून , शहरातून महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. यात हजारो महिलांना ऑन लाईन अर्ज केले होते. सीईओ आणि पीच इव्हेंटच्या संस्थापक रेखा देसाई यांनी या शोचे आयोजन केले होते. महिलांची निवड करण्यासाठी या स्पर्धेत एक कोअर कमिटी स्थापित करण्यात आल्याचे रेखा देसाई यांनी सांगितले. या कार्यक्रमाला अभिनेत्री पद्मिनी कोल्हापुरे , लेखक संजय छेल, संचालक शाकीर शेख , समाजसेविका भार्गव पटेल , रिन्नी पटेल , अमित मेहता आदी उपस्थित होते.



# सदाबहार 'अष्टपैलू' अभिनेते अशोक सराफ यांना 'महाराष्ट्रभूषण'




**प्रतिनिधी**
■ मुंबई

आपल्या अष्टपैलू अभिनयाच्या जोरावर अवघ्या सिनेसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना २०२३ चा मानाचा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार जाहीर झाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी यासंबंधीची घोषणा केली. त्यांनी स्वतः अशोक सराफ यांना फोन करून त्यांचे अभिनंदन केले. मराठी सिनेसृष्टीत अशोक सराफ यांचे नाव खूप आदराने घेतले जाते. त्यांचे मराठी रंगभूमीतही महत्त्वपूर्ण योगदान आहे.

अशोक सराफ यांनी केवळ विनोदीच नव्हे तर गंभीर स्वरुपापासून ते खलनायकी प्रवृत्तीपर्यंत विविध छटांचे दर्शन आपल्या अभिनयातून घडवून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सराफ यांचे अभिनंदन करताना म्हटले आहे.

अशोक सराफ यांचा जन्म ४ जून १९४७ रोजी झाला. त्यांनी १९६९ पासून सिनेसृष्टीत काम करण्यास सुरुवात केली. प्रारंभीच्या काळात त्यांनी मराठी चित्रपटांमध्ये काम केले. १९६९ मध्ये त्यांनी जानकी नावाचा चित्रपट केला. त्यानंतर त्यांनी 'दोन्ही घरचा पाहूणा', 'जवळ ये लाजू नको', 'तुमचं आमचं जमलं', 'दीड शहाणे', 'हळदी कुंकू' अशा अनेक चित्रपटामध्ये काम केले.अशोक सराफ यांची मराठी अभिनेत्री रंजना देशमुख यांच्यासोबतची जोडी लोकांना फार आवडली. 'बिनकामाचा नवरा' या चित्रपटामुळे ही जोडी विशेष गाजली. तेव्हापासून अशोक सराफ यांच्या कामाचा आलेख उंचावत गेला. याच काळात त्यांना लोक मामा या नावाने ओळखू लागले. मामांची शैली म्हणजे विनोदी अभिनय. आपल्या विनोदी अभिनयाने ते सर्वांना पोट धरून हसायला लावतात. त्यांनी फक्त चित्रपटच नव्हे तर 'ये छोटी बडी बाते', 'हम पांच' अशा हिंदी मालिकांमध्येही काम केलं. या मालिकाही विनोदी धाटणीच्याच असल्या कारणाने विनोदी अभिनय हा अशोक मामांचा हातखंडाच बनला.

चित्रपट सृष्टीत येण्यापूर्वी अशोक सराफ बँकेत काम करत होते. त्यांना आधीपासूनच अभिनेता व्हायचे होते, पण त्यांनी वडिलांचा शब्द पाळत स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये नोकरी सुरू केली. आणि सोबतच आपला छंद जोपासत थिएटरही करू लागले. इंडस्ट्रीतील स्टार कलाकार म्हणून त्यांनी मोठे नाव कमावले.

### २५० हून अधिक चित्रपटांत काम

*अशोक सराफ यांनी अनेक नाटकांमध्येही काम केले. 'लगीनघाई', 'मनोमिलन', 'संगीत संशय कल्लोळ' ही त्यांची काही गाजलेली नाटके आहेत. अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन पिळगांवकर व महेश कोठारे हे समीकरण आलटून पालटून लोकांच्या समोर यायचे. त्यातल्या त्यात मामा आणि लक्ष्मीकांत बेर्डे यांची मैत्री विशेष फुलली. तेच त्यांच्या अभिनयातही दिसून यायचे. सचिन पिळगावकर तर मामांचे लहान बंधूच बनले. या सर्वांनी मिळून केलेले चित्रपट लोकांना प्रचंड आवडले. 'अशी हि बनवा बनावी', 'आयत्या घरात घरोबा', 'धूम धडाका' असे अनेक चित्रपट त्यांनी केले. अशोक सराफ यांनी 'करण अर्जुन', कोयला, येस बॉस, 'सिंघम' आदी अनेक हिंदी चित्रपटांमध्येही काम केले. अशोक सराफ यांनी मराठी व हिंदी अशा जवळपास 250 चित्रपटांत काम केले. यामुळे मराठी सिनेसृष्टीतील ते 'सम्राट अशोक' म्हणूनही ओळखले जातात. उल्लेखनीय बाब म्हणजे ते जुन्या पिढीच्या अभिनेत्यांसह आजच्या तरुण पिढीच्या अभिनेत्यांसोबतही सहजपणे वावरताना दिसून येतात.*

# मुंबईत स्वच्छतेसाठी पालिका वापरणार इंदूर पॅटर्न

### अधिकारी करणार दोन दिवसीय अभ्यास दौरा

**प्रतिनिधी**
■ मुंबई

मुंबई महानगर अजून स्वच्छ, सुंदर व हरित बनवण्यासाठी आणि देशात प्रथम क्रमांकाचे स्वच्छ शहर बनवण्यासाठी बृहन्मुंबई महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने कंबर कसली आहे. त्यासाठी महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभागातील कनिष्ठ पर्यवेक्षक आणि अभियंता यांच्या इंदूर शहर पाहणी अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले आहे. फेब्रुवारी / मार्च २०२४ मध्ये आयोजित दोन दिवसीय अभ्यास भेटीत घरोघरी १०० टक्के कचरा संकलन, ओला - सुका कचरा वर्गीकरण, वाहतूक नियोजन, कचरा विल्हेवाटीचे सुयोग्य नियोजन तसेच सार्वजनिक स्वच्छता आदींबाबतची माहिती घेतली जाणार आहे.

मुंबईत सरासरी ६ हजार ३०० मेट्रिक टन कचऱ्याची कांजूरमार्ग व देवनार क्षेपणभूमी येथे तर सरासरी ७५० ते ८०० मेट्रिक टन राडारोड्याची देवनार क्षेपणभूमी येथे विल्हेवाट लावण्यात येते. ९४९ सामुदायिक कचरा संकलन केंद्र आणि ४७ सुका कचऱ्याचे वर्गीकरण केंद्र येथे घनकचऱ्याचे संकलन आणि वर्गीकरण केले जाते. मुख्यमंत्री श एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रत्येक परिमंडळातील एका प्रशासकीय विभागात (वॉर्ड) दर आठवड्यात एक दिवस संपूर्ण स्वच्छता मोहीम (डीप क्लीन ड्राईव्ह) राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवित आहेत. महानगरपालिकेने संपूर्ण स्वच्छता मोहीमेसाठी ६१ मुद्यांचा समावेश असलेली प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) निश्चित केली आहे. महानगरपालिका देशातील अग्रगण्य व महत्त्वाची महानगरपालिका असून स्वच्छ, सुंदर, हरित शहर म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेची ओळख आहे. सार्वजनिक स्वच्छतेतही महानगरपालिका अग्रेसर आहे. स्वच्छता अभियानात देशात 'टॉप टेन' मध्ये येण्याची महानगरपालिकेची क्षमता आहे. तयामुळे स्वच्छता अभियानात देशात पहिल्या दहामध्ये अर्थात 'टॉप टेन' मध्ये येण्यासाठी नियोजन करावे, असे निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. सुधाकर शिंदे यांनी दिले आहेत.

# संक्रमण शिबिरांतील भाडेकरू/ रहिवाशांचे होणार बायोमेट्रिक सर्वेक्षण

**प्रतिनिधी**
■ मुंबई

म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील संक्रमण गाळयांमध्ये वास्तव्यास असलेल्या भाडेकरूंचे बायोमेट्रिक सर्वेक्षण करून त्यांच्या वास्तव्याची प्रमाणता निश्चिती करण्याची जबाबदारी शासनाने नुकतीच एका अधिसूचनेद्वारे म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे सोपविली आहे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबिरांतील गाळयांमध्ये वास्तव्यास असलेल्या भाडेकरूंची आधार कार्ड मध्ये नोंद असलेली माहिती तसेच ई-केवायसी अधिप्रमाणन सुविधेचा वापर करून बायोमेट्रिक सर्वेक्षणाच्या आधारे मंडळातर्फे पडताळणी करण्यात येणार आहे. या आधारे संक्रमण शिबिरातील भाडेकरूंच्या वास्तव्याची प्रमाणता अधिकृत किंवा अनधिकृत असल्याची निश्चिती मंडळातर्फे करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागातर्फे यासंदर्भात नुकतीच अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. केंद्र शासनाने सुशासनासाठी आधार अधिप्रमाणन नियम, २०२० अन्वये पडताळणी करण्याच्या उद्देशाने स्वेच्छा तत्वावर सदर जबाबदारी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे सोपविली आहे.

शासनाच्या दि. १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील संक्रमण शिबिरातील अनधिकृत रहिवाशांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने त्यांचे 'अ' 'ब' 'क' प्रमाणे प्रवर्ग करण्यात आले आहेत. 'अ' प्रवर्गात मूळ रहिवासी यांना संक्रमण शिबिरामध्ये स्थानांतरण करण्यात आलेले आहे.

# पालिकेचा सन 2024-25चा अर्थसंकल्प 2 किंवा 3 फेब्रुवारीला

**प्रतिनिधी**
■ मुंबई

मुंबई महानगर पालिकेचा सन २०२४-२५ चा अंदाजित अर्थसंकल्प पालिका आयुक्त व प्रशासक इकबाल सिंग चहल हे गेल्या वर्षी प्रमाणे या वर्षीही शनिवारी ३ फेब्रुवारी रोजी सुट्टीच्या दिवशी सादर करण्याची शक्यता आहे. आयुक्त आपल्या कारकिर्दीतील हा चौथा अर्थ संकल्प असणार आहे. २ फेब्रुवारीलासुध्दा अर्थसंकल्प सादर करता येऊ शकतो का, याचीही चाचपणी पालिका प्रशासन करत आहे. १ फेब्रुवारीला केंद्राचा अर्थसंकल्प सादर होणार असल्याने दुसऱ्याच दिवशी पालिकेचा अर्थसंकल्प सादर करणे शक्य होईल का? त्यामुळेच २ किंवा ३ फेब्रुवारी रोजी अर्थसंकल्प सादर करण्यात येईल असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

पालिकेचा गेल्या वर्षीचा अंदाजित अर्थसंकल्प ५२६१९.०७ कोटी रुपयांचा होता व ६५.३३ कोटी रुपये शिलकीचा होता. तसेच २०२२-२३ या वर्षीच्या अर्थसंकल्पापेक्षा ६६६९.८६ कोटींनी वाढवला होता. व दरवर्षी प्रमाणे गेल्यावर्षीही अंतर्गत निधीतून ५९७० कोटी रुपयांचे कर्ज काढण्यात आले होते. यावर्षीही सरकारच्या निर्देशाने विकास कामे वाढणार असल्याने या वेळचा अर्थसंकल्प वाढलेला व अंतर्गत निधीतून कर्ज काढण्याची वेळ येणारा असणार आहे.अशी शंका आहे.

देशातील स्वच्छ शहरांच्या स्पर्धेत मुंबईची सातत्याने घसरण सुरू झाल्यानंतर पालिकेला जाग आली आहे. मुंबई स्वच्छ आणि सुंदर बनवण्यासाठी नियोजित आराखड्यानुसार कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी या अर्थ संकल्पात भरीव तरतूद करण्यात येणार आहे.मुख्यमंत्री, एकनाथ शिंदे यांच्या निर्देशांनुसार, गेल्यावर्षी ३९७ किमी लांबीच्या रस्त्यांच्या कॉक्रिटीकरणाची कामे हाती घेण्यात आली होती या वर्षीही उर्वरित रस्त्यांसाठी तरतूद असेल. पिंजाळ, गारगाई व दमणगंगा नद्यांचे नदी जोड प्रकल्प राबविण्यात येणार आहे त्यासाठीही तरतूद असेल.मुंबईतील नद्यांचे पुनरुज्जीवन, मंदिरांचा विकास व सुविधा देण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. त्यावरही मोठी तरतूद असण्याची शक्यता आहे. बेस्ट उपक्रम दिवसेंदिवस तुटित जात आहे. जुलै २०१९ मध्ये बसभाडे प्रवासी संख्या वाढवण्यासाठी भडे कमी केल्यामुळे बेस्ट चे उत्पन्न कमी झाले आहे. भाडे वाढविण्याचा निर्णय धोरणात्मक असल्यामुळे जो पर्यंत लोकनियुक्त प्रतिनिधी पालिकेत येत नाही तोपर्यंत बेस्टला भाडेवाढ करणे शक्य नाही त्यामुळे पालिकेला दरवर्षी बेस्ट ला आर्थिक मदत करावी लागते ती यावेळीही करावी लागणार आहे.

### निवडणूकीमुळे यंदाही दरवाढ नसलेला 'संकल्प' असणार

*या वर्षी लोकसभा व राज्य विधानसभा निवडणुका होत आहे. त्यामुळे कोणतीही दरवाढ होण्याची शक्यता कमी आहे. मात्र गेल्यावर्षी प्रमाणे या वर्षीही राज्य सरकारचा वरचष्मा असलेला हा अर्थसंकल्प असेल अशी दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे. गेल्यावर्षी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या निर्देशांचा अंतर्भाव असलेला पण लोकसहभागाचा एक नवीन अभिनव प्रयत्न म्हणून लोकांकडूनही सूचना मागवल्या होत्या पण या सूचनांचा अंतर्भाव अर्थसंकल्पात केलेला दिसला नाही. यावर्षीही मुंबईकरांकडून सूचना मागविण्यात आल्या आहेत. त्याचा काही विचार पालिका प्रशासनाने केला आहे किंवा नाही हे शनिवारी कळेलच. पण या वर्षी ही अर्थसंकल्प गेल्यावर्षी पेक्षा फुगलेला असेल यात शंका नाही.*

# नवी मुंबईतील भोगवटा प्रमाणपत्र, अभिहस्तांतरण प्रलंबित इमारतींसाठी सिडकोतर्फे नवी 'अभय योजना'

### मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर मावेजा रकमेच्या वसुली स्वतंत्रपणे करण्याचा निर्णय

**प्रतिनिधी**
■ मुंबई

नवी मुंबई क्षेत्रातील सिडको अंतर्गतच्या मावेजा रकमेची वसुली प्रलंबित असलेल्या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र,भाडेपट्टा खत, अभिहस्तांतरण देण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. त्यानुसार सिडकोतर्फे अश्या इमारतींसाठी नवी अभय योजना जाहिर करण्यात आली आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी आणि विकासकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.यापूर्वी नवी मुंबई क्षेत्रातील सिडको अंतर्गत येणाऱ्या मावेजा रकमेच्या वसुलीशिवाय इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र/भाडेपट्टा खत/ अभिहस्तांतरण देण्यात आलेले नव्हते.

सिडकोच्या नवीन अभय योजनेनुसार मावेजा रकमेच्या वसुलीशिवाय इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र, भाडेपट्टा खत, अभिहस्तांतरण देण्यात येणार आहे. ही अभय योजना ३१ मार्च २०२४ पर्यंत लागू असणार आहे. तसेच अभय योजनेनुसार यापुढे मावेजा रकमेची वसुली ही भोगवटा प्रमाणपत्र,भाडेपट्टा खत, अभिहस्तांतरणाशी जोडली जाणार नसून या रकमेची वसुली स्वतंत्रपणे करण्यात येणार आहे. सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक भुर्दंड सोसावा न लागता त्यांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्याच्या भूमिकेतून हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे अनेक सर्वसामान्य सदनिकाधारकांना याचा थेट लाभ होणार आहे. त्याचप्रमाणे भूखंड विकासाच्या अधिमूल्यामध्ये सवलत दिल्याने रखडलेले प्रकल्प मार्गी लागण्यासही मदत होणार आहे.

तसेच या अभय योजनेंतर्गत जे विकासक विहीत कालावधीत भूखंडाचा विकास करण्यास असमर्थ ठरले आहेत, अशा विकासकांना ३१ मार्च २०२४ पर्यंत देय होणाऱ्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्काच्या रकमेत ५० टक्के सवलत देण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. या व्यतिरिक्त मावेजा किंमत कमी करण्याबाबतही शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. लहान बंगले व रो-हाउस भूखंडांवर एकापेक्षा जास्त सदनिका बांधण्यात आलेल्या सर्व इमारती नियमित करण्याचे धोरणही शासनातर्फे आखण्यात आले आहे.

हे सर्वसामान्याचे शासन असून जनतेच्या हिताचे निर्णय घेण्याचे आमचे धोरण आहे. या निर्णयामुळे नवी मुंबई क्षेत्रातील नागरिकांना आणि विकासकांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच या परिसराच्या विकासाला गती मिळणार आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी या निर्णयानंतर सांगितले.




*मुंबई काँग्रेस सहकार सेलच्या वतीने विविध पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आली. यावेळी मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड, माजी आमदार मधु चव्हाण,कार्याध्यक्ष धनंजय कुवेस्कर, श्रीनिवास देवरुखकर आणि इतर मान्यवर मंडळी उपस्थित होते.*

## गोवंडीच्या अवैध वीज वितरकाला 14 दिवसांची अतिरिक्त पोलीस कोठडी

**मुंबई:** गौतम नगर, गोवंडी येथे बेकायदेशीर वीज वितरणाचा पुरवठा करताना रंगेहात पकडले गेलेला आरोपी इम्रान तारिक अन्सारी याला १७ जानेवारी २०२४ रोजी फोर्ट येथील सत्र न्यायालयाने चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली होती. त्यानंतर २२ जानेवारी २०२४ रोजी आरोपीला सत्र न्यायालयात हजर केले असता पुन्हा १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली.२३ नोव्हेंबर २०२३ रोजी, गौतम नगर येथे रात्री उशिरा विशेष छापा मारताना, अदानी इलेक्ट्रिसिटीच्या दक्षता पथकाने इम्रानला जीएम लिंक रोड, गोवंडी येथे थेट पुरवठा करणाऱ्या वितरण खांबाना तारा जोडताना रंगेहात पकडले आणि त्याला देवनार पोलिस स्टेशनच्या सुपूर्द केले. भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम-१३५, १३८ आणि १४० अन्वये त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**
**मुदतवाढ सूचना क्र. २**
ई निविदा सूचना क्र. ११६/२०२३-२०२४ (मुंबई) करीता

दिनांक १२/०१/२०२४ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक वृत्तमानस, मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीताच्या ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | निवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती.. ठाणे येथील अतिथी गृहाच्या दैनंदिन कामकाजासाठी कुशल/अर्धकुशल/अकुशल व्यक्तींच्या सेवा पुरविणे. | ₹ २४,५५,९६८.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०२/०२/२०२४ पर्यंत महामंडळाच्या https://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, . याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

जा.क्र./का.अ.(मुख्या)/ I/38564 /2024



**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक**
म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना**

कार्यकारी अभियंता [पश्चिम ] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१ ( दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४३२) म्हाडा व सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांचेकडे नोंदणीकृत पात्र मुंबई उपनगर मधील सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना एकुण ६ कामाकरीता बी - १ ( Item Rate) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर **https://mahatenders.gov.in,** उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | ०१/०२/२०२४ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | ०८/०२/२०२४ दुपारी ६:१५ वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | १२/०२/२०२४ सकाळी १०:३० नंतर | ४ | आर्थिक बोली उघण्याचा दिनांक | १४/०२/२०२४ सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
टिप : २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

CPRO/A/113

सही/-
कार्यकारी अभियंता (प),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था



**एकात्मिक बाल विकास सेवा योजना (नागरी)**
**प्रभादेवी- शिवडी ना. मुंबई शहर मुंबई यांचे मार्फत**
**गरम ताजा आहार पुरवठा करणेसाठी खुल्या स्पर्धात्मक (रेट टेंडर) पद्धतीने शहरी प्रकल्पातील अंगणवाडयांसाठी युनिट निहाय ऑनलाईन ई-निविदा सन 2023-24.**

बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), प्रभादेवी- शिवडी ना. मुंबई शहर या नागरी प्रकल्पातील 29 करणेसाठी अतिरिक्त अंगणवाडी केंद्रातील 3 ते 6 वर्षे वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार (HCM) पुरवटा प्रकल्प क्षेत्रातील स्थानिक व इच्छुक पात्र व अनुभवी महिला स्वयंसहाय्यता बचत गट, महिला मंडळ, महिला संस्था, खाजगी मॅन्युफॅक्चरर्स, पुरवटाधारक व Private Enterpreneurs यांचेकडून Online पद्धतीने खुल्या स्पर्धात्मक (रेट टेंडर) पद्धतीने ई- निविदा मागविण्यात येत आहे.

या निविदेसंदर्भातील बदल, सूचना, शुध्दीपत्रक इ. करिता वेळोवेळी सदर संकेत स्थळास इच्छुक निविदाधारकांनी भेट दयावी. या ई-निविदेसंदर्भातील पूर्व निविदा बैठक दिनांक- 06/02/2024 रोजी सकाळी 2:00 PM वाजता बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), बांद्रा मुंबई, यांचे कार्यालय 117, पहिला मजला, बी. डी. डी. चाळ, वरळी, मुंबई - 400018 या टिकाणी आयोजित करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत
ईश्वर गोयर,
बाल विकास प्रकल्प अधिकारी, (नागरी)
प्रभादेवी- शिवडी ना. मुंबई शहर

डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२३-२४/क्र.५/सी ७३२६



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग, मुंबई.**
**ई निविदा सूचना क्रमांक : ५०/२०२३-२४**

कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, मुंबई हे सा. बां. विभागात नोंदणीकृत / अनुभवी ठेकेदार यांचेकडून कामांच्या ऑन लाईन ई निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना कार्यकारी अभियंता, https://mahapwd.gov.in या संकेत स्थळावर दिनांक २९.०१.२०२४ वेळ दुपारी ०१.०० ते १२.०२.२०२४ वेळ दुपारी ०१.०० पर्यंत ऑन लाईन डाऊनलोड करण्यांकरिता उपलब्ध होतील. तसेच शक्य असल्यास ऑन लाईन ई निविदा कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग, बांधकाम भवन, फट, मुंबई हे दिनांक १३.०२.२०२४ वेळ दुपारी ०२.०० वाजता उघडतील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकारांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टीप : निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारांनी क्लास D व त्यावरील डिजिटल सिगनेचर आणि वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर निविदा संदर्भात सर्व दस्ताऐवज ऑन लाईन सादर करणे करिता स्वतः नाव नोंदणी करून घ्यावी. वरील निविदा सूचनेमध्ये एकूण ५९ कामे समाविष्ठ असू न सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर निविदा सूचना पहावयास मिळेल. कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास नोटीसची प्रत विनामुल्य मिळू शकेल.
**(उपरोक्त काम हे ३ ते १० लाखामधील आहे .)**

जा.क्र. काअ / दमुंविवि/निविदा/ ५६६/२०२४
दि. १९.०१.२०२४
डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२३-२४/क्र.५/सी ७३३३

सही/-
कार्यकारी अभियंता,
दक्षिण मुंबई विद्युत विभाग,
सा. बां. विभाग, मुंबई.



**बैंक ऑफ़ इंडिया**
रिश्तों की जमापूँजी
**बोईसर शाखा**
राजस अपार्टमेंट, बोईसर – पालघर रोड, बोईसर, जिल्हा पालघर – ४०१ ५०१.
दूर क्र.: ०२५२५ – २७२७५८/८०८७६५५३२२, ई – मेल : Boisar.Mumbai North@bankofindia.co.in

संदर्भ क्र. बीएसआर/एडिव्ही/२०२३-२४ दिनांक : ०६.०१.२०२४

**रजि. पोस्ट/ एडी**

प्रती,
**१. श्री. मोहम्मद खयुम शेख (कर्जदार/ गहाणदार)**
**पत्ता :** सदनिका क्र. १०७, पहिला मजला, इमारत क्र. २२, शुभगृह क्लस्टर – ५ सीएचएसएल, गाव – बेतेगाव, बोईसर पूर्व तालुका आणि जिल्हा पालघर, पिन – ४०१५०१
**२. मयत श्रीमती तबस्सुम अरा (कर्जदार/ गहाणदार) त्यांच्या कायदेशीर वारसाद्वारे**
**(i) श्री. मोहम्मद खयुम शेख (श्रीमती तबस्सुम अरा ह्यांचे पती)**
**पत्ता :** सदनिका क्र. १०७, पहिला मजला, इमारत क्र. २२, शुभगृह क्लस्टर – ५ सीएचएसएल,\ गाव – बेतेगाव, बोईसर पूर्व तालुका आणि जिल्हा पालघर, पिन – ४०१५०१
**(ii) श्री. ओवाईश खयुम शेख (श्रीमती तबस्सुम अरा ह्यांचा मुलगा)**
**पत्ता :** सदनिका क्र. १०७, पहिला मजला, इमारत क्र. २२, शुभगृह क्लस्टर – ५ सीएचएसएल, गाव – बेतेगाव, बोईसर पूर्व तालुका आणि जिल्हा पालघर, पिन – ४०१५०१
**(iii) श्री. इरफान खयुम शेख (श्रीमती तबस्सुम अरा ह्यांचा मुलगा)**
**पत्ता :** सदनिका क्र. १०७, पहिला मजला, इमारत क्र. २२, शुभगृह क्लस्टर – ५ सीएचएसएल, गाव – बेतेगाव, बोईसर पूर्व तालुका आणि जिल्हा पालघर, पिन – ४०१५०१

महोदय/ महोदया
**सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना.**

तुम्ही विनंती केल्यानुसार बँकेने त्यांच्या बोईसर शाखा स्टार होम लोन द्वारे एकूण रक्कम रु. ११,८८,०००/- (रुपये अकरा लक्ष अठ्ठयाऐंशी हजार मात्र) ची गृह कर्ज सुविधा संमत केली. आम्ही येथे खाली आमच्याद्वारे संमत करण्यात आलेल्या विविध कर्ज सुविधांचा आणि सदर सूचनेच्या दिनांका अनुसार थकीत देण्याचा तपशील खाली देत आहोत:

| अनु. क्र. | सुविधेचा प्रकार आणि ए/ सी क्र. | संमत रक्कम | थकीत देणी |
|---|---|---|---|
| १. | स्टार होम लोन : ए/ सी क्र.: ००९२७५११००००२८१ | रु. ८,६८,०००.०० | रु. ९,०६,६५०.४६ + एमसीएलआरवर व्याज @ ०.२० २८-०९-२०२३ पासूनच्या मासिक शेषसह सध्याच्या ८.८५% प्र. व. |
| २. | स्टार टॉप अप लोन : ए/ सी क्र.: ००९२६२८१००००००४ | रु. ३,२०,०००.०० | रु. ३,५७,८४१.३५ + व्याज @ १.४५ % बीओआय बीएलआरवरील २८-०९-२०२३ पासून मासिक शेषसह सध्याचे प्र. व. १०.८०% |
| एकूण | | रु. १,८८,०००.०० | रु. १२,६४,४९१.+ २८-०९-२०२३ पासूनचे व्याज |

२. बँकेद्वारे उपरोक्त कर्ज सुविधा खालील संपत्ती/ हमीच्या द्वारे सुरक्षित करण्यात आल्या होत्या. (बँकेकडे प्रभारित असलेल्या मालमत्ता / संपत्तीचा तपशिल)

**मुख्य हमी:**
श्री. मोहम्मद खयुम शेख आणि मयत श्रीमती तबस्सुम अरा मोहम्मद शेख ह्यांच्या मालकीच्या असलेल्या नोंदणीकरण जिल्हा पालघर उप जिल्हा पालघर मधील विक्री योग्य असलेल्या ४६५ चौ. फू. मोजमाप असलेल्या इमारत क्र. एम-२२, शुभगृह क्लस्टर – ५ सीएचएसएल, गाव – बेटेगाव, बोईसर पूर्व तालुका आणि जिल्हा पालघर, पिन ४०१५०१ च्या पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र. १०७ चे समतुल्य गहाण.

**सीमा पुढीलप्रमाणे:**
उत्तरेस : इमारत एम-२३ (एसजी-५)
दक्षिणेस : इमारत एम-२१ (एसजी-५)
पूर्वेस : इमारत एम-१५ (एसजी-५)
पश्चिमेस : इमारत एम-२४ (एसजी-५)

३. तुम्ही, बँकेला नमूद कर्ज सुविधेच्या अंतर्गत देय असलेल्या भरणा करण्यामध्ये कसून केली असल्याने आम्ही तुमच्या खात्याची २८-०९-२०२३ पासून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया द्वारे जारी करण्यात आलेल्या निर्देश / मार्गदर्शक तत्वांच्या आधारे अकार्यक्षम खाते म्हणून वर्गवारी केली आहे.

४. वर नमूद केलेल्या कारणास्तव, आम्ही याद्वारे श्री मोहम्मद खयूम शेख आणि मृत श्रीमती तबस्सुम आरा यांच्या कायदेशीर वारसांना उपरोक्त प्रख्यात कायद्याच्या कलम 13(2) अंतर्गत नोटीस देतो आणि आपणा सर्वांना पैसे देऊन आपली जबाबदारी पूर्ण करण्याचे आवाहन करतो. बँक, रु. २८-०९-२०२३ पासून रु. १२,६४,४९१.८१ + लागू व्याज या सूचनेच्या दिनांकापासूनपासून ६० दिवसांच्या आत तुम्ही परतफेड करेपर्यंत बँकेने केलेले सर्व खर्च, शुल्क आणि खर्च, जे अयशस्वी झाले तर कृपया लक्षात ठेवा की आम्ही तुमच्याकडे असलेल्या अधिकारांचा वापर करून खर्च आणि परिणामांबद्दल पूर्णपणे तुमच्या जोखमीवर राहू. वर नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तेविरुद्ध आर्थिक मालमत्ता आणि सुरक्षा व्याजाची अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ अंतर्गत

५. आम्ही श्री मोहम्मद खयूम शेख आणि मृतकाचे कायदेशीर वारस श्रीमती तबस्सुम आरा यांना वरीलप्रमाणे बँकेला लागू व्याज, सर्व खर्च, शुल्क आणि खर्चासह बँकेला देय देऊन तुमचे दायित्व पूर्ण करण्याचे आवाहन करतो. परतफेड होईपर्यंत आणि सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करेपर्यंत, वर नमूद केलेल्या कालावधीत, कृपया महत्त्वाची नोंद घ्या की सरफेसी कायद्याच्या कलम १३ (८) नुसार, सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्याचा अधिकार तुम्हाला फक्त प्रकाशनाच्या तारखेपर्यंत उपलब्ध असेल. सार्वजनिक लिलावासाठी किंवा सुरक्षित मालमत्तेची भाडेपट्टी, नियुक्ती किंवा विक्रीद्वारे हस्तांतरणासाठी सार्वजनिक किंवा खाजगी करारातून कोटेशन किंवा निविदा आमंत्रित करण्यासाठी सूचना.

६. वर नमूद केलेल्या अधिकाराचा वापर केल्याने प्राप्त झालेली रक्कम, जी प्रथमतः सर्व खर्च, शुल्क आणि खर्च, जे आम्ही आणि/किंवा आनुषंगिक कोणत्याही खर्चाच्या पेमेंटमध्ये लागू केले जाते आणि दुसरे म्हणजे वर नमूद केल्याप्रमाणे बँकेच्या थकबाकीच्या विल्हेवाटीसाठी करारानुसार लागू केले जाते. २८-०९-२०२३ पासून प्रत्यक्ष वसुली झाल्याच्या तारखेपर्यंतचे व्याज आणि पैशाचे अवशेष, जर असेल तर, बँकेची देणी (कर्जदार किंवा गॅरेंटर म्हणून बँकेकडे असलेल्या तुमच्या इतर कोणत्याही देयांसह) पूर्णपणे वसूल झाल्यानंतर, असेल.

७. सुरक्षित मालमत्तेच्या विरूद्ध दिलेल्या अधिकारांच्या वापरादरम्यान प्राप्त झालेल्या रकमेसह जर ही देय रक्कम पूर्णपणे वसूल केली गेली नाही, तर आम्ही कर्ज वसुली न्यायाधिकरणासमोर कायदेशीर/वसुलीची कारवाई दाखल करून तुमच्या आणि तुमच्या इतर मालमत्तेविरुद्ध कारवाई करण्याचा आमचा अधिकार राखून ठेवतो. तुमच्याकडून आनुषंगिक सर्व खर्चासह देय शिल्लक रक्कम वसूल करण्यासाठी न्यायालये.

८. कृपया लक्षात घ्या की उपरोक्त कायद्याच्या उपकलम (१३) नुसार, ही सूचना मिळाल्यानंतर, तुम्हाला वरील सुरक्षित मालमत्तेची विक्री, भाडेपट्टा परवाना, भेटवस्तू, गहाणखत याद्वारे हस्तांतरित करण्यापासून किंवा त्यावर कोणतेही भार टाकण्यापासून प्रतिबंधित केले आहे.

९. ही नोटीस जारी करण्यासाठी अधोस्वाक्षरी केलेले बँकेचे अधिकृत अधिकारी आहेत आणि उपरोक्त कलम १३ अंतर्गत अधिकार वापरतात.

१०. बँकेकडे उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही उपायांचा पूर्वग्रह न ठेवता ही सूचना तुम्हाला संबोधित करण्यात आली आहे हे नमूद करण्याची गरज नाही.

आपले विश्वासू
सही/ -
मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी
(पंकज विश्वकर्मा)

दिनांक : ०६.०१.२०२४

जीवन प्रगतीचा सिद्धांत आहे, स्थिर राहण्याचा नाही.



- पं. जवाहरलाल नेहरू

वृत्तमानस

मुंबई, बुधवार, ३१ जानेवारी २०२४

# नवे शोध शुद्ध असावेत

मानव विकसित होतोय, तो आधुनिक तंत्रज्ञानाची निर्मिती करून आपले जीवन आणखी सुखमय करू पाहतोय. त्यासाठी त्याने अनेक तंत्रज्ञानाचा शोध लावलाय. अजूनही त्याचे शुद्ध वृत्ती थांबेणाशी झालीय. शोध लावण्याची त्याची हाव आणखी वाढतच आहे. असे शोध लावणे यात त्याला स्वतःचा विकास दिसत असला तरी अति शोधाचा परिपाक झाल्यास हीच शोधवृत्ति त्याच्यासाठी हानिकारक ठरणार नाही ना? असा संशय यावा असे त्याचे वागणे दिसू लागले आहे. तो स्वतःच्या भौतिक सुखासाठी नवनव्या तंत्र ज्ञान शोधू लागला असला तरी या तंत्रज्ञानासोबतच तो नवनव्या आजाराची देखील अप्रत्यक्षपणे निर्मिती करू लागला आहे. त्याच्या शोधामुळे नवनवे घातक विषाणू या भूतलावर निर्माण होऊ लागले आहेत. कोरोना आहे असाच प्रकार असावा असा जगाला संशय आहे. आपणच आपल्यासाठी अशा नवनवव्या संकटांना निर्माण करू लागलो आहोत. गेल्या काही वर्षांत अनेक विषाणू आजार वाढले. बदलती जीवनशैली आणि प्रदूषित वातावरण याला कारणीभूत ठरत आहे. चार वर्षांपूर्वी आलेल्या कोरोना नामक महामारीने अनेकांचे सगेसोयरे हिरावून नेले. त्यावर लस आली तरी तोपर्यंत बरीच जीवितहानी झाली होती. काही आजार हे वर्षानुवर्षे कायम आहेत. त्यामध्ये कर्करोग आणि एचआयव्ही म्हणजे एड्सचा समावेश होतो. या दोन्हीवर लस निर्मिती झाली असली तरी या असाध्य रोगांवर अजूनही पूर्णपणे मात करता आलेली नाही, हे मान्य करावे लागेल. यात अल्झायमर या आजाराचासुद्धा समावेश वाढत असल्याने ही चिंतेची बाब ठरत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात आपण प्रगती केली. थेट चंद्रावरसुद्धा यशस्वी स्वारी करण्यात आली. आरोग्य क्षेत्रातसुद्धा आपला देश आता कात टाकत असून, अनेक नवनवीन औषधे आणि लसनिर्मिती करण्यात भारत जगात स्वावलंबी ठरत असून, ही निश्चितच समाधानाची बाब आहे. याचाच एक भाग म्हणजे आणि सर्वांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या अल्झायमर्स आणि कर्करोगावर या वर्षात नवीन उपचारपद्धती भारतात उपलब्ध होण्याची शक्यता असून, त्यामुळे मोठा बदल घडणार आहे. कार-टी पेशी अथवा रोगप्रतिकारक पेशींचा वापर रक्ताच्या कर्करोगावरील उपचारासाठी करण्याची उपचार पद्धती जास्तीत जास्त लोकांना स्वस्तात उपलब्ध होणे आवश्यक आहे. देशात योनीमार्गाच्या मुखाच्या कर्करोगाला प्रतिबंध करण्यासाठी एचपीव्ही लसीकरण कार्यक्रम आखण्यात आला आहे. यासह इतर अनेक उपचार पद्धती या वर्षात क्रांतिकारी बदल घडविणाऱ्या ठरणार आहेत, असे म्हणणे अजिबातच वावगे ठरू नये. चार वर्षांपूर्वी आलेल्या कोरोना महामारी वेळी एमआरएनए लशींना पहिल्यांदा कोरोना परवानगी मिळाली होती. संशोधक या लशींचा वापर कर्करोगावरील उपचारासाठी करण्यावर संशोधन करीत आहेत. मात्र कर्करोगावरील प्रमाण उपचारपद्धती म्हणून त्यांना अद्याप मंजुरी मिळालेली नाही. असे असले तरी सुरुवातीच्या वैद्यकीय चाचण्यांमध्ये त्यांचे चांगले परिणाम हाती आले आहेत. एमआरएनए आधारित लशींचा वापर फुफ्फुस, स्वादुपिंड, त्वचा, चेतापेशी, डोके, मान आणि प्रोस्ट्रेटच्या कर्करोगांवर करण्याच्या सुमारे २५ हून अधिक वैद्यकीय चाचण्या करण्यात आल्या आहेत. या लशींमुळे कर्करोग होण्यापासून बचाव होत नाही. मात्र कर्करोगाच्या पेशींच्या विरोधात लढण्यासाठी प्रतिकारशक्ती मिळते. पुन्हा कर्करोग होण्याचा धोका या उपचारामुळे कमी होण्यास मदत होते, असे तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. विशेष म्हणजे अल्झायमर्सवरील लिकेनमॅब औषधाला मागील वर्षात मंजुरी देण्यात आली आहे. या रोगावर आतापर्यंत कोणतेही औषधोपचार उपलब्ध नव्हते. या रोगाचे मूळ शोधण्याचे काम संशोधक अद्याप करीत आहेत. अल्झायमर्सच्या रुग्णांमध्ये बिटा- अमायलॉइड प्रथिनाचे प्रमाण कमी होत असल्याचे एमआरआय तपासण्यांमध्ये स्पष्ट दिसून येते. हे औषध प्रथिने कमी होण्याची प्रक्रिया रोखते. याचबरोबर एली लिली कंपनीचे डोनॅनमॅब हे औषधही हीच क्रिया करते. मात्र त्याच्या अजूनही वैद्यकीय चाचण्या सुरू आहेत. याचबरोबर सिनॅप्टिक प्लास्टिसिटी (चेतीपेशी समूहांच्या परस्पर संबंधांत सुधारणा करणे), चेतापारेषण रिसेप्टर्स आणि शरीराचा प्रतिकारशक्ती प्रतिसाद या उपचार पद्धतींवर सध्या संशोधन सुरू आहे. तसेच वजन कमी करण्याचे सेमॅग्लुटिड औषध चेतापेशी, प्रतिकारशक्ती प्रतिसाद आणि रक्तवाहिन्यांची स्थिती यात सुधारणा करण्यासाठी वापरता येईल का, यावरही संशोधन सुरू असून त्याला यश मिळू शकते. मागील वर्षी नोबेल पुरस्कार विजेत्या क्रिस्पर तंत्रज्ञानावर आधारित उपचार पद्धतीला मंजुरी मिळाली. सिकल सेल आणि बेटा थलेसेमिया यांच्यावरील उपचारासाठी क्रिस्परचा वापर होत आहे. मात्र या तंत्रज्ञानावर आधारित उपचार पद्धतींची ही केवळ सुरुवात आहे. क्रिस्पर थेरपॅटिक्स कंपनी टाईप-१ मधुमेह, हृदयविकार यावरील उपचारासाठी या तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर काम करीत आहेत. या जनुकीय रचनेत बदल करण्याच्या रचनेतून कर्करोगावरील कार-टी उपचार विकसित केले जाऊ शकतात. सध्या आधुनिक उपचार पद्धतीमध्ये रुग्णाच्या शरीरातील रोगप्रतिकारक पेशी काढून तिच्यावर प्रयोगशाळेत सुधारणा केली जाते. कर्करोगाच्या पेशी ओळखून त्यांना नष्ट करता येईल, अशा प्रकारे ही सुधारणा केली जाते. मात्र ही उपचार पद्धती प्रत्येक रुग्णासाठी स्वतंत्रपणे करावी लागत असल्याने ती खर्चिक आहे. क्रिस्परमुळे वैश्विक कार-टी उपचार पद्धती विकसित होऊ शकते. दरम्यान, आयआयटी मुंबई आणि टाटा मेमोरिअयल रुग्णालयाने विकसित केलेल्या कार-टी पेशी उपचार पद्धतीला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. अनेक रुग्णालयांकडून या पद्धतीचा स्वीकार करण्यात आला आहे. त्यामुळे पुन्हा कर्करोगाचा धोका निर्माण होणाऱ्या रुग्णांमध्ये अधिकाधिक प्रमाणात या पद्धतीने उपचार होताना या वर्षात दिसतील. याचबरोबर इतर देशांच्या तुलनेत भारतात हे उपचार स्वस्त आहेत. मोठ्या रुग्णालयांत हे उपचार घेणाऱ्या रुग्णांचे तपशील १५ वर्षे जतन केले जाणार आहेत. त्यांच्यावर या उपचाराचे कोणते दुष्परिणाम होतात का, हे तपासण्यासाठी हे पाऊल उचलले जाणार असल्याचे स्पष्ट होते. सिरम इन्स्टिट्यूटने मानवी पॅपिलोमा विषाणूविरोधात विकसित केलेली ही लस आहे. लैंगिक संबंधातून पसरणारा हा विषाणू असून, योनीमार्गाचा कर्करोग होण्यास हा मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरतो. ही लस स्वस्त असून, ती लवकरच भारतात उपलब्ध होणार आहे. सरकारकडून लवकरच हे लसीकरण सुरू होणार आहे. हे लसीकरण ९ ते १४ वयोगटातील मुलींमध्ये टप्याटप्प्याने केले जाणार आहे. वैद्यकीय क्षेत्रातील या प्रगतीने भारताचे नाव जागतिक पातळीवर निश्चितच उंचावणार आहे. अर्थात या प्रगतीचा फायदा लोकांसाठी उपकारक ठरणार यात तिळमात्र शंका नाही. पण या सोबतच आपण नवनव्या प्रयोगांमधून आणखीन काही घातक आजार पसरवणारे विषाणू तर तयार करत नाहीत ना याची देखील अतिशय गांभीर्याने काळजी घ्यावी लागणार आहे. लावलेला एक शोध अनेक फायदे घेऊन आलेला दिसत असला तरी त्याच्यासोबत इतर न दिसणाऱ्या कित्येक समस्या देखील असू शकतात. म्हणूनच मानवी कल्याणासाठी नवे शोध लावणे गरजेचे असले तरी मानवी कल्याणासाठी निसर्गाने जे आधीच निर्माण केले आहे त्याची काळजी घेणे आणि त्याचा सन्मान करणेही प्रत्येक मानवाचे आद्य कर्तव्य आहे. त्यात तो कसूर करतो आहे हे मात्र नक्की. त्यामुळे नवनिर्मिती सोबतच निसर्गाने निर्माण केलेल्या गोष्टींचाही समतोल राखणे अत्यावश्यक आहे. अन्यथा असे नवे शोधच आपल्यासाठी विनाशकाली विपरीत बुद्धी तर ठरणार नाही ना? या प्रश्नाचे उत्तर शोधावे लागणार आहे.

# हळदी कुंकू समारंभ - स्त्री प्रबोधनाचे व्यासपीठ व्हावे !

यावर्षी मकरसंक्रांत ते रथसप्तमी असा सुमारे १ महिन्याचा कालावधी आल्याने सार्वजनिक हळदी कुंकू साजरा करणाऱ्यांसाठी बराच अवधी मिळाला आहे. यावर्षी लोकसभा निवडणूकाही असल्याने महिला मतदारांची मते आपल्याकडे वळवण्यासाठी समस्त पक्ष कामाला लागले आहेत. त्यासाठी हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करून मोठमोठे इव्हेन्ट भरवले जात आहेत. पक्षाचे नियोजित उमेदवार या इव्हेंटचा सारा खर्च उचलत आहेत. भावी उमेदवाराच्या छायाचित्रासह पक्षाचे चिन्ह असलेले लेबल लावून वाण म्हणून महिलांना भेटवस्तू दिल्या जात आहेत. सार्वजनिक मंडळे, सामाजिक संस्था यांच्या वतीनेही दरवर्षीप्रमाणे हळदी कुंकू कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. आयोजकांकडून स्त्रियांच्या मनोरंजनासाठी गाण्यांच्या भेंड्या, संगीत खुर्ची, नाव घेण्याच्या स्पर्धा, होम मिनिस्टर यांसारखे खेळ ठेवले जात आहेत. रोजच्या दगदगीतून विरंगुळा म्हणून यासर्व गोष्टी ठीक वाटत असल्या तरी यातून मनोरंजनाखेरीज अन्य काहीच साध्य होत नाही हेही खरे.



सध्याची सामाजिक स्थिती पाहता स्त्रियांवरील अत्याचाराचा आलेख दिवसागणिक चढतो आहे. ६ महिन्याच्या कोवळ्या बालिकेपासून ८० वर्षाच्या वयोवृद्धाही वासनांधांच्या बाली पडत आहेत. मुलींच्या हाती आलेले स्मार्ट फोन्स आणि त्यामध्ये मिळणारा अमर्यादित इंटरनेट पॅक यांचा सदुपयोग पेक्षा दुरुपयोग अधिक होऊ लागला आहे. हल्लीचे चित्रपट आणि वेब सिरीज यांमध्ये खुलेआम दाखवली जाणारी अतिरंजित प्रणयदृश्ये, अनैतिक संबंधांना खतपाणी घालणारे कथानक, यांतील अभिनेत्रीचा तोकड्या कपड्यांतील मुक्त वावर, स्टाईल स्टेटमेंट म्हणून अभिनेत्रींकडून सहजपणे केले जाणारे मद्यपान आणि धूम्रपान, रात्री अपरात्री बार आणि पबमध्ये थिरकणे, एका बॉयफ्रेंडशी ब्रेकअप करून दुसरा बॉयफ्रेंड पकडणे, विवाहाआधी शारीरिक संबंध ठेवणे, पदोपदी शिव्यांचा स्वैर वापर या सर्वांचा परिणाम हल्लीच्या पिढीतील मुलींवर पडू लागला आहे. या सर्व गोष्टीप्रतीचे आकर्षण मुलींमध्ये वाढू लागले आहे. चित्रपटांतील अशा दृश्यांवर आणि प्रसंगांवर सेन्सॉर बोर्ड कात्री न लावता 'अ'प्रमाणपत्र(प्रौढांसाठी) देऊन आपली जबाबदारी झटकते आहे. वेब सीरिज तर सेन्सॉर बोर्डाच्या अखत्यारीतच येत नाही त्यामुळे आपल्या घरच्या मुलींना या सर्वांपासून दूर ठेवण्यासाठी त्यांच्यावर पुरेसा धाक ठेवणे आज पालकांचे कर्तव्य बनले आहे. पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे सध्याच्या मुली भारतीय संस्कृतीपासून दुरावू लागल्या आहेत. कपाळावर कुंकू किंवा टिकली लावणे, मनगटांत बांगड्या घालणे ओल्ड फॅशन वाटू लागले आहे. हल्ली तर गळ्यातले मंगळसूत्र हातात बांधण्याची फॅशन हळूहळू जोर धरू लागली आहे.

आजमितीला वासनांधांच्या वखवखलेल्या नजरा चोहोबाजूंनी फिरत आहेत, हिंदूंचा वंशविच्छेद करू पाहणारे लव्ह जिहाद सारखे संकट प्रत्येक क्षेत्रात सावज शोधत आहे. अशावेळी स्त्रीशक्तीचा केवळ मनोरंजनामध्ये अपव्यय करण्याऐवजी स्त्रियांना सर्वार्थाने सक्षम होण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या कार्यक्रमाचे हळदी कुंकू समारंभाच्या निमित्ताने आयोजन करणे काळाची गरज बनली आहे. हळदी कुंकू हा जसा स्त्रियांच्या संघटनशक्तीचा कार्यक्रम आहे तसा स्त्रीमधील शक्तीच्या पूजनाचा धार्मिक कार्यक्रमही आहे. स्त्रीच्या भ्रूमध्यावर हळद कुंकू लावणे म्हणजे स्त्रीमधील आदिशक्तीचे पूजन करणे. त्यामुळे या धार्मिक कार्यक्रमांमध्ये हिंदू धर्माची आणि प्राचीन अशा भारतीय संस्कृतीची महती सांगणारी व्याख्याने, धार्मिक कृतींचे महत्व सांगणारी प्रवचने आणि संकटकाळात स्वतःचे रक्षण करण्यास समर्थ बनण्यास शिकविणारी स्वसंरक्षण प्रशिक्षणाची प्रात्यक्षिके यांसारख्या उपयुक्त कार्यक्रमाचे आयोजन करायला हवे, पाश्चात्य संस्कृतीच्या आहारी गेल्यामुळे स्त्रियांचे होणारे नुकसान, भोगवादाचे दुष्परिणाम, भारतीय इतिहासात अजराममर झालेल्या पराक्रमी स्त्रियांची चरित्रे यांविषयी माहिती देणारी व्याख्याने यानिमित्ताने आयोजित केली जावीत.

छत्रपती शिवाजी राजे पुन्हा जन्माला यावेत असे प्रत्येकाला वाटते, मात्र शिवाजी महाराज जन्माला येण्याआधी समर्थ अशा जिजाऊ जन्माला येणे आवश्यक आहेत. यासाठी प्रत्येक स्त्रीने जिजाऊंचा आदर्श घेणे आणि त्यांचा वारसा पुढच्या पिढीकडे सोपावणेही तितकेच गरजेचे आहे. स्त्री ही साऱ्या कुटुंबाची जननी असते त्यामुळे त्या स्त्रीमध्ये जसे संस्कार असतील, तसेच ते पुढे निपजतील यासाठी स्त्रीने आपले दायित्व समजून घेऊन आपल्या पाल्यांवर तसे संस्कार करणे गरजेचे आहेत. हळदी कुंकू समारंभ अशा विचारांची देवाणघेवाण करणारे एक चांगले व्यासपीठ आहे त्याचा केवळ मनोरंजनासाठी अपव्यय होऊ नये.

- मोक्षदा घाणेकर,
काळाचौकी, मुंबई

# महिला वर्गाच्या उन्नतीसाठी असणारा राष्ट्रीय महिला आयोग

महिलांच्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी व त्यांच्या उन्नतीसाठी केंद्र सरकारने १९९० च्या राष्टीय कायद्याद्वारे या आयोगाची स्थापना केली आहे ही स्थापना १९९२ साली ३१ जानेवारी या दिवशी झाली या महिला राष्ट्रीय आयोगाची रचना अशी आहे . त्यात पाच सदस्य व एका अध्यक्ष असे असतात एकूणच महिलांविषयी आस्था व केलेले कार्य याच्या आधारावर नेमणूक केली जाते . या मध्ये एक सदस्य अनुसूचित जाती व एक सदस्य अनुसूचित जमातीचा असतो . या आयोगाचे कार्यालय नवी दिल्ली येथे आहे . या आयोगाच्या पहिल्या अध्यक्ष म्हणून जयंती पटनाईक यांना हा मान मिळाला होता. राष्ट्रीय महिला आयोग ही भारत सरकारची एक वैधानिक संस्था आहे .स्त्रियांना प्रभावित करण्याऱ्या सर्व धोरणात्मक बाबींवर सरकारला सल्ला देण्याचे काम हा आयोग करतो

हा आयोग अनेक बाबतीत महिला संदर्भात काम करतो .देशात ठिकठिकाणी अनेक वर्क शॉप, आर्थिक शक्तीकरण , विशेष कमिटी स्थापना, लैगिक जागरूकता, स्त्री भ्रूण हत्या, महिला हिंसा, या बाबतीत महिलांमध्ये जागरूकता निर्माण केली जाते.हा आयोग केंद्रा च्या कायदेमंडळाला शिफारस करतो व गाऱ्हाणी कशी दूर करता येतील हे पाहतो वारंवार निधी व सैवैधानिक सुरक्षा उपायांचा आढावा सुद्धा घेतला जातो या आयोगातर्फे दरमहा राष्ट्र महिला वृतपत्रिका हिंदी व इंग्रजी भाषेत काढली जाते ह्या आयोगाने बलात्कारपीडित महिलांना मदत व पुर्नवसनासाठी महत्वाची भूमिका बजाविली आहे परित्यक्ता महिलांना कायदेशीर मदत पुरविली आहे . नोकरीच्या ठिकाणी असणारे महिलांचे प्रतिनिधित्व, श्रमासाठी महिलांचे होणारे शोषण, तसेच पोलिसांकडून होणारे अत्याचार व वाईट वागणूक या संबधी सुद्धा महत्व पूर्ण भूमिका निभावली आहे एनआरआय भारतीयांकडून पत्नीवर होणारे जुलूम व फसवणूक या बाबतीत सुद्धा आयोग काम करतो.

या आयोगाचे अध्यक्ष म्हणून अनेक महिलांनी आपली भूमिका बजाविली आहे . त्यामध्ये जयंती पटनाईक व्ही मोहिनी गिरी, विभा पार्थसारथी, पौर्णिमा अडवाणी, गिरीजा व्यास, ममता शर्मा, ललिता कुमारमंगलम, रेखा शर्मा ह्याच्या समावेश आहे

- शांताराम वाघ पुणे

## पत्र मानस

### आता देशातील काही शहरे भिकारीमुक्त होणार ?

आपणास अनेक शहरात देवालयाजवळ तसेच अनेक चौका चौकात भिकारी दिसतात. हे भिकारी धडधाकट सुद्धा असतात काही महिलांच्या जवळ एखादे लहान ,मुल सुद्धा असते .भीक मागून ते आपला उदर्निवाह करतात .काही जण प्लस्टिक च्या पिशव्या सुद्धा विकतात .तर काही लहान मुले कार चे आरसे स्वच्छ करून पैसे मिळवितात .अनेक नामवंत देवालयाच्या परिसरात भिकाऱ्यांनी आपले ठाण मांडलेले आहे .अयोध्या, त्रिनबकेश्वर तिरुअनंतपुरम इत्यादी सुमारे तीस शहरात भीक मागण्यास बंदी करण्याचा केंद्र सरकार विचार करीत आहे .ही बातमी नुकतीच वाचण्यात आली .या शहरात भीक मागणाऱ्या महिला व मुले यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे .सरकारने या शहराचे सर्वेक्षण सुद्धा हाती घेतले आहे . येत्या सुमारे दोन वर्षाच्या कालावधीत ही तीस शहरे भिकारीमुक्त करण्यात येणार आहेत .यात आणखी काही शहरे समाविष्ट करण्याचा सरकारचा विचार आहे. या भिकाऱ्यांना अनेक प्रकारचे रोजगार देऊन त्यांचे पुर्नवसन करणे सहज शक्य आहे केंद्र सरकार प्रमाणे महाराष्ट्र सरकारने सुद्धा ही योजना राबवावी व महाराष्ट्रातील काही शहरांना तरी भिकारीमुक्त करावे

**- शांताराम वाघ पुणे**

### आता पदवी अभ्यासक्रम मराठीत सुद्धा असणार ....

विद्यापीठ अनुदान आयोगाने मराठी भाषा सोबतच इतर भाषेमध्ये पदवी तसेच पदव्युच्चर शिक्षण देण्यासाठी मोठी पाऊले उचलली असल्याचे वृत्त वाचले . त्यानुसार शैक्षणिक साहित्य निर्माण करण्यासाठी प्राध्यापकांसाठी पुढील महिन्यात एका मास्टर्स ट्रैनिंग प्रोग्राम आयोजित करण्यात आला आहे .याचा परिणाम म्हणून विद्यार्थ्यांना येत्या शैक्षणिक वर्षांपासून स्थानिक भाषेत शिकण्याची मोठी संधी मिळणार आहे स्थानिक भाषेला राष्टीय शिक्षण धोरणात प्राधान्य देण्यात आले आहे .पण त्यासाठी आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्य उपल्बध नाही .याचा परिणाम अनेक ग्रामीण विद्यार्थ्यांना स्थानिक भाषेत शिक्षण घेता येत नाही .,एन इ पी च्या अंमलबजावणीच्या तीन वर्षाच्या काळात सुद्धा अनेक अभ्यास क्रमाचे साहित्य मराठी भाषेत उपलब्ध नाही या नवीन पत्रकानुसार देशभरातील उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये स्थानिक किंवा मातृभाषेतून अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार आहे .अध्यापकांना योग्य ते प्रशिक्षण सुद्धा देण्यात येणार आहे .यासाठी भारतीय भाषा समितीचे सहकार्य घेतले जाणार आहे .एकूणच सध्या मराठी भाषेची जी गळचेपी सर्वच क्षेत्रात चालू आहे त्या पार्श्वभूमीवर ही एक सुखद बातमी आहे.आज अनेक ठिकाणी मुलांना मातृभाषेत शिक्षण दिले जात नाही. मातृभाषेतून शिक्षण दिल्यास मुलांना लवकर आकलन होते तसेच त्यांना कोणतीही गोष्ट लगेच समजते .अलीकडे इंग्रजीचे स्तोम सर्वच क्षेत्रात वाढले आहे अनेक ठिकाणी मराठी शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत ही परिस्थिती बदलणे जरुरीचे आहे अन्यथा येत्या काही वर्षात मराठीचे नामोनिशाण सुद्धा राहणार नाही. आजही सर्व अटी पूर्ण करूनही मराठी भाषेला अभिजित भाषेचा दर्जा केंद्राकडून मिळत नाही. त्यासाठी सुद्धा सर्वच पातळीवर प्रयत्न करणे जरुरीचे आहे. एकूणच सर्वच क्षेत्रात मराठी भाषेला प्राध्यान्य देणे जरुरीचे आहे .पदवी तसेच पदव्युच्चर शिक्षणामध्ये मराठीचा अंतर्भाव होत आहे ही आनंदाची बातमी आहे याची अंमलबजाणी लवकरात लवकर करावी ही अपेक्षा आहे

**- शांताराम वाघ पुणे**

### भायखळा स्थानक बस थांबा हवा

बेस्टच्या जे जे रोड मार्गे भायखळयाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरून जाणाऱ्या मर्यादित क्रमांकाच्या बस गाड्यांना भायखळा फळ बाजाराजवळ पूर्वी भायखळा रेल्वे स्थानक बस थांबा होता.तो रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या बस प्रवाशांना सोयीचा होता.पण सद्या पुलाचे काम चालू असल्याने तेथील बस थांबा रद्द करण्यात आला आहे. व बस गाड्या नवा नागपाडा बस थांब्यावरून थेट जिजामाता उद्यान बस थांब्यावर थांबविल्या जात आहे.त्यामुळे भायखळा रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या प्रवाशांना मोठी गैरसोय होत आहे.प्रवाशांना जिजामाता उद्यान बस थांब्यावर उतरून मागे स्थानकाकडे जाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे यात वयोवृध्द प्रवाशांना अधिक त्रास होत आहे तरी बेस्टने भायखळा रेल्वे स्थानक जवळ तात्पुरता बस थांबा देवून बस प्रवाशांची अडचण दूर करावी ही विनंती

**- नंदकुमार आ पांचाळ, चिंचपोकळी**

### अर्थसंकल्पात पेन्शनवाढ व्हावी

ज्येष्ठ नागरिकांच्या हिताचे रक्षण आणि त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असताना या अर्थसंकल्पात आत्मनिर्भय भारताचा दृष्टिकोन आणि सर्व वर्गाचा समावेश आहे. हे वर्ष अंतरीम बजेट असल्यामुळे, विविध नव योजनांची घोषणा करण्याची शक्यता आहे. सर्व सामान्य मतदारांना दिलासा देण्याकरीता आयुष्मानभारत, आरोग्यविमा योजना, "लाडली बहना" शेतकऱ्यांना पी एम किसान योजना, या जोजनेमुळे एका मोठ्या वर्गाला दिलासा दिलेला आहे. इ पी एस १९९५ पेन्शनर संघटना गेले १० वर्ष देशभर, दिल्ली पर्यंत आंदोलन करीत आहेत. संसदे मध्ये कित्येक खासदार पेन्शनवाढीची मागणी करत आहेत. मा. पंतप्रधानांची भेट घेऊन सकारात्मकता दाखवली आहे. तरी ७४ लाख पेंशनर च्या निवृत्त कर्मचारी १९९५ (समन्वय समिती) आणि २९ कोटी सभासद असलेल्या संघटनेने मा पंतप्रधांना आणि केंद्रीय कामगारमंत्र्यांना २६/६/२०२३ रोजी पत्र दिलेले आहे. त्यामध्ये इ पी एस ९५ पेन्शनवाढ झाली नाही तर, मतदान करणार नाही या निर्णयावर आलो आहोत. तरी या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास तयार नाही. तर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटले आहे की हे बजेट म्हणजे "वोट ऑन अकाउंट". आहे. निवडणूक वर्षात लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. त्यामुळे अर्थसंकल्पात पेन्शनवाढ जाहीर व्हावी. ही अपेक्षा आहे.

**- विजय ना कदम**

### कर्मचा-यांवर राग काढू नका

राज्यात अनेक ठिकाणी मराठा जातीचे सर्वेक्षण करताना महानगरपालिकेचे कर्मचारी घरोघरी जाऊन जातीय आधारित माहिती गोळा करत आहेत.त्यावेळी अभिनेत्री केतकी चितळे व मराठी अभिनेता पुष्कर जोग यांनी यासदर्भात कर्मचा-यांवर नाराजी व्यक्त केलेली आहे.कर्मचारी जात विचारत नाही तर तुम्हाला सरकार जात विचारत आहे. कर्मचारी त्यांना शासनाने दिलेले काम मुकाट्याने करीत आहेत. तुमच्यात जर धमक असेल तर सरकारला जाब विचारा. सरकारने शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा ठपका ठेवत त्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे फौजदारी गुन्हे दाखल करावेत. शासनाने कारवाई केली नाही तर शासनाची पुष्कर जोगला मूक संमती असल्याचे समजले जाईल. अभिनेत्यांवर कारवाई न केल्यास विविध समाजघटक वा व्यक्तींना अशा वर्तनाने प्रोत्साहन मिळून त्या सर्वांचा परिणाम सर्वेक्षणाच्या कामकाजावर होईल.हे प्रकरण चिघळण्या अगोदर या दोन्ही अभिनेत्यांनी कर्मचा-यांची माफी मागून हा विषय संपवून टाकावे.

**- विवेक तवटे , कळवा**

### सगेसोयरे?

मराठा समाजाला आता इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणात वाटेकरी व्हावे लागणार असल्याने मराठा समाजाचे वास्तविक नवीन आदेशामुळे नुकसानच झाले आहे.मराठा आंदोलनात कळीचा मुद्दा ठरलेल्या सगेसोय-यांची नवी व्याख्या करण्यात आली आहे.सगेसोय-यांना जातप्रमाणपत्र मिळणार आहे. सगेसोयरे हा शब्द समाविष्ट करून कोणाचाही पुरावा कोणालाही लावून गृहचौकशीच्या नावाने सरसकट मराठा समाजाला मागील दाराने ओबीसी समाजात प्रवेश करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.महाराष्ट्रातील तीन तृतीयांश लोकसंख्या मराठा आहे. सगेसोय-यांना जातप्रमाणपत्र दिल्याने मराठा समाज्याची लोकसंख्या आणखी वाढणार आहे.ज्या मराठ्यांकडे किंवा त्यांच्या सगेसोय-यांकडे कुणबी प्रमाणपत्र नसेल तर त्या बाबत नियमात कोणतीही तरतूद नसल्याने अशा मराठा समाजाने काय करावे? भविष्यात मराठा विरुद्ध इतर मागासवर्गीय असा तंटा महाराष्ट्रात निर्माण होऊन गृहकलहाची शक्यता वर्तविली जात आहे. ऐतिहासिक परंपरा असलेल्या मराठा समाजाचे खच्चीकरण आणि इतर मागास समाजावर अतिक्रमण होणार असल्याने राज्यात असंतोष निर्माण होऊ शकतो.

**- विवेक तवटे , कळवा**

## मराठा आरक्षणाबाबत काढलेला अध्यादेश ओबीसी समाजाने जाळला

**पुणे :** ओबीसी आणि मराठा समाज यांच्यात आरक्षणाचा वाद पेटणार आहे. राज्य सरकार विरोधात ओबीसी समाज आक्रमक झाला असून थेट रस्त्यावर उतरुन आपला संताप व्यक्त केला आहे. पुण्यात विभागीय आयुक्त कार्यालयाबाहेर मराठा आरक्षणाबाबत काढलेल्या जीआरची होळी करण्यात आली आहे. मनोज जरांगे यांची मागणी पूर्ण करत सरकारने घेतलेल्या निर्णयावर ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. सरकारने काढलेला जीआरचा ओबीसी कार्यकर्त्यांनी जाळून निषेध व्यक्त केला आहे. मराठा कुणबी, कुणबी मराठा आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने तयार केलेल्या मसुद्याची प्रत ओबीसी कार्यकर्त्यांनी जाळली. सगे सोयरे शब्दाचा समावेश या अध्यादेशात करण्याचं प्रस्तावित आहे. त्याला ओबीसींकडून विरोध होत आहे. सरकारने हा निर्णय मागे घ्यावा या मागणीसाठी पुण्यातील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसमोर ओबीसी कार्यकर्ते आंदोलन करत आहेत. त्यांनी आज अध्यादेशाच्याा मसुद्याचं दहन केलं.



### महत्त्वाचे

## टेम्पोची दुचाकीस पाठीमागून जोरदार धडक

**उदगीर :** परिसरातील हाकनकवाडी शिवारात अहमदपूर रोडवर सोमवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास आयशर टेम्पोने दुचाकीचालकास पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला असून, उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात टेम्पोचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सांगितले, उदगीर-अहमदपूर रोडवर हाकनकवाडी शिवारातील बालाजी फड यांच्या शेताजवळ आयशर टेम्पो (एमएच २४ एबी ८५४१) च्या चालकाने दुचाकी (एमएच १४ डीयू १५३१) वर जाणारे सतीश त्र्यंबक सूरनर यांच्या दुचाकीस पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी लातूरला घेऊन जात असताना वाटेतच त्याचा मृत्यू झाला. याबाबत फिर्यादीचे नातेवाईक धोंडीराम माधव करले यांनी दिलेल्या तक्रारीवरून टेम्पोचालकाविरुद्ध उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पो.हे.कॉ. व्यंकट शिरसे करीत आहेत.

## लोणावळ्यात विषबाधेमुळे तब्बल 150 शेळ्यांचा मृत्यू

**लोणावळा :** लोणावळ्यात विषबाधेमुळे तब्बल १५० शेळी आणि मेंढ्यांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. लोणावळा येथे एका मोकळ्या मैदानात मेंढपाळ आपल्या शेळ्या आणि मेंढ्या घेऊन आला होता. एकाचवेळी एवढ्या मोठ्या प्रमाणात मेंढ्यांचा मृत्यू झाल्याने, मेंढपाळावर आर्थिक संकटही ओढावलं आहे. मेंढपाळ त्याच्या मेंढ्यांना मोकळ्या मैदानात घेऊन आला. त्यानंतर त्याने सर्व शेळ्या आणि मेंढ्यांना चरण्यासाठी सोडलं. यावेळी या शेळ्या मेंढ्यांनी कुजलेले किंवा खराब झालेले अन्न पदार्थ त्याठिकाणी खाल्ले. त्यानंतर त्या मेंढ्यांना त्रास होऊ लागला. तातडीने त्या ठिकाणी पशुधन अधिकारी व पशु वैद्यकीय अधिकारी यांना बोलवण्यात आले. डॉक्टरांनी या शेळ्या मेंढ्यांवर तातडीने उपचार सुरू केले. मात्र काही शेळ्या मेंढ्या उपचारापूर्वीच तर काही उपचारादरम्यान मृत्युमुखी पडल्या.

## मुद्देमाल कक्षात पोलिसांचाच ‘दरोडा’

**पुणे :** चोरट्यांकडून जप्त करण्यात आलेल्या दुचाकींची न्यायालयाच्या परवानगीशिवाय परस्पर विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मुद्देमाल कक्षातील जप्त दुचाकींची परस्पर विक्री केल्याप्रकरणी पोलीस उपायुक्त आर. राजा यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यातील चार पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस सेवेतून निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत. दयानंद गायकवाड, संतोष अंदारे, तुकाराम पांढरे, राजेश दराडे अशी निलंबित करम्यात आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. लोणी काळभोर पोलिसांनी गेल्या वर्षी दुचाकी चोरटा बाळासाहेब घाडगे याला अटक केली होती. घाडगेकडून दुचाकी जप्त करण्यात आल्या होत्या. पुणे-सोलापूर महामार्गावर असलेल्या ऊरळी कांचन पोलीस ठाण्याचे उद्घाटन प्रजासत्ताक दिनी करण्यात आले. लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे विभाजन करून ऊरळी कांचन पोलीस ठाण्याची निर्मिती करण्यात आली आहे. पोलीस ठाण्याचे विभाजन करण्यात आल्यानंतर मुद्देमाल कक्षातील नऊ दुचाकी तेथे नसल्याचे आढळून आले.

# मुख्यमंत्र्यांच्या निर्णयामुळे अनेकांना पोटशूळ उठला, सरकारने मराठा आरक्षणाचा शब्द पुर्ण केला

प्रतिनिधी
■ संभाजीनगर





मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ओबीसी आरक्षणाला धक्का न लागू देता मराठा समाजाला आरक्षण दिले. या ऐतिहासिक निर्णयामुळे विरोधकांसह अनेकांचा पोटशूळ उठल्याची टीका शिवसेनेच्या सत्ताधारी शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी केली आहे. सरकारच्या निर्णयामुळे पोटदुखी होणाऱ्या नेत्यांकडून 2 समाजांत तेढ निर्माण होईल अशी विधाने केली जात आहेत. पण त्यांच्या चिथावणीला कुणीही बळी पडणार नाही. जनता सुज्ञ असल्यामुळे विरोधात बोलणाऱ्यांनी आपली कोल्हेकुई थांबवावी, असेही ते म्हणालेत. मराठा आरक्षणाचा मुद्दा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जड जावा यासाठी अनेकांनी देव पाण्यात ठेवले होते. या आंदोलनामुळे सरकार जाणार असा आनंद त्यांना होत होता. पण मुख्यमंत्र्यांनी अत्यंत शिताफीने हा मुद्दा हाताळून मराठा समाजाला आरक्षण देऊन दाखवले. आंदोलकांना मुंबईच्या वेशीवरच रोखले. एवढेच नाही तर आरक्षणाचा अध्यादेशच मनोज जरांगे यांच्या हातात सोपवून आपला शब्द पूर्ण केला, असे संजय शिरसाट यांनी मंगळवारी पत्रकारांशी बोलताना म्हटले आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळू नये असे वाटणाऱ्या लोकांनी अद्याप आपले तोंड उघडले नाही. कारण, आता आरक्षणाच्या विरोधात बोलले तर ते महागात पडेल अशी भीती त्यांना वाटत आहे. मुख्यमंत्र्यांनी यापूर्वीच ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची भूमिका स्पष्ट केली होती. त्यानुसार त्यांनी हे आरक्षण देऊन दाखवले. काही जण या मुद्याचे भांडवल करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण त्यांचे मनसुबे केव्हाच यशस्वी होणार नाहीत, असे संजय शिरसाट म्हणाले.

सरकारमध्ये असणाऱ्यांनी सरकारच्या भूमिकेचे समर्थन करण्याची गरज आहे. याविषयीची कोणतीही चर्चा मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसोबत मंत्रिमंडळ बैठकीत करावी. त्यांनी ऐकले तर ठीक अन्यथा आपला निर्णय घ्यावा. कारण, सरकारमध्ये राहून सरकारविरोधात भूमिका घेतली तर गल्लत होण्याची भीती असते. त्यामुळे समाजासमाज तेढ निर्माण होईल अशी विधाने कुणीही करू नयेत, असेही संजय शिरसाट या प्रकरणी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यावर निशाणा साधत म्हणाले. सरकार कुणबी नोंदी सापडणाऱ्या सर्वांनाच आरक्षणाचा लाभ देण्याचा प्रयत्न करणार आहे. सरकारने अशी स्पष्ट भूमिका घेतली असताना अनेकांची कोल्हेकुई सुरू केली आहे. मुख्यमंत्री पुढील आठवड्यात यासंबंधी एक बैठक घेत आहेत. त्यात या प्रकरणाशी संबंधित सर्वच मुद्यांवर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही संजय शिरसाट यांनी यावेळी स्पष्ट केले.

## ठेवीदारांचे पैसे परत करण्यासाठी आयुक्त कार्यालयावर धडक मोर्चा

### पोलिसांकडून अश्रुधुराचा मारा; खा. जलील



प्रतिनिधी
■ संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगरमध्ये खासदार इम्तियाज जलील यांच्या नेतृत्वाखाली बुडालेल्या बँक आणि पतसंस्था यांच्या ठेवीदारांचे पैसे परत करण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला करावा आहे. दरम्यान, यावेळी काढण्यात आलेल्या आंदोलनात मोठा गोंधळ पाहायला मिळाला असून, ठेवीदार आक्रमक झाल्याने पोलिसांना अक्षरशः अश्रुधुराचा मारा लागला. सध्या आंदोलक थेट विभागीय आयुक्त कार्यालयात घुसले असून, आयुक्तांच्या कार्यालयाच्या बाहेर ठिय्या आंदोलन करण्यात येत आहे. तसेच लेखी आश्वासन मिळेपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका जलील यांनी घेतली आहे.

जलील यांनी काढलेल्या मोर्च्यात मोठ्या संख्येने वृद्ध व्यक्तीसह पुरुष आणि महिला सहभागी झाले आहेत. काही दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगरमध्ये आदर्श पतसंस्थेत घोटाळा झाल्याचा समोर आले होते. तेव्हापासून ठेवीदारांना त्यांचे अडकलेले पैसे मिळवून देण्यासाठी जलील पाठपुरावा करत आहेत. सोबतच अनेक बँकेवर आरबीआयने निर्बंध घातल्याने तेथील ठेवीदारांचे देखील पैसे अडकले आहेत. त्यामुळे या सर्व ठेवीदारांनी जलील यांच्या नेतृत्वाखाली आज विभागीय आयुक्त कार्यालयावर धडक मोर्चा काढला होता. मात्र, लेखी आश्वासन मिळत नसल्याने आंदोलक आक्रमक झाले. तसेच, जलील यांच्यासह आंदोलकांनी थेट विभागीय आयुक्त कार्यालयात घुसण्याचा प्रयत्न केला. शेवटी पोलिसांनी त्यांना रोखण्यासाठी अश्रुधुराचा मारा केला. त्यामुळे एकच धावपळ उडाली.

## काँग्रेसने एकट्याने लढल्यास 50 टक्के उमेदवारांचे डिपॉजिट जप्त होईल

प्रतिनिधी
■ वाशिम




लोकसभा निवडणुकीत काँग्रेस एकटी लढली तर अर्ध्याहून अधिक जागांवर डिपॉझिट जप्त होईल अशी टीका वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली. तसेच मुस्लिमांनी मनात आणलं तर भाजपच्या 48 पैकी 40 जागांचे मोठं नुकसान होऊ शकेल असंही ते म्हणाले.

मुस्लिमांनी योग्य उमेदवाराला मतदान केलं तर भाजपच्या 40 टक्के उमेदवारांचा आणि काँग्रेसच्या अर्ध्या उमेदवारांचं डिपॉजिट जप्त होईल. इंडिया आघाडीचं जे झालं ते महाविकास आघाडीचं झालं तरीही मुस्लिमांच्या हाती राजकीय खेळी राहू शकते.भाजपने मुस्लिमांना ब्लॅक आऊट केलंय, त्यामुळे त्यांच्याकडे लक्ष देत नाहीत. याच कारणामुळे मुस्लिमांना आता सेक्युलर पक्षांकडे जाण्याची संधी आहे. असं असताना जर शिवसेना, राष्ट्रवादी, भाजप, काँग्रेस आणि वंचित जर वेगवेगळे लढले तर तर धर्माचं राजकारण संपूण जाईल, कारण त्यावेळी सर्वच उमेदवार हे हिंदू असतील. त्यानंतर समाजाचं राजकारण सुरू होईल. अशावेळी जो आपल्या समाजाचे मत घेऊल क्रॉस व्होटिंगसाठी प्रयत्न करेल, जो मोठ्या समाजाचा असेल त्याला मुस्लिमांनी मतदान करावं. म्हणजे तो उमेदवार हा भाजपला चांगली लढत देऊ शकेल.

## साधूसंतांनाही लोकसभा निवडणुकीचे वेध...

### नाशिक आणि संभाजीनगरमधून लढण्याची जोरदार तयारी; आखाड्यातही राजकीय फिवर?

प्रतिनिधी
■ नाशिक



आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय इच्छुक उमेदवारांची तयारी सुरू झाली आहे .यंदाच्या निवडणुकीत एकूणच राम मंदिर फीवर बघता नाशिकच्या राजकीय आखाड्यात साधू महंतांनी उडी घेतली आहे. त्यामुळे प्रस्थापित कार्यकर्त्यांना बाजूला सारून सर्वपक्षीय साधू महंतांना उमेदवारी देणार का याची चर्चा सध्या सुरू आहे. आयोध्येत उभारण्यात आलेल्या राम मंदिराच्या भव्य दिव्य सोहळयानंतर राजकीय पटलावर आता साधू महंतांचा वावर वाढला आहे. नाशिक लोकसभा मतदार संघासाठी तब्बल तीन ते चार साधू महंतांनी तयारी सुरू केली आहे.

उत्तर महाराष्ट्र सह मराठवाड्यात मोठा भक्त परिवार असलेल्या शांतिगिरी महाराज यांनी नाशिक किंवा छत्रपती संभाजी नगरमधून उमेदवारी करण्याची तयारी सुरू केली आहे. तर दुसरीकडे त्रंबकेश्वर स्थित स्वामी श्री कंठानंद यांनी देखील आपण निवडणुकीच्या आखाड्यात उतरणार असल्याचं जाहीर केलं आहे. नाशिकच्या आध्यात्मिक क्षेत्रात मोठ नाव असलेले महंत अनिकेत शास्त्री महाराज देखील निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्याची तयारी करत आहेत. देशात सध्या भाजपची लाट असल्याचं दिसत असल्याने साधुसंतांची पहिली पसंती थेट भाजपलाच असली तरी वेळेवर मात्र भाजपकडून तिकीट न मिळाल्यास इतर पर्याय देखील शोधले जात आहेत. भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांकडून याबाबत स्पष्ट बोललं जात नसलं तरी मुनगंटीवार यांनी मात्र बाबा राजकारणात आले तर चालेल मात्र राजकीय नेते बाबा व्हायला नको अशी मिश्किल टिप्पणी केली.

## पंतप्रधान मोदी चौथ्यांदा करणार महाराष्ट्र दौरा

■ पुणे

हे निवडणुकांचे वर्ष आहे. लोकसभा आणि महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका यंदाच्या वर्षी होणार आहेत. त्यामुळे राज्य सरकारकडून विकासकामांच्या भूमिपूजनाचा धडाका सुरू आहे. अनेक लहान-मोठ्या शहरांमध्ये विविध कामांची उद्घाटने होत आहेत. अशातच पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार असल्याची चर्चा आहे. पुढील महिन्यात १९ फेब्रुवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी पुण्यात येणार आहेत असे सांगितले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी १९ फेब्रुवारी रोजी पुण्याच्या दौऱ्यावर असणार आहेत. या दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुणे एअरपोर्ट टर्मिनल आणि मेट्रोच्या मार्गिकेचे उद्घाटन होणार असल्याची माहिती आहे. पुण्याच्या दौऱ्यानंतर पंतप्रधान मोदी हे शिवनेरी किल्ल्यावरही जाण्याची शक्यता आहे.

## कोकण रेल्वे सुरु करणार कंटेनर वाहतूक

### रत्नागिरी, खेडमध्ये सुविधा उभारणी सुरु

प्रतिनिधी
■ रत्नागिरी



मालवाहतुकीला प्राधान्य देताना कोकणातील उत्पादनांसाठी कंटेनर वाहतूक सुरू करण्याचा निर्णय कोकण रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. खेड स्थानकातून ही वाहतूक केली जाणार असून, त्यासाठी आवश्यक सुविधा उभारणीला गती देण्यात आली आहे. त्यासाठी खेड येथील उद्योजक, कोकण रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी, कॉनकॉर, कस्टम विभाग आणि महाप्रित यांचा एक व्यापारी मेळावा मंगळवारी मुंबईत बीकेसी येथे झाला.

खेड रेल्वे स्थानकातून सुरू होणाऱ्या कंटेनर वाहतुकीसाठी वेगाने पावले उचलली जात आहेत. त्यासाठी या अंतर्गत येणाऱ्या विविध विभागांना एकच छताखाली आणण्याचा आणि त्यांच्या प्रश्नांना उत्तरे मिळवण्याचा प्रयत्न या व्यापारी मेळाव्यातून करण्यात आला.

कॉनकॉरचे चेअरमन संजय स्वरूप यांनी कॉनकॉरने रत्नागिरी आणि खेडमध्ये व्यापार वृद्धीसाठी केलेले प्रयत्न आणि खेडमधून होऊ घातलेल्या कंटेनर वाहतुकीचे फायदे सांगितले. कोकण रेल्वेचे संचालक संतोष कुमार झा यांनी व्यापार वृद्धीसाठी खेड आणि रत्नागिरी येथे उभारल्या जात सुविधांची तसेच मुलभूत सुविधांची माहिती दिली. यात गोदाम, शीतगृह अशा विविध सुविधांचा समावेश आहे.

कॉनकॉरच्या कमल जैन यांनी खेडमध्ये उद्योजकांना कॉनकॉरकडून दिल्या जाणाऱ्या विविध सुविधांची माहिती दिली. जेएनपीटी सीमाशुल्क उपायुक्त रामदास काळे यांनी व्यापाराशी संबंधित सीमाशुल्क विभागाचे नियम आणि बदलत्या काळातील व्यापार यावर महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. या व्यापारी मेळाव्यात खेड चिपळूण येथून आलेल्या उद्योजकांनी अनेक शंका - प्रश्न उपस्थित केल्या. त्यांचे शंका निरसन कोकण रेल्वे, कॉनकॉर आणि सीमाशुल्क विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून करण्यात आले. फेब्रुवारीच्या मध्यापासून कंटेनर वाहतूक सुरू करण्याच्या दृष्टीने या मेळाव्यात सकारात्मक चर्चा करण्यात आली. त्याला सर्वांनीच सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

## राणेंना भेटून पोरांना आवरायला सांगतो; मुस्लिमांविरोधात एवढे विष ओकणे बरे नाही

### माकप नेते नरसय्या आडम भडकले

प्रतिनिधी
■ सोलापूर





भाजप आमदार नीतेश राणे यांनी मुस्लिमांविषयी केलेल्या एका वादग्रस्त विधानाचे राज्यात तीव्र पडसाद उमटत आहेत. ज्येष्ठ माकप नेते नरसय्या आडम मास्तर यांनी त्यांच्या या विधानाचा खरपूस समाचार घेतला आहे. तसेच नारायण राणे यांची भेट घेऊन त्यांना आपल्या पोरांना आवरण्याचा सल्ला देणार असल्याचेही म्हटले आहे. नारायण राणे माझे चांगले मित्र आहेत. मुंबईला गेल्यानंतर मी त्यांना भेटून आपल्या मुलांना आवरण्याचा प्रयत्न करा असे आवर्जुन सांगेन, असे ते म्हणालेत.

नीतेश राणे यांचा मुस्लिमविरोधी एक व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला आहे. पोलिसांनी हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांकडे वाकड्या नजरेने पाहिले तर त्यांना 2 थापडा मारून या. तुम्हाला कुणीही हात लावू शकत नाही. एकच फोन आला पाहिजे. नीतेश साहेब कार्यक्रम केला, आता आम्हाला वाचवा, कार्यक्रम झाल्यानंतर तुम्हाला सुखरूप घरी पोहोचवण्याची जबाबदारी आमची असेल. पोलिसांपुढे सांगत आहे. माझे काही वाकडे होणार नाही. आपला बॉस सागर बंगल्यावर बसला आहे, असे नीतेश राणे या व्हिडिओत म्हणताना दिसून येत आहेत.

नरसय्या आडम मास्तरांनी त्यांच्या या विधानावर चांगलाच आक्षेप घेतला आहे. तसेच केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना आपल्या मुलांचे कान उपटण्याचा सल्ला देणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. ते सोलापुरात बोलत होते. हे राज्य म्हणजे जंगलराज आहे का? देवेंद्र फडणवीस यांनी माझ्यासोबत 5 वर्षे आमदार म्हणून काम केले. पण त्यांनी केव्हाच अशा शब्दांचा व वाक्यांचा वापर केला नाही.

## मराठा सर्वेक्षणासाठी शिक्षकांऐवजी विद्यार्थीच दिमतीला





प्रतिनिधी
■ भंडारा

मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळावे म्हणून आंदोलक मनोज जरांगे यांनी उपोषण, आंदोलन आणि मोर्चे काढले आहे. यानंतर राज्य सरकारने मराठ्यांच्या कुणबी नोंदणी सापडल्या आहेत. त्यांना ओबीसी प्रमाणपत्र देण्यास सुरुवात केली. पण ज्यांच्या कुणबी नोंदी नाहीत, त्या मराठ्यांसाठी ‘सगेसोयरे’ म्हणून सरकारने अध्यादेश काढला. यानुसार कुणबी नोंदी नसलेल्या मराठ्यांना आरक्षण मिळणार आहे. दुसरीकडे सरकारकडून मराठा आरक्षणाच्या धर्तीवर खुल्या प्रवर्गातील नोंदी शोधण्यासाठी राज्यभर सर्वेक्षणाचे काम हाती घेतले आहे.

राज्य सरकारच्या वतीने शहरी भाग आणि ग्रामीण भागात सर्वेक्षणाचे काम सुरू आहे. हे सर्वेक्षण करण्याची जबाबदारी शिक्षकांवर देण्यात आली आहे. पण शिक्षकांऐवजी शाळेतील विद्यार्थ्यांच घरोघरी जाऊन सर्वेक्षण करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शाळेतील विद्यार्थी गावात फिरून सर्वेक्षण करत असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

## राधाकृष्ण विखे पाटील यांना डॉक्टर ऑफ सायन्स पदवी

### 208 शेतकऱ्यांना केली समर्पित



प्रतिनिधी
■ राहुरी

महात्मा फुले कृषी विद्यापीठाकडून डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी प्रदान करीत एका माजी विद्यार्थ्यांचा केलेला सन्मान माझ्यासाठी खूप आनंदाचा, अभिमानाचा आणि प्रेरणादायी क्षण आहे. शेतकऱ्यांसाठी काम करण्याच्या आजोबा आणि वडीलांकडून मिळालेल्या संस्कारांचा आणि विचारांचा हा गौरव आहे. विखे पाटील परिवाराने दत्तक घेतलेल्या 208 शेतकरी कुटूंबियांना हा सन्मान समर्पित करीत असल्याची भावना महसूल, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात हा सोहळा झाला.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्यावतीने आयोजित 37 व्या दिक्षांत समारंभात राज्याचे महसूल, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांना डॉक्टर ऑफ सायन्स पदवीने सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे विखे पाटील हे या विद्यापीठाचे माजी विद्यार्थी असून, विद्यापीठाने केलेला सन्मान अभिमान वाटावा असाच असल्याचे त्यांनी सांगितले. यापुर्वी माझे आजोबा आणि सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांना 22 ऑक्टोबर 1978 रोजी आणि वडील लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांना 29 नोव्हेंबर 2012 रोजी या विद्यापीठाने डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी देवून सन्मानित केले होते.

## सोमैयांविरोधात तक्रार द्यायला 5 महिला समोर आल्या, पण आम्ही घाणेरडं राजकारण करणार नाही!

प्रतिनिधी
■ मुंबई



मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांची कोरोना काळातील बॉडी बॅग घोटाळा प्रकरणी तर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांचे बंधू संदीप राऊत यांची खिचडी घोटाळ्या प्रकरणी आज (30 जानेवारी) ईडीकडून चौकशी होत आहे. यानिमित्तानं या विषयावर बोलताना संजय राऊत यांनी हा घोटाळा उघड करणारे भाजपा नेते किरीट सोमैया यांच्यावर हल्लाबोल करत एक प्रकारे त्यांना धमकी वजा इशारा दिला आहे.

संजय राऊत यांनी मुंबईत आपल्या निवासस्थानी पत्रकार परिषद घेतली. यावेळी बोलत असताना ते म्हणाले की, "खिचडी घोटाळ्याचे सर्व लाभार्थी मिंधे (शिंदे) गटामध्ये आहेत. मात्र, त्यांच्यावर कारवाई करण्याची हिंमत ईडी दाखवत नाही. ईडीची पातळी इतकी खाली घसरली आहे का? आम्ही अडीच वर्षात कोरोना काळात जे काम केलं ते संपूर्ण जगाने पाहिलं. तसंच शेकडो कोटींचे घोटाळे करून लोक भारतीय जनता पक्षात जातात, त्यावर तपास यंत्रणा गप्प बसतात. विक्रांत बचाव प्रकरणाचे कोट्यवधी पैसे जमा केले त्याचं काय झालं? माझ्याकडं त्याबाबत पुरावे आहेत. ते मी कोर्टात दिले, परंतु त्यांनी कोर्ट मॅनेज केलंय. मात्र, खालच्या कोर्टानं जामीन नाकारल्यानंतर बाप आणि मुलगा (किरीट आणि नील सोमैया) फरार झाले. मग फडणवीस सरकार आले आणि त्यांनी तो गुन्हाच रद्द केला.

पुढं किरीट सोमैयांवर टीका करत संजय राऊत म्हणाले की, "किरीट सोमैयाला उलटा टांगून मारू, याची लायकी आहे का? परंतु आमचा सुद्धा बॉस बसलाय. तो सागर बंगल्यामध्ये नाही पण कुठेतरी बसला आहे. तो ईश्वर आहे. आम्ही कुठल्या पक्षात जाणार नाही, आम्ही घाबरणार नाही. किती काळ आणि कुणाकुणाला त्रास द्याल? आमचा पक्ष फोडून झाला. आता कारवाया करताय पण आम्ही घाबरत नाही.

किरीट सोमैयांविरोधात तक्रार द्यायला आता 5 महिला समोर आल्या आहेत. पण अशा पद्धतीचं घाणेरडं राजकारण आम्ही करू नये असं आम्हाला वाटतं. त्यांनाही बायको आणि सून आहे आणि हे आमच्यावर कारवाया करतायत. महाराष्ट्रातील उद्योग बाहेर चालले यावर बोला, 8 हजार कोटींच्या ॲम्बुलन्स घोटाळयावर बोला, 500 कोटींच्या राहुल कुलच्या मनी लॉन्ड्रिंग घोटाळयावर बोला. अजित पवारांचा 70 हजार कोटींचा सिंचन घोटाळा, हसन मुश्रीफांच्या घोटाळयावर बोला. मुलुंडच्या पोपटलालची त्यावर बोलण्याची हिंमत आहे का? आमच्यामध्ये वार झेलण्याची हिंमत आहे. अबकी बार चारसो पार असे ते म्हणतात, पण त्यांना दोसो पार पण करता येणार नाहीत", असा टोलाही त्यांनी लगावला आहे.

## अरूण म्हात्रेंना 'आगरी कला गौरव' पुरस्कार

**उरण :** अखिल भारतीय आगरी साहित्य संस्थेचे दुसरे आगरी अस्मिता साहित्य संमेलन आगरी समाज सभागृह पनवेल येथे आदरणीय लोकनेते "दि.बा. पाटील साहेब साहित्य नगरी" या नावाने संपन्न झाले. सदर संमेलनात संस्थापक- कैलास पिंगळे आणि कार्यकारिणी यांच्या सुनियोजनाने चहापाणी नाश्ता भोजनासह अनेक कार्यक्रम संपन्न झाले. विशेष म्हणजे समस्त आगरी समाजातील कवी- साहित्यिक- कलागुणींना २०२४ वर्षीय पुरस्काराचे मानकरी म्हणून पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये कवी/लेखक/गायक/वाद्य वादक असे बहुगुणी अरुण दत्ताराम म्हात्रे (जासई-उरण) यांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ शाल श्रीफळ आणि "आगरी कला गौरव" हे प्रतिमा रूपी विशेष सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. अरुण द. म्हात्रे यांनी साहित्य क्षेत्रात भरारी घेत असताना आगरी अस्मिता जपली. परंपरा संस्कृती यांचे भान राखून कार्य केले. साहित्य शारदेच्या सेवेसह कलेची बांधिलकी जपली. आणि कला प्रांतात बहुविध स्वरूपाचे प्रशंसनीय कार्य केले; करत आहेत. यामुळे सुपरिचित अरुण द. म्हात्रे यांचे विविध क्षेत्रातून आणि सर्व स्तरातून स्तुती सुमनांसह विशेष कौतुक होत आहे.



# अध्यादेशाची तातडीने अंमलबजावणी करा, अन्यथा 10 फेब्रुवारीपासून आमरण उपोषण

## मनोज जरांगेंचा पुन्हा इशारा

प्रतिनिधी
■ महाड



सग्यासोयऱ्याबाबत महाराष्ट्र सरकारने अध्यादेश काढला आहे. त्याचं 15 दिवसातच विशेष अधिवेशन बोलावून कायद्यात रुपांतर करावं. उद्यापासून तातडीने अंमलबजावणी नाही केली तर 10 फेब्रुवारीपासून कठोर उपोषण करणार आहे. मराठवाड्यासह महाराष्ट्रात मराठ्यांच्या नोंदी सापडत नाहीत. कुणाच्या दडपणाखाली येऊन सरकार काम करत आहे काय? सरकारने कायदा टिकवण्यासाठी काम केलं नाही तर आम्ही आंदोलन करू. सगेसोयऱ्याच्या अध्यादेशाची अंमलबजावणी करा. ज्याची कुणबी नोंद मिळाली त्याच्या कुटुंबाला आणि सग्यासोयऱ्यांना आरक्षण मिळावं हा आमचा हेतू आहे, असं मनोज जरांगे म्हणाले. मराठा आरक्षणाच्या अध्यादेशाल विरोध करत असाल तर ओबीसींचं 27% आरक्षण रद्द करणार असा मोठा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. मंडल आयोग आम्ही स्वीकारलेला नाही. मात्र मराठ्यांच्या लेकरांचं वाटोळं करत असाल तर मग त्यालाही आव्हान देण्याचा इशारा जरांगेंनी दिलाय. मंत्री छगन भुजबळ जर मराठा आरक्षणाला आव्हान देत असतील तर आम्हीही ओबीसींना आव्हान देऊ असा जाहीर इशारा जरांगेंनी दिलाय. तर मराठ्यांचं कल्याण होत असताना शंका घेण्याचं कारण काय असा सवाल जरांगे पाटलांनी विचारलाय. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी मुंबईत बंद घरांचं सर्व्हेक्षण केलं का असा सवाल केला होता. त्यावर जरांगेंनी प्रत्युत्तर दिलं.

मराठा आरक्षणाच्या लढ्यानंतर जरांगेंनी आज आणखी एका आरक्षणाच्या लढ्याची घोषणा केलीय.. येत्या काळात धनगर आणि मुस्लिम आरक्षणासाठी काम करणार असल्याची घोषणा जरांगेंनी केलीय.. धनगर आणि मुस्लिम आरक्षणासाठी जरांगेंनी आता रणशिंग फुकलंय.. रायगडावरुन जरांगेनी ही घोषणा केलीय..

मराठवाड्यात 62 टक्के इतकंच मराठा सर्वेक्षणाचं काम पूर्ण झालंय... 31 जानेवारी ही सर्वेक्षणासाठीची डेडलाईन आहे.. तेव्हा आज आणि उद्या मराठवाड्यातलं उर्वरित 38 टक्के सर्वेक्षण कसं पूर्ण करणार हा मोठा प्रश्न आहे. मराठवाड्यात 30 लाख कुटुंबांचं सर्वेक्षण झालंय. लातूर जिल्ह्यात सर्वाधिक 84 टक्के सर्वेक्षण पूर्ण झालंय. तर छत्रपती संभाजीनगरसह जालना,बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, धाराशिव जिल्ह्यांत 50 ते 55 टक्के काम पूर्ण झालंय.

# क्वॉरीच्या स्फोटात एका कामगाराने प्राण गमावले, दोन जखमी

प्रतिनिधी
■ पनवेल

पनवेलमध्ये सर्वाधिक ८० हून जास्त खदाणी व क्वॉरी आहेत. कुंडेवहाळ गावातील क्वॉरीमध्ये सोमवारी दुपारी दोन वाजता झालेल्या सूरुंग स्फोटामध्ये क्वॉरीवर काम करणाऱ्या एका पोकलेन चालकाच्या पाठीवर स्फोटानंतर उडालेल्या मोठ्या दगडांचा मारा अंगावर पडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. तर दोन कामगार जखमी झाले. या घटनेत जीव गमावलेल्या पोकलेन चालकाचे नाव अविनाश केशव कुजूर असे आहे. याबाबत पनवेल शहर पोलीसांनी क्वॉरीमध्ये सुरुंगाव्दारे स्फोट घडविणाऱ्या ५३ वर्षीय कुलामणी राऊत याच्याविरोधात गुन्हा नोंदविला आहे.

७० ते ८० मीटर अंतरावर हे कामगार व पोकलेन चालक उभे असताना स्फोट केल्याने ही घटना घडली. अॅन्थोनी भोईर यांची कुंडेवहाळ गावात क्वॉरी आहे. १८ वर्षीय अंकीत शहा, कामावर देखरेख करणारे अंकुश निरगुडा तसेच पोकलेन चालक कजूर यांच्या अंगावर दुपारी दोन वाजता अचानक स्फोट झाल्याने दगड उडाले. हे तीघेही जखमी झाले. मात्र या दगडांचा मारा एवढा जबरदस्त होता की या माऱ्यामध्ये पोकलेन चालक कुजूर हा जागीच ठार झाला. त्याच्या पाठीवर उजव्या बाजूला मोठ्या दगडाचा फटका बसल्याने तो जागीच ठार झाला. याबाबत पनवेल शहर पोलीसांनी भारतीय दंड संहिता १८६०, ३०४ अ अंतर्गत रितसर तक्रार नोंदविली असल्याची माहिती पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितीन ठाकरे यांनी दिली. पनवेलमधील क्वॉरीवरील स्फोटात सोमवारी एकाचा जीव गेल्यामुळे पनवेल व उरणमधील सर्वच खदाणी व क्वॉरी मालकांकडे सूरुंग स्फोट घडविणारे कामगार हे कुशल आहेत का असा प्रश्न निर्माण झाला आहे. स्फोट झाल्यावर आणि क्वॉरीमधून दगड काढताना संरक्षित जाळी लावणे तसेच भोंग्याने दवंडी देणे अपेक्षित होते. यापूर्वी वहाळ ग्रामपंचायतीच्या लोकप्रतिनिधींनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे या खदाणी व क्वॉरीमध्ये हवेतील प्रदूषण वाढल्याची तक्रार केली होती.

# स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही पारधी समाजावरील गुन्हेगारीचा डाग कायम

## आम्हाला स्वातंत्र्य कधी मिळणार? संतोष पवार यांचा संतप्त सवाल

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. परंतु अद्यापही इंग्रजांनी आदिवासी पारधी समाजावर दरोडेखोर, गुन्हेगारीचा जन्मताच कायदा करून आमचे नागरिकत्वाचे अधिकार हिरावून घेतले आहेत. मात्र स्वतंत्र भारताच्या प्रजासत्ताकाच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वर्षातही आमच्यावरील गुन्हेगारीचा डाग का पुसला गेला नाही? आम्हाला मूलभूत अधिकार देऊन स्वतंत्र्याचा लाभ मिळेल का? असा सवाल आदिवासी पारधी महासंघाचे नवी मुंबई अध्यक्ष संतोष पवार यांनी प्रजासत्ताक दिन कार्यक्रमात बोलताना केला.

प्रजासत्ताक दिनानिमित्ताने नवी मुंबईतील महापे येथे पारधी वस्तीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी



आदिवासी पारधी महासंघाचे अध्यक्ष आप्पासाहेब साळुंखे उपस्थित होते.

मुंबईत २५ ते ३० लाख आदिवासी पारधी समाज उघड्यावर रस्त्यावर राहत आहे. परंतु आजही त्याला त्याच्या मालकी हक्काचे घर मिळू शकले नाही. ज्या पारधी वस्त्या आहेत, त्यांना वीज, पाणी आदी मुलभूत सुविधा महापालिका आणि सरकारकडून मिळत नाही, हा एक प्रकारे आमच्यावर अन्याय केला जात आहे, असा संताप ही संतोष पवार यांनी व्यक्त केला आहे.

# कल्याणमधील आरटीओ कार्यालयाचे कामकाज ठप्प

## कर्मचारी मराठा नोंदी सर्वेक्षणाच्या कर्तव्यावर

प्रतिनिधी
■ कल्याण

कल्याण येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील २७ पैकी १९ कर्मचारी मराठा, खुल्या प्रवर्गातील समाजाचे सर्वेक्षण करण्यासाठी महसूल विभागाने वेगवेगळ्या भागात नियुक्त केले आहेत. हे काम अत्यावश्यक सेवेतील असल्याने आपले मूळ काम सोडून उपप्रादेशिक कार्यालयातील कर्मचारी गेल्या आठवड्यापासून महसूल विभागाने दिलेल्या कामासाठी कर्तव्यावर जात असल्याने उपप्रादेशिक परिवहन विभागाचा कल्याण मधील कारभार ठप्प पडला आहे.

कल्याण उपप्रादेशिक परिवहन विभागाचे कार्यक्षेत्र कल्याण, डोंबिवली, बदलापूर, अंबरनाथ, शहापूर, मुरबाड आहे. या भागातून वाहन चालक, मालक आपल्या वाहनाचे नुतनीकरण, परवाना,



नोंदणी पुस्तिका घेण्यासाठी, शिकाऊ वाहन प्रशिक्षणासाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात दररोज फेऱ्या मारत आहेत. परंतु, कामे करण्यासाठी मंचका समोर कर्मचारी दिसत नसल्याने नागरिकांना कार्यालयातून माघारी परतावे लागत आहे. सात ते आठ कर्मचारी विविध खिडक्यांवर काम करताना दिसत आहेत. त्यांच्या समोर विविध प्रकारची कामे घेऊन वाहन चालक, रिक्षा चालकांची गर्दी असल्याचे दिसून येत आहे.

अनेक खिडक्यांवर लिपीक, अधीक्षक पदावर मोटार वाहन निरीक्षक काम करताना दिसत आहेत. खिडकीवर गर्दी नको म्हणून वाहन मालक, चालकांना कार्यालयात कर्मचारी संख्या कमी असल्याने ऑनलाईन माध्यमातून कामे करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांकडून वाहन मालकांना केल्या जात आहेत. कर्मचाऱ्यां अभावी आरटीओ कार्यालयात विविध प्रकारच्या कामांच्या नस्तींचे ढीग साचले आहेत.

# पनवेलमध्ये बारावर्षीय मुलीचा झाला बालविवाह

## सर्वेक्षणात आले सत्य समोर

प्रतिनिधी
■ पनवेल

बारा वर्षांच्या मुलीचा विवाह २९ वर्षीय तरुणासोबत झाल्याचा धक्कादायक प्रकार पनवेलमध्ये उघडकीस आला आहे. पीडित मुलगी चार महिन्यांची गर्भवती राहिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. खांदेश्वर पोलिसांनी पीडित मुलीसोबत जरठकुमारी विवाह करणाऱ्या तरुणाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पीडित मुलीचे वय १२ वर्षे ९ महिने इतके असून तिचे आई-वडील नवीन पनवेल भागात राहण्यास आहेत. गत गुरुवारी महापालिकेच्या वैद्यकीय पथकाकडून नवीन पनवेल भागात सर्वेक्षण सुरू असताना १२ वर्षीय पीडित मुलगी चार महिन्यांची गर्भवती असल्याचे डॉक्टरांच्या निदर्शनास आले. डॉक्टरांनी खांदेश्वर पोलिसांना या घटनेची माहिती दिल्यानंतर पोलिसांनी पीडित मुलगी व तिच्या आई-वडिलांकडे त्याबाबत चौकशी केली.

पीडितेच्या आई-वडिलांनी सातारा जिल्ह्यातील खटाव येथील रणसिंगवाडी भागात राहणाऱ्या २९ वर्षीय तरुणासोबत मुलीचे घरच्या घरी लग्न लावून दिल्याचे सांगितले. लग्नानंतर पीडित मुलगी गर्भवती राहिली. ती सातारा येथून नवीन पनवल येथे आई-वडिलांच्या घरी आल्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास हा प्रकार आला.

# महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त अभिवादन आणि हुतात्म्यांना भावपूर्ण आदरांजली

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त प्रशासन विभागाचे उप आयुक्त श्री शरद पवार यांच्या हस्ते महापालिका मुख्यालयातील ॲम्फीथिएटर येथे प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी समाजविकास विभागाचे उपआयुक्त श्री. किसनराव पलांडे, भांडार विभागाच्या उप आयुक्त श्रीम. मंगला माळवे, महापालिका सचिव श्रीम. चित्रा बाविस्कर,




वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण, वैदयकीय अधिकारी डॉ. प्रविण कटके, सहाय्यक आयुक्त श्री. चंद्रकांत तायडे, प्रशासकीय अधिकारी श्री. उत्तम खरात, लेखाधिकारी श्री. मारोती राठोड तसेच इतर अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.

आजच्या हुतात्मा दिनानिमित्त देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करीत सकाळी 11.00 वा. ते 11.02 पर्यंत स्तब्ध् उभे राहून दोन मिनिटे मौन पाळण्यात आले.

## बदलापूरचा 1 नंबर प्लॅटफॉर्म प्रवाशांसाठी होणार बंद

■ बदलापूर

बदलापूरचा होम प्लॅटफॉर्मचे काम रेंगाळत सुरू असताना आता बदलापुरातील फलाट क्रमांक एक वरून मुंबईच्या दिशेकडे जाणारी लोकल पकडणे प्रवाशांसाठी बंद करण्यात येणार आहे. बदलापूरहुन सुटणारी मुंबईच्या दिशेने जाणारी लोकल आता होम प्लॅटफॉर्मवरूनच पकडावे लागणार असल्याने बदलापूर पूर्व भागात राहणाऱ्या प्रवाशांना त्याचा त्रास सहन करावा लागणार आहे. बदलापूर रेल्वे स्थानकात मोठ्या प्रमाणात सुविधा पुरविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे होम प्लॅटफॉर्मचे काम देखील 95 टक्के पूर्ण झाले असून काही ओघम कामे अंतिम टप्प्यात आहेत.

# भोकरपाडा जलशुद्धीकरण प्रकल्पातील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक मार्ग काढणार - पाटील

प्रतिनिधी
■ पनवेल

रायगड जिल्ह्यातील भोकरपाडा येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जलशुद्धीकरण प्रकल्पातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यासंदर्भात सकारात्मक मार्ग काढणार असल्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

भोकरपाडा (ता. पनवेल) येथील जलशुद्धीकरण प्रकल्पातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यासंदर्भात आज मंत्री श्री.



पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, पाणी पुरवठा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव अभिषेक कृष्णा यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

भोकरपाडा जलशुद्धीकरण प्रकल्पात 55 कंत्राटी कर्मचारी आहेत. या कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी संदर्भातील प्रस्ताव भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे प्रलंबित आहेत. या प्रस्तावाचा पाठपुरावा करावा. तसेच कर्मचाऱ्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे सुट्ट्या देणे, वेतनवाढ आदी सुविधासंदर्भातील त्रुटी दूर करून सकारात्मक मार्ग काढण्यात येईल, असे श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले.

# नवघर ग्रामपंचायततर्फे नागरिकांना कचरा कुंडीचे वाटप तसेच आरओ प्लॅन्टचे उदघाटन

प्रतिनिधी
■ उरण

ग्रामपंचायत नवघर तर्फे कुंडेगाव येथे घरोघरी प्रत्येक कुटुंबाला कचरा कुंडीचे वाटप करण्यात आले.तसेच शुध्द पाणी पुरवठा करणेसाठी नवघर येथे आरओ प्लॅन्ट बसविणेत आले. सरपंच कविता मढवी, उपसरपंच विश्वास तांडेल,माजी उपसरपंच दिनेश बंडा,सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, ग्रामविकास अधिकारी जे. के. म्हात्रे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.नागरिकांचे



आरोग्य निरोगी राहावे, परिसर स्वच्छ राहावा, रोगराई पसरू नये या अनुषंगाने स्वच्छते विषयी जनजागृती करत नागरिकांना कचरा जमा करण्यासाठी घरोघरी कचरा कुंडीचे वाटप करण्यात आले. तसेच विविध रोगराई व नागरिकांचे आरोग्य लक्षात घेता शुद्ध पिण्याच्या पाण्याचे प्लॅन्ट सुद्धा बसविण्यात आले. चांगल्या अशा कार्यक्रमाचे, चांगल्या योजनेचे उदघाटन झाल्याने सदर कार्याचे ग्रामस्थांनी मनापासून स्वागत केले.

# उरण येथे 'उडान' महोत्सव जल्लोषात साजरा

प्रतिनिधी
■ उरण

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय तसेच यूईएस महाविद्यालय, उरण यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठाच्या अजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित केला जाणारा उडान महोत्सव यु इ एस महाविद्यालयाच्या परिसरामध्ये मोठ्या उत्साहात व जल्लोषात संपन्न झाला. विद्यापीठाच्या डी एल एल ई विभागाचे डायरेक्टर




प्रा.डॉ. बळिराम एन.गायकवाड, विद्यार्थी विकास विभागाचे डायरेक्टर डॉ. सुनील पाटील,डी.एल.एल.ई समन्वयक डॉ.कुणाल जाधव, ब्रह्मानंद प्रतिष्ठान च्या संस्थापक श्रीमती शिरीष पुजारी, कोकण ज्ञानपीठ संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीपचंद्र शृंगारपुरे, यु ई एस संस्थेचे अध्यक्ष तनसुख जैन, उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, चंद्रकांत ठाकूर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.किशोर शामा, प्राचार्या श्रीमती मीनाक्षी गुप्ता, उरण महाविद्यालय विकास समितीचे सदस्य रमेशजी ठाकूर, क्षेत्रीय समन्वयक प्रा.डॉ. बी. एस.पाटील व प्रा. मनीष धायगुडे आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

# ग्रामीण भागातील लोकांना शुद्ध व शाश्वत पाणी उपलब्ध करून देणे गरजेचे - डॉ. रुपाली सातपुते

प्रतिनिधी
■ ठाणे

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन अंतर्गत पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमा अंतर्गत आज जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळा वेळी ग्रामीण भागातील लोकांना शश्वात व स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे अशा सूचना मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते यांनी उद्घाटन पर भाषणात दिल्या.

ठाणे जिल्हा परिषद अंतर्गत पाणी गुणवत्ता व सनियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते



सदर कार्यक्रमाचे उद्घाटन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले

यावेळी कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा प्रदीप कुलकर्णी उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी व जिल्हा स्तरावरील खाते प्रमुख व तालुकास्तरावरील सर्व गटविकास अधिकारी, उपअभियंता, तालुका आरोग्य अधिकारी, विस्तार अधिकारी, पंचायत विस्तार अधिकारी, आरोग्य कनिष्ठ अभियंता, गटसमन्वयक, समूह समन्वयक, पाणी गुणवत्ता निरीक्षक आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यशाळेत अनिल निचिते यांनी प्रास्ताविक पर भाषणात सध्या स्थितीत ठाणे जिल्ह्यातील पाणी गुणवत्ता व सर्वेक्षण व विविध प्रकारच्या पाणी नमुने तपासणी सद्यस्थितीत जिल्हा यातील परिस्थिती याबाबत माहिती दिली तसेच अध्यक्षीय भाषणात प्रदीप कुलकर्णी यांनी जिल्ह्यातील सर्व लोकांना स्वच्छ व मुबलक पाणी जलद गतीने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.

# 13 फेब्रुवारीपर्यंत 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान

प्रतिनिधी
■ पनवेल

पनवेल महानगरपालिकेमार्फत 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान दिनांक 30 जानेवारी ते 13 फेब्रुवारीपर्यंत राबविण्यात येणार आहे. आयुक्त श्री.गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या पंधरवड्यात कुष्ठरोगाविषयी आरोग्य शिक्षणाचे विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत आज प्रत्येक नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रावरती राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच कुष्ठरोग प्रतिज्ञेचे वाचन करण्यात आले.

कुष्ठरोगाचे समुळ उच्चाटन करण्यासाठी महापालिकेचा वैद्यकिय आरोग्य विभाग सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. या अभियानांतर्गत आपआपल्या स्तरावर प्रत्येक नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपक्रम राबविणार आहे.



राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्ताने दिनांक ३० जानेवारी रोजी राष्ट्रीय स्तरावरती कुष्ठरोग निवारण पंधरवडा साजरा करण्याबाबत केंद्र शासनाने निर्देश दिले आहेत. त्यानूसार मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या सूचनेनूसार येत्या 15 दिवसात कुष्ठरोग जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. महापालिका आणि सहाय्यक संचालक आरोग्य सेवा(कृष्ठरोग) अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमानातून हे कार्यक्रम होणार आहे. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र 1 येथे सर्व आरोग्य विभागातील कर्मचा-यांची रॅली होणार आहे. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र 2 मध्ये शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात येणार आहे.नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र४ येथे शालेय विद्यार्थ्यांच्या निबंध स्पर्धा होणार आहेत.तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र 5 येथे कुष्ठरोगाविषयी पथनाट्य सादर करण्यात येणार आहे. कुष्ठरोगाविषयी जनजागृती या विषयावर आधारित नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ६ येथे आरोग्य कर्मचाऱ्यांच्या रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियानांतर्गत महापालिकेच्यावतीने डॉ.वैभवी निंबाळकर आणि उपजिल्हा रुग्णालयाच्यावतीने अर्जुन ठाकूर सर्व कार्यक्रमाचे नियोजन करत आहेत.

## महत्त्वाचे

### आदिवासींना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**उरण :** दूर-दुर्गम ,डोंगर- दऱ्यांत राहणाऱ्या आदिवासी बांधावांना विविध सण साजरे करायला सुद्धा खूप काबाड - कष्ट करूनच सण साजरे करावे लागतात त्यातच घरातील बेताच्या परिस्थिती मुळे तर त्यांचं जगणंच मुश्कील झालेलं असत. अश्यातच त्यांना लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंची काहीतरी मदत करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण व्हावा या करिता ह्या आदिवासी बांधवांच्या सुख- दुःखात ,त्यांच्या हाकेला सदैव धावून जाणारं व्यक्तिमत्त्व केअर ऑफ़ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक राजू मुंबईकर आणि श्री समर्थ कृपा सखी स्वयं सहाय्यता संस्थेच्या अध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या संगिताताई ढेरे आणि डाबर इंडिया कंपनी यांच्या औदार्यातून आपटा सारसई येथील बागेचीवाडी आदिवासीवाडी आणि आपटा येथील आदिवासीवाडी या दोन आदिवासी वाड्यांवरील आदिवासी बांधवांनां रिअल फ्रेश फ्रुट ज्यूस,लोणचं, डाबर दंतकांती टूथपेस्ट , पिनट्स बटर वाटप प्रत्येक कुटुंबाला एक एक पाकिटं अश्या प्रकारच्या वस्तूंचे वाटप करण्यात आले.

### राष्ट्रीय वारकरी हरिनाम सप्ताह 4 फेब्रुवारीपासून

**पनवेल :** खारघर येथे ४ ते १२ फेब्रुवारी या दरम्यान संत शिरोमणी श्री निवृत्ती महाराज जन्म सप्त शतकोत्तरी सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित राष्ट्रीय वारकरी अखंड हरिनाम सप्ताह तसेच श्रीमद् भागवत कथा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याच ठिकाणी महाराष्ट्र भूषण सोहळ्यासाठी लाखो दासभक्त खारघरमध्ये आले होते. त्यानंतर देशभरातून गायत्री परिवाराचे भक्तांनी याच ठिकाणी अश्वमेध यज्ञ राज्यपालांच्या उपस्थितीत झाला होता. त्यानंतर आताखारघर उपनगर शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जाते. मात्र येथे सतत होणाऱ्या अध्यात्मिक सोहळ्यांमुळे शहराची ओळख अध्यात्मिकतेची शिकवण देणारी वसाहत अशी होत आहे. आठवड्याभराच्या या सोहळ्यासाठी देशातील तीन पीठांचे आचार्य, शंकराचार्य, संतांचे वंशज, वारकरी संस्थांचे पदाधिकारी, ज्येष्ठ कीर्तनकार, वारकऱ्यांसह राज्यातून हजारो भाविक उपस्थित राहणार असल्याचा दावा आध्यात्मिक विचार प्रचारक सामाजिक संस्थेने केला आहे.

### प्रदेश शिक्षण प्रकोष्ट्या उपाध्यक्षपदी नरेश पवार



**दिवा :** दिवा शहरातील व्यवसायिक व शिक्षणसम्राट म्हणून ओळखले जाणारे भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष नरेश पवार यांची भाजपच्या महाराष्ट्र प्रदेश शिक्षण संस्था चालक प्रकोष्टच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शैक्षणिक क्षेत्रातील नावाजलेल्या मेष्टा या संघटनेचे ते ठाणे जिल्हा अध्यक्ष म्हणून नरेश पवार हे जबाबदारी पार पाडत आहेत. प्रसंगी सदर नियुक्तीमुळे शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवराकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून पुढील वाटचालीस शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

*मुंबई : हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त बाळासाहेब ठाकरे चषक २०२४ सर्व कामगार, कर्मचारी, तंत्रज्ञ, डॉक्टर्स व सर्व बहुउद्देशीय कामगार व इतर कामगार वर्गाने आयोजित केला होता, अंतिम विजयी संघास रोख पारितोषिक व पुष्पगुच्छ देवून सन्मानित करण्यासाठी आमदार अजय चौधरी, म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेना अध्यक्ष बाबा कदम, नगरसेवक अनिल कोकिळ, दत्ता पोंगडे उपस्थित होते. सदर कार्यक्रमासाठी के. ई. एम. रूग्णालय युनिट अध्यक्ष देवेंद्र सावंत यांच्यासमवेत संजय कोईलकर, अमित बनसोडे, प्रतिक झोरे, चेतन ढोपावकर, संजय कर्वे, पी.एल. सिंग, सुमित पिंपळे, विशाल बहौत, अनुजा मांजे, समिता नाईक, आनंद कोटकर, संजय तोरे, राजाराम चव्हाण, अभिषेक जाधव, प्रशांत मोहिते यांनी विशेष मेहनत घेतली.*



# माझ्या खेळापेक्षा प्रेक्षकांचे माझे कपडे, केसांकडे लक्ष

## बुद्धिबळपटू दिव्या देशमुखच्या पोस्टने खळबळ

प्रतिनिधी
■ मुंबई

१८ वर्षीय भारतीय बुद्धिबळपटू दिव्या देशमुखने नेदरलँड्समध्ये झालेल्या टाटा स्टिल मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेत वासनांध नजरांचा आणि तशाच प्रकारच्या वागणुकीचा सामना करावा लागल्याचा आरोप केला आहे. या आरोपामुळे एकच खळबळ उडाली आहे. प्रेक्षकांना महिला बुद्धिबळपटूंच्या खेळापेक्षा त्या कशा दिसतात? कसे कपडे घालतात? कशा वावरतात, त्यांचे केस कसे आहेत यावर लक्ष केंद्रीत करण्यात जास्त रस असतो असं दिव्याने म्हटलं आहे. दिव्याने इंस्टाग्राम पोस्ट करत आपल्या मनातला संताप व्यक्त केला आहे. नेदरलँडसारख्या युरोपियन देशातील दिव्याचा हा अनुभव ऐकल्यावर क्रीडा क्षेत्रात खळबळ माजली आहे.

मागच्या काही दिवसांपासून ही गोष्ट मनात होती. मात्र मी माझी बुद्धिबळ स्पर्धा संपण्याची वाट पाहात होते. मी हे कायमच पाहिलं आहे की बुद्धिबळ स्पर्धा सुरु असताना प्रेक्षक ती स्पर्धा किंवा आमचा खेळ गांभीर्याने घेत नाहीत. टाटा स्टील मास्टर्स स्पर्धेसाठी मी नेदरलँडला गेले होते. ती स्पर्धा खूप चांगली होती. मी तिथे काही सामने खेळले. मात्र जेव्हा आम्ही खेळत होतो तेव्हा बहुतांश प्रेक्षक मी कशी दिसते?, माझे कपडे कुठले आहेत? मी कशी वावरते आहे? याकडे लक्ष देत होते. मी बुद्धिबळ कशी खेळते आहे? याच्याशी त्या प्रेक्षकांना काही घेणंदेणं नव्हतं. या दिव्या देशमुखच्या पोस्टने क्रीडा जगतात खळबळ उडाली आहे.



## जय शहा एसीसीचे अध्यक्षपद सोडणार

# आयसीसी अध्यक्ष होण्यासाठी निवडणूक लढवणार

वृत्तसंस्था
■ जाकार्ता

जय शहा आशियाई क्रिकेट परिषदेच्या (ACC) अध्यक्षपदाचा राजीनामा देऊ शकतात. भारतीय क्रिकेट नियामक मंडळात (BCCI) सचिव म्हणून कार्यरत असलेले शहा आयसीसी अध्यक्षपदासाठी निवडणूक लढवणार आहेत. त्यामुळेच ते एसीसीचे पद सोडू शकतात.

आशियाई क्रिकेट परिषदेची (एसीसी) वार्षिक सर्वसाधारण सभा आजपासून म्हणजेच मंगळवारपासून बाली, इंडोनेशिया येथे सुरू झाली आहे. ही बैठक २ दिवसांची असून ३१ जानेवारीपर्यंत चालणार आहे. एसीसीच्या प्रसारण हक्कांबाबतही या बैठकीत निर्णय घेतला जाणार आहे.

### आजपासून इंडोनेशियामध्ये बैठक



वार्षिक बैठकीत आशिया खंडातील सर्व क्रिकेट मंडळांचे सदस्य सहभागी होतील. यामध्ये एसीसी मीडिया हक्कांबाबतही निर्णय घेतला जाणार आहे. ज्या अंतर्गत आशिया कपसारख्या मोठ्या स्पर्धेचे प्रसारण केले जाते. यामध्ये अंडर-23, अंडर-19 आणि महिला आशिया कपचे सामनेही दाखवण्यात आले आहेत.

### *आयसीसी अध्यक्षपदासाठी नोव्हेंबरमध्ये निवडणूक होणार*

*अंतर्राष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) अध्यक्षपदासाठी निवडणूक दर २ वर्षांनी एकदा घेतली जाते, जय शहा यांनी सध्या त्यांच्या पदाचे एक वर्ष पूर्ण केले आहे. पुढील निवडणुकीपूर्वी ते आपले पद सोडतील असे मानले जात आहे, कारण त्यांना आयसीसी अध्यक्षपदासाठी निवडणूक लढवावी लागणार आहे. या वर्षी नोव्हेंबरमध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या निवडणुका होणार आहेत, त्याआधी शहा आयसीसीच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढवणार की नाही यावर एसीसीच्या बैठकीत निर्णय घेतला जाऊ शकतो.*

### आशिया चषक स्पर्धेचे ठिकाणही निश्चित केले जाईल

*आशिया चषक स्पर्धेच्या पुढील ठिकाणाबाबतही या बैठकीत निर्णय होणार आहे. आता आशिया कप 2025 मध्ये होणार आहे, जो टी-२० फॉरमॅटमध्ये होणार आहे. यूएई आणि ओमान या स्पर्धेच्या यजमानपदाच्या शर्यतीत आहेत. २०२३ आशिया चषक पाकिस्तानने श्रीलंका आणि पाकिस्तानमध्ये आयोजित केला होता, जो भारताने जिंकला होता.यूएई आणि ओमानला आशिया कपचे यजमानपद मिळण्याची आणखी एक समस्या आहे. केवळ पूर्ण सदस्य आशियाई मंडळालाच स्पर्धेचे यजमान हक्क मिळतात आणि दोन्ही देश सहयोगी राष्ट्रे आहेत. २०१८ आणि २०२२ मध्ये ही स्पर्धा UAE मध्ये खेळली गेली असली तरी, भारत आणि श्रीलंकेकडे तेव्हा यजमानपदाचे अधिकार होते. अशा परिस्थितीत, होस्टिंगचे अधिकार केवळ पूर्ण सदस्य मंडळाकडेच राहतील.*

## टीम इंडिया अडचणीत!

# 4 दिग्गजांशिवाय खेळणार इंग्लंडविरोधातील दुसरी कसोटी

वृत्तसंस्था
■ विशाखापट्टणम

इंग्लंडचा क्रिकेट संघ सध्या भारत दौऱ्यावर असून टीम इंडिया आणि इंग्लंड क्रिकेट संघात पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जात आहे. पण ही पाच सामन्यांची कसोटी मालिका टीम इंडियासाठी मात्र आव्हानात्मक ठरतेय एवढं मात्र नक्की. पहिल्या कसोटी सामन्यात इंग्लंडने दणदणीत विजय मिळवला आणि मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. आता दुसऱ्या कसोटीसाठी टीम इंडिया सज्ज झाली आहे. दुसऱ्या कसोटीत इंग्लंडला नमवण्यासाठी टीम इंडियाचे धुरंदर सर्वोतोपरी प्रयत्न करणार आहेत. पण यामध्ये त्यांचा अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागणार आहे.

इंग्लंडसोबतची कसोटी मालिका सुरू झाल्यापासूनच टीम इंडियाला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. याचं सर्वात मोठं कारण भारतीय क्रिकेट संघाला सातत्यानं बसणारे धक्के. सर्वात पहिला धक्का म्हणजे, टीम इंडियाचा स्टार विराट कोहलीनं मालिकेतील पहिल्या दोन सामन्यांमधून वैयक्तिक कारणासाठी त्यानं घेतलेली माघार. त्यानंतरचा धक्का बसला तो टीम इंडियाचा हुकुमी एक्का मोहम्मद शामीनं दुखापतीमुळे घेतलेली माघार. यानंतर टीम इंडिया विराट कोहली आणि मोहम्मद शामीशिवाय मालिकेतील पहिल्या हैदराबाद कसोटीत उतरला आणि अवघ्या ४ दिवसांत २८ धावांनी पराभव पत्करावा लागला.

### *'या' खेळाडूंवर दुसऱ्या कसोटी सामन्याची धुरा*

*पहिल्या कसोटी सामन्यात टीम इंडियाला विराट कोहली आणि मोहम्मद शामीची उणीव भासली. या दोघांची भरपाई कोणी करू शकलं नाही. पण आता दुसऱ्या कसोटीत जाडेजा आणि केएल राहुलच्या जागी रजत पाटीदार आणि सर्फराज अहमद यांना प्लेइंग-११ मध्ये स्थान मिळू शकतं. तर खराब कामगिरीशी झगडत असलेल्या शुभमन गिलला वगळलं जाऊ शकतं. विशाखापट्टणम कसोटीत भारतीय क्रिकेट संघ रविचंद्रन अश्विन, अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन सुंदर/कुलदीप यादव या तीन फिरकी गोलंदाजांसह मैदानात उतरू शकतो. त्यामुळे टीम इंडियाची फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही मजबूत होऊ शकते आणि इंग्लंडला भारी पडू शकते.*

### *चार दिग्गज खेळाडूंशिवाय टीम इंडिया उतरणार मैदानात*

*भारतीय क्रिकेट संघासमोरील अडचणी काही कमी होण्याचं नाव घेईनात. कोहली आणि शामीच्या धक्क्यातून सावरतात, तेवढ्यात आता इंग्लंडविरोधातील दुसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी टीम इंडियाला मोठा धक्का बसला आहे. स्टार अष्टपैलू रवींद्र जाडेजा आणि केएल राहुल दुखापतीमुळे दुसऱ्या कसोटीतून बाहेर पडले आहेत. अशा परिस्थितीत रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय क्रिकेट संघाच्या अडचणी खूप वाढल्या आहेत. दुसरा कसोटी सामन्या टीम इंडियाला चार दिग्गजांशिवाय खेळावा लागणार आहे. आता दुसरा कसोटी सामना 2 फेब्रुवारीपासून विशाखापट्टणम येथे खेळवला जाणार आहे.*

# पालिकेच्या महिला कर्मचारी सीमा माने यांनी सर केले किलिमांजारो शिखर

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान खात्यामधील एक कर्मचारी सीमा बापू माने यांनी आफ्रिका खंडातील सर्वाधिक उंचीचे माऊंट किलिमांजिरो हे शिखर प्रजासत्ताक दिनी सर करून पालिकेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. सीमा हिने २६ जानेवारी रोजी तब्बल १९,३४१ फूट (५,८९५ मी) उंची असलेल्या माऊंट किलिमांजारो शिखरावर चढाई करून ते सर केले व प्रजासत्ताक दिनी आपल्या देशाच्या संविधानाची प्रस्तावना तेथे वाचली.

हे उत्तुंग बर्फाच्छादित शिखर सर करणारी सीमा ही बहुदा बृहन्मुंबई महानगरपालिकेतील पहिली महिला कर्मचारी आहे. यापूर्वी मुंबई अग्निशमन दलातील एका पुरुष कर्मचाऱ्याने हे शिखर सर करण्याचे साहस केले होते. लहानपणापासून साहसाची आवड असलेल्या व घाटकोपरमधील भटवाडी येथे राहणाऱ्या ३८ वर्षीय सीमाने बेसिक माउंटेनिअरींग आणि ऍडव्हान्स माउंटेनिअरींग कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण करून पर्वतारोहनाचे प्रशिक्षण घेतले आहे.

ट्रेकिंगची आवड असलेल्या सीमाने या आंतरराष्ट्रीय मोहिमेआधी उत्तर भारतातील काही पर्वतरोहनाणाच्या मोहिमा यशस्वीरित्या पूर्ण केल्या होत्या.




हिमाचल प्रदेश मधील फ्रेंडशिप पीक, सिक्कीम मधील काब्रू डोम कॅम्प-१ ही शिखरे तिने सर केली आहे. त्याशिवाय सह्याद्रीमधील वजीर सुळका, स्कॉटिश कडा, तैलाबैला, नवरा व नवरी सुळका, भैरवगड आणि इतर अवघड मानल्या जाणाऱ्या मोहिमा तिने केल्या आहेत.

माऊंट किलिमांजारो मोहिमेसाठी सीमा 21 जानेवारी रोजी मुंबईहून रवाना झाली होती. तिने किबो बेस कॅम्प पासून अवघ्या 6.50 तासांत हे उत्तुंग शिखर सर केले आणि त्यादरम्यान तिला थंड वारा, उणे तापमान, माउंटन सिकनेस आदी आव्हानांना तोंड द्यावे लागले.

कृषी महाविद्यालयातून अग्रिकल्चर विषयाची संपादन करणारी सीमा गेली 15 वर्ष महापालिकेच्या सेवेत उद्यान विभागात कार्यरत आहे. भविष्यात माऊंट एव्हरेस्ट, माऊंट भागीरथी II, माऊंट सतोपंथ, माऊंट एल्ब्रूस, माऊंट कोझिस्को, माऊंट ॲकोनकाग्वा, माऊंट देनाली, माऊंट विन्सन मसिफ, आणि माऊंट कार्स्टेन्झ आदी शिखरावर मोहिमा करण्याचा तिचा मानस आहे.

या मोहिमेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका उद्यान विभाग प्रमुख मा. उद्यान अधिक्षक जितेंद्र परदेशी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### 'गेट वे' वर रंगणार महाकाव्य गीत रामायण

**मुंबई:** सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या वतीने बुधवार, 31 जानेवारीला महाकाव्य रामायण या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गेट वे ऑफ इंडिया येथे सायंकाळी 7 वाजता आयोजित या कार्यक्रमास मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. प्रेरणादायी रामायणातील महत्वाचे काही प्रसंग ग. दि. माडगूळकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून साकार झालेले व सुधीर फडके यांच्या वाणीतून अजरामर झालेले "गीत रामायण" यावेळेस दृकश्राव्य पद्धतीने सादर होणार आहे.

# टाटा वीज कंपनीचा दरवाढीचा प्रस्ताव; छोट्या घरगुती ग्राहकांवर अधिक भार

प्रतिनिधी
■ मुंबई

टाटा वीज कंपनीने १ एप्रिलपासून वीजदरवाढ करण्याचा प्रस्ताव राज्य वीज नियामक आयोगाला सादर केला आहे. हा प्रस्ताव मान्य झाल्याने मुंबईतील छोट्या घरगुती ग्राहकांना जास्त भार सहन करावा लागणार आहे. २०२२-२३ आणि २३-२४ या आर्थिक वर्षांसाठी आयोगाने मंजूर केलेले दर आणि प्रत्यक्षात मिळालेला महसूल याचा आधार घेत तूट भरून काढण्यासाठी टाटा कंपनीने हा प्रस्ताव दिला होता .

दरमहा सुमारे ३०० किंवा ५०० युनिटपर्यंत वापर करणाऱ्या घरगुती ग्राहकांना बिले पाठविणे आणि ती वसूल करणे, हे काम कठीण असते. या पार्श्वभूमीवर ०-१०० युनिटसाठी तब्बल २० टक्के वाढ प्रस्तावित असून १०० ते ३०० युनिटपर्यंत ६० टक्के व ३०१ ते ५०० युनिटपर्यंत १० टक्के वाढीचा प्रस्ताव आहे. प्रस्ताव मान्य झाल्याने टाटा कंपनीचे ५०० युनिटपर्यंतचे दर अदानींच्या कंपनीपेक्षा अधिक असतील. त्यामुळे ग्राहक अदानींकडे परतण्याची शक्यता आहे.




सध्याचे वीजदर

| युनिट | अदानी | टाटा | बेस्ट |
|---|---|---|---|
| ०-१०० | ३.१५ | ४.९६ | १.८७ |
| १०१-३०० | ५.४० | ६.९७ | ५.४६ |
| ३०१-५०० | ७.१० | ८.४० | ९.५६ |
| ५०१ पेक्षा अधिक | ८.१५ | ७.९४ | ११.७३ |

# वीर रसाच्या काव्यप्रवाहाने 'नवी उडान'चे विराट कवी संमेलन संस्मरणीय

प्रतिनिधी
■ मुंबई

देशाच्या आर्थिक राजधानी मुंबई महानगरात कला, साहित्य आणि संस्कृतीच्या संवर्धनात उल्लेखनीय भूमिका बजावणारी एक नामांकित संस्था नई उडान ट्रस्ट तर्फे हिंदू आध्यात्मिक सेवा संघाच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय कवि संमेलन बिर्ला मातोश्री सभागृहात आयोजित करण्यात आले. देशातील नामवंत कवींच्या शौर्य आणि पराक्रमाच्या प्रवर्तकांचा गौरव करणाऱ्या सशक्त रचनांच्या रोमांचक काव्यात्मक साराने आत्म्याला भिजवून एक संस्मरणीय आणि ऐतिहासिक कार्यक्रम म्हणून हे कवी संमेलन श्रोत्यांच्या स्मरणात उमटले.

यानिमित्ताने,'प्रजासत्ताक संध्याकाळ - परमवीर चक्र विजेत्यांची नावे' या नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे, संपूर्ण भारताच्या इतिहासात प्रथमच, कोणत्याही संस्थेने असा अनोखा कार्यक्रम आयोजित केला होता, ज्यामध्ये एकूण स्वातंत्र्यानंतरच्या २१ परमवीर चक्र विजेत्यांचा गौरव करण्यात आला. समारंभाला उपस्थित सर्वांनी चक्र विजेत्यांपैकी १८ दिवंगत हुतात्म्यांच्या चित्रांवर पुष्पांजलि अर्पण करून आदरांजली वाहिली आणि एक परमवीर चक्र विजेते योगेंद्र यादव यांचा अभिनंदन संदेश या समारंभात डिजिटल माध्यमातून मोठ्या स्क्रीनवर प्रदर्शित करण्यात आला. त्यांच्या समृद्ध काव्यनिर्मितीमुळे अत्यंत यशस्वी ठरलेल्या या कविसंमेलनात वीर भावनेचे प्रसिद्ध कवी विनीत चौहान, सशक्त कवयित्री कविता तिवारी, मध्य प्रदेशातील देवास शहरातील अष्टपैलू कवी शशिकांत यादव आणि उदयपूरच्या अप्रतिम वृत्तीचे युवा कवी सिद्धार्थ देऊल यांची उपस्थिती होती. यांच्या व्यतिरिक्त मुंबईच्या कवयित्री सौ.मंजू लोढा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक गुणवंत कोठारी यांनी आपल्या मान्यवर काव्य रचनांचे शानदार सादरीकरण करून श्रोत्यांना भावूक केले. सर्व काव्य रचना इतक्या प्रभावी होत्या की त्यांच्या प्रभावी सादरीकरणामुळे खचाखच भरलेल्या सभागृहातील श्रोत्यांनी 'भारत माता की जय' आणि 'जय श्री राम'चा अनेकवेळा जयघोष केला. यावेळी भारत सरकारच्या वतीने पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल व ज्येष्ठ राजकारणी राम नाईक यांचा आयोजक संस्थांच्या वतीने मन:पूर्वक सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला संबोधित करताना नाईक यांनी पेट्रोलियम मंत्री असताना कारगिलमधील सर्व शहीद जवानांच्या कुटुंबीयांना पेट्रोल पंप देण्याबद्दल आणि लखनौच्या हुतात्मा स्मारकाची माहिती दिली. हिंदू आध्यात्मिक सेवा संघाचे मार्गदर्शक आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक गुणवंत कोठारी यांना त्यांच्या अतुलनीय देशभक्तीपर सेवांसाठी सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमात विविध सामाजिक कार्यकर्त्यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल नई उडान संस्थेतर्फे सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि ज्येष्ठ राजकारणी राज पुरोहित यांच्याशिवाय, नई उडान संस्थेचे अध्यक्ष बीसी जैन भालावत, उपाध्यक्ष गणपत कोठारी, राकेश चोप्रा, अशोक छाजेड, हिंदू आध्यात्मिक सेवा संघाचे अध्यक्ष अमर शर्मा, वनवासी कल्याण आश्रम, सिल्वासाचे अध्यक्ष ललित बाहेती आदी मान्यवर उपस्थित होते. ज्येष्ठ समाजसेवक अनिल मुनोत, मंगलचंद सेठ, हिरालाल मेहता, प्रशांत झवेरी, नितेश धाकड, गणपत डागलिया आणि डॉ. रमेश निर्मल यांच्यासह अनेक प्रमुख अधिकारी सहभागी झाले होते, ज्यांनी हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. वीरेंद्र याज्ञिक आणि संजय राजा जैन यांनी समारंभाचे कुशल सूत्रसंचालन केले. शेवटी समन्वयक शांतीलाल बी जैन यांनी सर्वांचे आभार मानले. राष्ट्रगीताने सुरू झालेल्या या सोहळ्याची सांगता वंदे मातरमच्या मधुर गीताने झाली.

### परमवीर चक्र विजेत्यांच्या नावाने 'प्रजासत्ताक संध्याकाळ '




# राहुल नार्वेकर व डॉ. नीलम गोऱ्हे यांचे महात्मा गांधीना अभिवादन

### मौन पाळत स्मृतीस वंदन



प्रतिनिधी
■ मुंबई

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना पुण्यतिथी निमित्त विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर व विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आहे. यावेळी, आमदार अभिमन्यू पवार, विधीमंडळ सचिव-१, जितेंद्र भोळे, मुख्य सुरक्षा अधिकारी प्रदीप चव्हाण यांसह विधीमंडळ अधिकारी व कर्मचारी वर्गाने महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

तत्पुर्वी, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे आणि विधीमंडळ सचिवालयातील अधिकारी, कर्मचारी यांनी हुतात्मा दिनानिमित्त दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून मौन पाळत हुतात्म्यांच्या स्मृतीस अभिवादन केले.

गांधीजींच्या सत्याग्रह, दांडी यात्रा यांमधून जगभरातील लोकांनी प्रेरणा घेतली आहे. महात्मा गांधी यांच्या तत्वज्ञानाचा देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी हे कायमच आदर करत आले आहेत. सर्वांनी स्वच्छता व श्रमसंस्काराच्या माध्यमातून महात्मा गांधींच्या स्मृतीस अभिवादन करावे असे उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

# सैनिकांचा अपमान करणारी 'अग्निवीर' योजना रद्द करा - सुभेदार (नि) टी. एम. सुर्यवंशी

प्रतिनिधी
■ मुंबई

केंद्र सरकारने लष्करासाठी लागू केलेली 'अग्निवीर' योजना फसवी असून सैनिकांचा अपमान करणारी आहे. या योजनेत केवळ ४ वर्षांची सेवा करण्याची संधी दिली जाते, वेतन केवळ २१ हजार आणि निवृत्तीनंतर कोणतेही लाभ दिले जात नाहीत. 'अग्निवीर' योजनेतून लष्करात चार वर्ष सेवा केल्यानंतर या सैनिकांना ऐन उमेदीच्या वयातच वाऱ्यावर सोडले जाते. अग्निवीर योजना ही कुचकामी व सैनिकांचा अपमान करणारी असल्याने सरकारने ही योजना रद्द करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या माजी सैनिक विभागाचे अध्यक्ष सुभेदार (निवृत्त) टी. एम. सुर्यवंशी यांनी केली आहे.

गांधी भवन येथे पत्रकांशी बोलताना सुभेदार (निवृत्त) टी. एम. सुर्यवंशी म्हणाले की, भारतीय लष्करी सेवेत भरती होणारा जवान देशासाठी बलिदान देण्यासाठीही तयार असतो. १५ ते २० वर्षांची देशसेवा करण्याची त्यांना संधी मिळते आणि निवृत्तीनंतर या सैनिकांना निवृत्ती वेतन, मेडीकल सुविधांसह विविध सुविधाही मिळतात. अग्निवीरांना वेतन केवळ २१ हजार रुपये मिळते. सेवेनंतर निवृत्ती वेतन मिळणार नाही, ग्रच्युईटी, मेडीकल सुविधा, कॅन्टिन सुविधा मिळणार नाही, अग्निवीरच्या कुटुंबालाही कोणत्याच सेवा मिळणार नाहीत. शहिदाचा दर्जा मिळणार नाही, सैनिक शहीद झाल्यानंतर त्याच्या कुटुंबाला ७५ लाख रुपयांची रक्कम मिळते, अग्निवीराच्या कुटुंबाला मात्र केवळ ४५ लाखांची विमा रक्कम मिळते. जवानांना मिळणाऱ्या ५५ लाख रुपयांच्या सानुग्रह अनुदानाच्या जागी ४४ लाख रुपयेच मिळतील. अग्निवीर ही योजना फसवी असून जवानांचा अपमान करणारी असल्याने ही योजनाच रद्द करावी.

यावेळी बोलताना ले. कर्नल (निवृत्त) चंद्रशेखर रानडे म्हणाले की, अग्निवीर योजना ही चुकीची आहे, या योजनेमुळे राष्ट्रीय सुरक्षेला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. केवळ चार वर्षांची सेवा असणारी अग्निवीर योजना ही सैनिकांचे मनोधैर्य खच्चीकरण करणारी आहे. माजी सैनिकांच्या विविध समस्या सरकार सोडवू शकत नाही ते अग्निवीरांच्या समस्या काय सोडवणार? लष्करी सेवेत रुजू झाल्यानंतर युद्धनिती समजण्यासच जवानांना चार-पाच वर्षे लागतात. सरकार जरी अग्निवीरांना निवृत्तीनंतर नोकरी देणार असे सांगत असले तरी जे सैनिक पूर्णवेळ १५-२० वर्षांच्या सेवेतून निवृत्त होतात त्यांनाही सरकार नोकरी देऊ शकत नाही तर अग्निवीरांना कुठुन देणार? अग्निवीर योजना ही लष्करात भरती होऊन देशसेवा करण्याची इच्छा असणाऱ्यांच्या स्वप्नावर पाणी फेरणारी आहे, असेही चंद्रशेखर रानडे म्हणाले.




## पुणे महानगरपालिका, पुणे

**निविदा प्रकिया कक्ष पथ विभाग**

**निविदा जाहिरात - नविन कामे**

जाहिरात क्र. २/१७०३ दि. ३०/१/२०२४

विक्री कालावधी दिनांक:- ३१-०१-२०२४०९:०० सकाळी ते १४-०२-२०२४ १४:३० दुपारी पर्यंत
स्वीकृती दिनांक:- :- ३१-०१-२०२४०९:०० सकाळी ते १४-०२-२०२४१४:३० दुपारी पर्यंत तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया
दिनांक: १६-०२-२०२४०३:०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किमंत रु. | अंदाजित पूर्व गणित रक्कम रु | बयाणा रक्कम रु | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पीएमसी / गेड / २०२३ / ३९५ | पथ | प्रभाग क्रमांक २६ क मधील विविध रस्ते विकसित करणे व स.नं. २८ व १४ मधील १८ मी डी.पी. रस्ते विकसित करणे. | रु ६०७९/- | रु १६८६६८११/- | रु १५००००/- | ६ | गौतम गोविंद गावंड ७४४७४७२४०६ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी / शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामाचे निविदा www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यसाठी उपलब्ध आहे. निविदा मंचाची विक्री व स्वीकृत सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पधतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा प्रकियाच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाईन निविदा प्रकिया बाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न. पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि) / ३२ दिनाक २२/०४/२०१६ नुसार बयाना रक्कम इ.सी एम./आर.टी.जी.एस./एन. एफ. टी सुविधेमार्फतच स्वीकास्नेत येणार आहे.

**(स्वाक्षरी/-)**
**Hritik Ganpat Talape**
**टेंडर लिपिक**
**पथ**
**पुणे महानगरपालिका**

**(स्वाक्षरी/-)**
**Shri. Sandip Ranaware**
**कार्यकारी अभियंता**
**पथ**
**पुणे महानगरपालिका**

**(स्वाक्षरी/-)**
**Sahebrao Dandge**
**अधीक्षक अभियंता**
**पथ**
**पुणे महानगरपालिका**

जावक क्र. : मावजसंका / २१८७
दिनांक : ३०/१/२०२४

## अबेईमध्ये संयुक्त राष्ट्र शांतता सैनिकासह 52 जणांची हत्या

**सुदान:** सुदान आणि दक्षिण सुदान या दोन्ही देशांनी दावा केलेला तेल समृद्ध प्रदेश अबेई येथील गावकऱ्यांवर बंदूकधाऱ्यांनी हल्ला केला आहे, ज्यात संयुक्त राष्ट्र शांतता सैनिकासह 52 लोक ठार झाले आहेत आणि 64 जखमी झाले आहेत. सध्या अबेई प्रदेश दक्षिण सुदानच्या ताब्यात आहे. हल्ल्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, जमिनीच्या वादातून हा हल्ला झाल्याचा संशय आहे. युनायटेड नेशन्स इंटरिम सिक्युरिटी फोर्स फॉर अबेई (UNISFA) ने हिंसाचाराचा निषेध केला आहे. UNIFSA ने हिंसाचारात आपल्या एका शांतता सैनिकाच्या मृत्यूची पुष्टी केली आणि सांप्रदायिक हिंसाचारामुळे अनेक बळी गेल्याचे सांगितले. निवेदनात म्हटले आहे की, सशस्त्र गटाने अबेई येथील UNIFSA तळावर हल्ला केला. मात्र मिशनने हल्ला परतवून लावला, परंतु दुःखदपणे एक शांततारक्षक ठार झाला.



## भारतीय फलंदाजाला विषबाधा, ICU मध्ये उपचार

### पिण्याच्या पाण्यात ॲसिड मिसळल्याची शक्यता

वृत्तसंस्था
त्रिपुरा

भारतीय क्रिकेट संघाचा खेळाडू आणि कर्नाटक रणजी संघाचा कर्णधार मयांक अग्रवाल याला विमानात विषबाधा झाल्याची माहिती समोर आली आहे. फ्लाइटमध्ये पाणी प्यायल्याने अग्रवाल आजारी पडला आणि त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

त्रिपुरातील आगरतळा येथून सुरतला जात असताना ही घटना घडली. मयांकने सीटसमोर ठेवलेले पाणी प्यायले. पाणी प्यायल्याबरोबर त्याची जीभ, तोंड आणि गाल भाजल्यासारखे झाले. मयांकला बोलता येत नव्हते. त्याला तातडीने आगरतळा येथील आयएलएस



रुग्णालयात हलवण्यात आले.


अग्रवाल याच्यावर रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. विमानातील कर्मचाऱ्यांनी पाण्याची बाटली ताब्यात घेऊन तपास सुरू केला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पिण्याच्या पाण्यात ॲसिड मिसळल्याचा संशय आहे. हाती आलेल्या वृत्तानुसार तो आऊट ऑफ डेंजर आहे...

## इम्रान यांना 10 वर्षांचा तुरुंगवास

वृत्तसंस्था
इस्लामाबाद

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान आणि पीटीआयचे अध्यक्ष इम्रान खान यांना १० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. सिफर प्रकरणात त्यांना ही शिक्षा झाली आहे. त्यांच्यासोबत पीटीआयचे उपाध्यक्ष शाह महुम्मद कुरेशी यांना देखीमल १० वर्षांची शिक्षा झाली आहे. या शिक्षेमुळे इम्रान खान यांची राजकीय कारकीर्द संपुष्टात येण्याच शक्यता आहे.

विशेष कोर्टाने ऑफिशियल सिक्रेट ॲक्टच्या अंतर्गत ही शिक्षा सुनावली असल्याचं पाकिस्तानच्या डॉन वृत्तपत्राने सांगितलं आहे. पाकिस्तानमध्ये ८ फेब्रुवारी रोजी सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत.




त्याआधी इम्रान खान यांना झालेल्या या शिक्षेमुळे त्यांच्या पीटीआय पक्षाला मोठे नुकसान सहन करावे लागू शकते.

इम्रान खान (वय ७१) आणि कुरेशी (६७) यांना रावलपिंडीच्या अदियाला तुरुंगात ठेवण्यात आले आहे. गोपनीय राजनैतिक कागदपत्रं उघड केल्याप्रकरणी त्यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. इम्रान खान यांनी आपल्यावरील कारवाई राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा दावा केला होता. सिफर प्रकरणाचा संबंध गोपनीय राजनैतिक कागदपत्रांविषयींच्या खुलाशांशी आहे. इम्रान खान यांनी २७ मार्च, २०२२ मध्ये एका सार्वजनिक सभेला संबोधित करताना दावा केला होता की, त्यांचे सरकार पाडण्यासाठी आंतरराष्ट्रीय कट रचला जात आहे. यावेळी त्यांनी काही कागदपत्रे जनतेसमोर ठेवली होती.त्यानंतर त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. इम्रान खान यांना शिक्षा सुनावण्यात आल्यानंतर त्यांचा पक्ष पाकिस्तान तहरीक ए इंसाफवर बंदी आणली जाऊ शकते. निवडणुकीला काही दिवस शिल्लक असताना ही कारवाई जाहीर झाली असल्याने यावरुन पक्षाने लष्करावर आरोप केले आहेत. माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांच्या पक्षाची ताकद वाढताना दिसत आहे.

## मल्ल्या-अदानीचे कर्ज माफ केले जाते पण शेतकऱ्यांचे नाही...

### राहुल गांधींचा मोदी सरकारवर हल्लाबोल



वृत्तसंस्था
पूर्णिया

बिहारमध्ये काँग्रेसच्या भारत जोडो न्याय यात्रेचा आज दुसरा दिवस आहे. राहुल गांधी मंगळवारी सकाळी पूर्णियाला पोहोचले. तेथे त्यांनी गढबनेल्ली नवोदय विद्यालयातील मुलांची भेट घेतली. त्यानंतर राहुल गांधी यांनी शिसाबारी येथील किसान चौपालमध्ये शेतकऱ्यांची भेट घेतली.

ते म्हणाले की, देशाचे सरकार माल्या आणि अदानीचे कर्ज माफ करत आहे. मात्र शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले जात नाही. यावेळी राहुल गांधी डोक्यावर टॉवेल बांधून कॉटवर बसलेले दिसले. राहुल गांधींनी शेतकऱ्यांच्या हातून कुल्हडमधील चहा प्यायला. त्यांच्यासोबत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश, कन्हैया कुमार, बिहार प्रदेशाध्यक्ष अखिलेश सिंह हेही उपस्थित होते.

तत्पूर्वी, राहुल गांधी यांनी अररिया येथे महात्मा गांधींना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली वाहिली. काँग्रेसने सोशल मीडियावर लिहिले की, न्यायाचा हा महान प्रवास गांधीजींच्या विचारांनी प्रेरित आहे आणि जो कोणी ही विचारसरणी चिरडण्याचा प्रयत्न करेल त्याविरोधात आम्ही उभे राहू.

काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी सोशल मीडियावर लिहिले की, 76 वर्षांपूर्वी याच दिवशी द्वेष पसरवणाऱ्या शक्तींनी महात्मा गांधींची हत्या केली होती. त्यांच्या स्मरणार्थ आज सकाळी बिहारमधील अररिया येथील भारत जोडो न्याय यात्रेच्या शिबिराच्या ठिकाणी प्रार्थना सभेचे आयोजन करण्यात आले होते.

त्या विचारधारेविरोधात आणि त्यावर विश्वास ठेवणाऱ्यांविरोधात आमचा लढा सुरूच राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. ज्यांनी महात्माजींना त्यांच्या हयातीत विरोध केला, त्यांना नाकारले आणि शेवटी त्यांची हत्या केली, पण आता त्यांचा वारसा हिसकावून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. गोडसेंचा गौरव करणाऱ्यांना 'आयडिया ऑफ इंडिया'ची व्याख्या करू देऊ नये आणि दिली जाणार नाही.

आज न्याय यात्रा अररियाहून पूर्णियातील रंगभूमी मैदानावर पोहोचेल. येथे राहुल तासभर सभेला संबोधित करतील. सोमवारी (29 जानेवारी) त्यांनी आरएसएस आणि भाजपवर हल्लाबोल केला, परंतु मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्याबद्दल काहीही बोलले नाही.

## झारखंड मुख्यमंत्री सोरेन 31 तासांनी रांचीत आले समोर



वृत्तसंस्था
रांची

ईडीच्या तपासामुळे झारखंडमध्ये राजकीय पेच निर्माण झाला आहे. मुख्यमंत्री हेमंत सोरेन ईडीच्या चौकशीला टाळताना दिसत आहेत. सोमवारी ईडीचे पथक दिल्लीत दिवसभर त्यांचा शोध घेत होते, मात्र सोरेनचा यांचा शोध लागला नाही. मुख्यमंत्री सोरेन आता अतिशय नाट्यमय पद्धतीने रांचीला पोहोचले आहेत. ते आमदारांची बैठक घेत आहेत. या बैठकीत त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी कल्पना सोरेनही उपस्थित आहेत. त्यांच्या जागी ते पत्नीला राज्याचे मुख्यमंत्री करू शकतात, अशी चर्चा आहे. सोमवारी ईडीचे पथक दिल्लीतील त्यांच्या घरी पोहोचले, मात्र ते बेपत्ता असल्याचे आढळून आले. यानंतर ईडीने त्यांच्या घरातून २ बीएमडब्ल्यू कार आणि काही रोकड जप्त केली. ईडीची टीम वाट पाहत राहिली पण सीएम सोरेन यांचा काहीही पत्ता लागला नाही. तर त्यांचे चार्टर्ड विमान दिल्ली विमानतळावरच उभे होते.

## केरळात भाजप नेत्याच्या हत्येप्रकरणी 14 जणांना मृत्युदंड

वृत्तसंस्था
तिरुवनंतपुरम

भाजप नेत्याच्या हत्येप्रकरणी केरळ न्यायालयाने प्रतिबंधित इस्लामिक संघटना पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) च्या १४ कार्यकर्त्यांना फाशीची शिक्षा सुनावली आहे. 19 डिसेंबर 2021 रोजी भाजपच्या ओबीसी शाखेचे नेते रणजीत श्रीनिवासन यांची हत्या करण्यात आली होती.

मावेलिक्कारा अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश व्हीजी श्रीदेवी यांनी हा निकाल दिला. मृत नेत्याच्या वकिलाने सांगितले की, शिक्षा झालेले सर्व आरोपी ट्रेंड किलर स्क्वाडचा भाग होते. रणजीत यांची आई, पत्नी आणि मुलासमोर ज्या क्रूर आणि निर्दयी पद्धतीने हत्या करण्यात आली, त्यामुळे हा खून दुर्मिळ गुन्ह्यांच्या श्रेणीत येतो. या घटनेबाबत पोलिसांनी सांगितले होते की, 19 डिसेंबर 2021 रोजी रणजित श्रीनिवास अलाप्पुझा शहरातील त्यांच्या घरी मॉर्निंग वॉकसाठी तयार होत असताना



हल्लेखोर त्यांच्या घरात घुसले. यावेळी त्यांची आई, पत्नी आणि मूलही घरात होते.

या हल्लेखोरांनी भाजप नेत्याला बेदम मारहाण केली. गंभीर जखमी झाल्याने रणजित यांचा जागीच मृत्यू झाला. रणजीत यांनी नुकतीच भाजपचे उमेदवार म्हणून विधानसभा निवडणूक लढवली होती. ते पेशाने वकील होते. सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया (SDPI) नेत्याची रंजीत श्रीनिवास यांच्या हत्येच्या एक दिवस

### पीएफआयशी संबंधित लोकांनी घरात घुसून त्यांना मरेपर्यंत केली होती मारहाण

आधी हत्या करण्यात आली होती. 18 डिसेंबरच्या रात्री एसडीपीआयचे राज्य सचिव केएस शान आपल्या बाईकवरून घरी परतत असताना त्यांना एका कारने धडक दिली. यानंतर त्यांच्यावर चाकूने अनेक वार करण्यात आले. जखमी अवस्थेत त्यांना रुग्णालयात नेण्यात आले, तेथे त्यांचा मृत्यू झाला.

या हत्येसाठी भाजप आणि एसडीपीआयने एकमेकांवर आरोप केले होते. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस सीटी रवी म्हणाले की, सीपीएमच्या नेतृत्वाखालील केरळ सरकारने देवाच्या देशाला जिहादींसाठी नंदनवन बनवले आहे.केंद्रीय मंत्री व्ही. मुरलीधरन यांनीही या हल्ल्यांचा निषेध केला. त्यांनी केरळमध्ये गुंडगिरीचा आरोप केला आणि राज्य हत्याकांडात बदलत असल्याचे सांगितले.

एसडीपीआयने आरएसएस कार्यकर्त्यांवर हल्ल्याचा कट रचल्याचा आरोप केला होता. पक्षाचे प्रमुख एमके फैजी यांनी सोशल मीडियावर लिहिले होते की, 'या घटना संघ परिवाराच्या जातीय हिंसाचाराचा आणि राज्यात सलोखा बिघडवण्याच्या अजेंडाचा भाग आहेत.

## अनैसर्गिक संबंधामुळे मुलाने केली मित्राची हत्या

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

दिल्लीमध्ये एका २० वर्षीय मुलाने आपल्या मित्राची हत्या केल्याचे धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनैसर्गिक संबंध ठेवण्याच्या मागणीला कंटाळलेल्या मुलाने आपल्या मित्राची हत्या केली. दिल्ली उत्तर झोनचे पोलीस आयुक्त आयुक्त मनोज कुमार मीणा यांनी सांगितले की, १९ जानेवारी रोजी काश्मीर गेट पोलीस ठाण्याला सदर गुन्ह्याची माहिती मिळाली. प्रत्यक्षदर्शींनी माहिती दिली की, डीडीए पार्क, मोरी गेट येथील निर्जन स्थळी एक मृतदेह पडलेला असून त्याचा चेहरा ठेचण्यात आला आहे. पोलिसांनी गुन्हे अन्वेषण विभाग आणि न्यायवैद्यक प्रयोगशाळेच्या तज्ज्ञांना घटनास्थळी पाचारण केले. दोन्ही पथकांनी गुन्हा घडलेल्या जागेची कसून तपासणी केली. घटनास्थळी तपासणी झाल्यानंतर मृतदेह रुग्णालयात पाठविण्यात आला. काश्मीर गेट पोलीस ठाण्यात कलम ३०२ अंतर्गत हत्येचा गुन्हा दाखल केल्यानंतर पोलिसांनी पुढील तपास सुरू केला, अशी माहिती मीणा यांनी दिली.

## चंदीगडमध्ये अखेर भाजपचा महापौर

वृत्तसंस्था
चंदीगड

संपूर्ण देशाचं लक्ष लागून राहिलेल्या चंदीगड महापालिकेच्या महापौर पदाच्या निवडणुकीत भाजपचे मनोज सोनकर विजयी झाले आहेत. भाजपसाठी ही निवडणूक महत्त्वाची होती. त्या प्रमाणं इंडिया आघाडीसाठी देखील ही निवडणूक प्रतिष्ठेची होती. कारण आप आणि काँग्रेसकडे या निवडणुकीसाठी बहुमत होतं. मात्र, भाजपनं या निवडणुकीत यश मिळवलं



आहे. काँग्रेस आणि आपच्या ८ नगरसेवकांची मतं बाद ठरवण्यात आली आणि भाजपचला विजय मिळाला.

चंदीगड महापालिकेत दरवर्षी महापौर आणि उपमहापौर पदांची निवडणूक होते. यंदाच्या निवडणुकीत काँग्रेस आणि आप एकत्र आले होते. त्यामुळं आप आणि काँग्रेसचा महापौर या महापालिकेत असेल, अशी शक्यता निर्माण झाली होती. मात्र, तसं काही घडलेलं नाही. चंदीगड महापालिकेत भाजपकडे १४ नगरसेवक, काँग्रेसकडे ७, आपकडे १३, शिरोमणी अकाली दलाचा एक नगरसेवक आहे. तर, चंदीगडच्या खासदारांना एक मत देण्याचा अधिकार आहे.

महापालिकेतील संख्याबळानुसार काँग्रेस आणि आपचा महापौर होण्याची शक्यता होती. मात्र, ऐनवेळी आप आणि काँग्रेसची ८ मतं बाद ठरवली गेल्यानं भाजपचा विजय झाला.

## पोलीस, न्यायाधीशांना आधी प्रशिक्षण द्या

### सुप्रीम कोर्टाने गुजरात सरकार, हायकोर्टाला झापले

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

देशभरातून सर्वोच्च न्यायालयासमोर विविध प्रकारच्या याचिका दाखल केल्या जातात. अनेक याचिका या कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरोधात आव्हान म्हणून दाखल केल्या जातात. सर्वोच्च न्यायालय या सर्व याचिकांवर सुनावणी घेत निकाल देत असते. मात्र, सर्वोच्च न्यायालयासमोर एक असेच प्रकरण सुनावणीसाठी आले असता, न्यायाधीशांना संताप व्यक्त करत गुजरात सरकार आणि गुजरातउच्च न्यायालयाला चांगलेच झापले आहे.

एका उद्योजकाला अटकपूर्व जामीन मंजूर केला असताना, त्याला पोलीस कोठडी सुनावल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने गुजरात उच्च न्यायालय व गुजरात सरकारची कानउघाडणी केली. हा प्रकार म्हणजे 'न्यायालयाचा धडधडीत अवमान' आहे, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने या प्रकारांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

गुजरातमध्ये न्यायाधीश आणि पोलिसांना प्रशिक्षणाची गरज आहे, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदविले. उद्योगपती रजनीकांत शहा यांना ८ डिसेंबर २०२३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला होता. मात्र गुजरातमधील एका न्यायदंडाधिकारी न्यायालयाने शाह यांना १३ ते १६ डिसेंबर या कालावधीत पोलीस कोठडी सुनावली. याविरोधात शहा यांनी सर्वोच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल केली. याचिकाकर्त्याला पोलीस कोठडी देणे ही चुक होती. त्याचे समर्थन केले जाऊ शकत नाही, करूही नये. गुजरातमध्ये अटकपूर्व जामीन मंजूर करताना तपास अधिकाऱ्याला कोठडी मागण्याचा अधिकार कायम असल्याचा उल्लेख केला जातो, असे याचिकाकर्त्यांच्या वकिलांकडून सांगण्यात आले. यावर, ८ डिसेंबर अटकपूर्व जामीनाचे आदेश स्पष्ट होते आणि दंडाधिकारी व पोलीस अधिकाऱ्यांना त्याची माहिती होती. गुजरातला प्रशिक्षित करण्याची गरज आहे. तुमच्या अहमदाबादला उत्तम प्रशिक्षण केंद्र आहे. दंडाधिकाऱ्यांना तेथे प्रशिक्षित करण्याची गरज आहे, असे खंडपीठाने सांगितले. तसेच यापूर्वीच्या सुनावणीत गुजरातमध्ये वेगळेच कायदे असल्याचे दिसते, अशी खोचक टिपण्णी न्यायालयाने केली होती.

## माजी परराष्ट्र मंत्री जसवंत सिंह यांच्या सूनेचा अपघातात मृत्यू

**भोपाळ ।** भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी परराष्ट्र मंत्री जसवंत सिंह यांचा मुलगा मानवेंद्र सिंह आणि त्यांची पत्नी चित्रा सिंह यांच्या गाडीचा अल्वरमध्ये अपघात झाला. जसवंत सिंह यांची सून चित्रा सिंह यांचा अपघातातमृत्यू झाला आहे. माजी खासदार मानवेंद्र सिंह हे त्यांच्या पत्नीसह भाजपा सोडून २०१८ मध्येच काँग्रेसमध्ये दाखल झाले. मानवेंद्र त्यांच्या मुलासह गंभीर जखमी झाले असून दोघांवर उपचार सुरू आहेत. मंगळवारी सायंकाळी दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गावर हरयाणा सीमेजवळील अलवरच्या नौगाव जवळ खुशपुरी

## हायकोर्टाचा 8 हिंदू-मुस्लिम जोडप्यांना सुरक्षा देण्यास नकार

वृत्तसंस्था
प्रयागराज

अलाहाबाद उच्च न्यायालयाने सोमवारी 8 हिंदू-मुस्लिम जोडप्यांना सुरक्षा देण्यास नकार दिला. न्यायालयाने सांगितले की, हे विवाह उत्तर प्रदेश धर्म परिवर्तन प्रतिबंध कायद्याच्या विरोधात आहेत. विवाहापूर्वी धर्मांतराची कायदेशीर प्रक्रिया पाळली जात नव्हती, त्यामुळे हे विवाह कायद्यानुसार वैध नाहीत.

न्यायमूर्ती सरल श्रीवास्तव यांनी मुरादाबादसह इतर जिल्ह्यांतील 8 स्वतंत्र याचिका फेटाळल्या. तथापि, न्यायालयाने म्हटले की याचिकाकर्त्यांनी कायदेशीर प्रक्रियेचे पालन केल्यानंतर लग्न केले तर ते पुन्हा संरक्षण मागू शकतात. 8 जोडप्यांपैकी 5 मुस्लिम तरुणांनी हिंदू महिलांशी आणि 3 हिंदू तरुणांनी मुस्लिम महिलांशी लग्न केले. कुटुंबाकडून जीवाला धोका असल्याचे सांगत जोडप्यांनी न्यायालयात याचिका दाखल करून सुरक्षेची मागणी केली होती. यासोबतच कुटुंबियांना त्यांच्या वैवाहिक जीवनात ढवळाढवळ थांबवण्यास सांगण्याची विनंती न्यायालयाला करण्यात आली.

सुमारे 8 महिन्यांपूर्वी बेंगळुरूमध्ये एका मुस्लिम व्यक्तीला लग्नाच्या बहाण्याने एका महिलेचे धर्मांतर केल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. कर्नाटकात धर्मांतरविरोधी कायद्यांतर्गत दाखल झालेला हा पहिलाच गुन्हा होता. 5 ऑक्टोबर रोजी 19 वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याची घटना उघडकीस आली. त्यानंतर 6 ऑक्टोबर रोजी मुलीच्या आईने यशवंतपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## कर्नाटकच्या शाळेत 2 मुलींना शौचालय साफ करायला लावले

### व्हिडिओ व्हायरल; मुख्याध्यापक निलंबित

वृत्तसंस्था
बंगळुरु

कर्नाटकात शाळकरी मुलांना शौचालय स्वच्छ करायला लावल्याचे आणखी एक प्रकरण समोर आले आहे. सोमवारी (29 जानेवारी) चिक्कबल्लापूरच्या वरिष्ठ प्राथमिक शाळेतील दोन मुली शौचालय साफ करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला होता.

शिक्षण विभागाने याप्रकरणी तत्काळ कारवाई करत शाळेच्या मुख्याध्यापकाला निलंबित केले. याशिवाय मुलींचे जबाबही नोंदवण्यात आले आहेत. कर्नाटकात दोन महिन्यांत मुलांना शौचालये स्वच्छ करण्याची ही चौथी घटना आहे. यापूर्वी डिसेंबर 2023 मध्ये कर्नाटकातील बंगळुरू, कोलार आणि शिवमोग्गा येथे तीन प्रकरणे समोर आली होती. उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी 22 डिसेंबर रोजी या प्रकरणांबद्दल चिंता व्यक्त केली होती.

कर्नाटकातील शिवमोग्गा जिल्ह्यातील गुड्डा नेरलाकेरे गावातील एका शाळेचा व्हिडिओ 28 डिसेंबर रोजी



व्हायरल झाला होता. यामध्ये सहावी वर्गातील दोन मुले शौचालयात झाडू मारताना दिसले. घटनेनंतर मुख्याध्यापक म्हणाले - मुलांना फक्त टॉयलेट फ्लश करायला सांगितले होते, त्यांना टॉयलेट साफ करायला लावले नाही.

बंगळुरूच्या अंधारली येथील शाळेचा हा व्हिडिओ 22 डिसेंबर रोजी सोशल मीडियावर व्हायरल झाला होता.

22 डिसेंबर रोजी बेंगळुरूच्या अंधारली भागातील एका प्राथमिक शाळेत दोन मुलांना शौचालय स्वच्छ करायला लावले होते. यानंतर पालकांनी शाळा प्रशासनाविरोधात निदर्शने केली. यानंतर शाळेच्या मुख्याध्यापकाला निलंबित करण्यात आले. कोलारमध्ये 7 विद्यार्थ्यांनी स्वच्छतागृहाची स्वच्छता करून सेप्टिक टँकमधील कचरा हाताने गोळा केला. 17 डिसेंबर रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मोरारजी देसाई निवासी शाळेचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. यामध्ये 7 विद्यार्थी स्वच्छतागृहे व सेप्टिक टाक्यांची स्वच्छता करताना दिसले.

## अमेरिकेत आणखी एका भारतीय विद्यार्थ्याचा मृत्यू

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

अमेरिकेच्या इंडियाना राज्यात नील आचार्य या भारतीय विद्यार्थ्याचा रविवारी मृत्यू झाला. पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी साडेअकरा वाजता पर्ड्यू युनिव्हर्सिटी कॅम्पसमध्ये एक मृतदेह असल्याची माहिती त्यांना मिळाली. यानंतर पोलिसांनी नीलच्या मृत्यूला दुजोरा दिला. वास्तविक, नीलची आई गौरी आचार्य यांनी सोशल मीडियावर नील सुमारे 12 तासांपासून बेपत्ता असल्याची माहिती दिली होती. शनिवारी तो कॅबने कॉलेजला पोहोचला तेव्हा त्याला अखेरचे पाहण्यात आले. या पोस्टनंतर शिकागोमध्ये उपस्थित असलेल्या भारताच्या वाणिज्य दूतावासाने सांगितले होते की, ते पर्ड्यू विद्यापीठाच्या संपर्कात आहेत. नीलचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. बेपत्ता झाल्यानंतर नीलच्या आईने हा फोटो सोशल मीडियावर शेअर केला होता. त्यांनी नीलला शोधण्यासाठी मदत मागितली होती.

## भारताने पाकिस्तानी जहाज समुद्री डाकूपासून सोडवले

### 19 पाकिस्तानी नाविकांची सुटका

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

भारताने पुन्हा एकदा पाकिस्तानला मदत केली आहे. शत्रूत्व विसरुन भारताने पाकिस्तानला ही मदत केली आहे. सोमालिया डाकूंनी पाकिस्तानी जहाजाचे अपहरण केले होते. पाकिस्तानी मासेमारांचे हे जहाज होते. त्यात 19 पाकिस्तानी नाविक होते. भारतीय नौदलाने 36 तासांच्या आता या सर्वांची सुटका केली. भारताच्या आयएनएस सुमित्रा युद्धानौकेद्वारे हे अभियान चालवले गेले. तसेच नौदलाने सोमालियाजवळ असणारे एक मासे पकडण्याचे जहाज 'अल नईमी' आणि त्यावरील लोकांनाही वाचवले.

पाकिस्तानच्या अपहरण झालेल्या जहाजात 19 पाकिस्तानी नाविक होते.



सोमवारी रात्री सोमलिया डाकूंनी या सर्वांचे अपहरण केले होते. भारतीय नौदलास यासंदर्भातील माहिती मिळताच ऑपरेशन सुरु करण्यात आले. सर्व पाकिस्तानी नाविकांची सुटका केली. मागील 24 तासांत भारतीय नौदलाने 19 पाकिस्तानी आणि 17 ईराणी नागरिकांना समुद्र लुटारुपासून वाचवले.

इराणी मासेमारी करणाऱ्या जहाज अल नईमीवर सशस्त्र समुद्र डाकू होते. त्यांनी सर्व इराणी मासेमारांना बंधक बनवले होते. भारताच्या आयएनएस सुमित्रा युद्धनोकेने त्या इराणी जहाजाला थांबवले. त्यानंतर समुद्री डाकूंना सर्व जणांना सोडून देण्यास भाग पाडले. आयएनएस सुमित्रा हे जहाज भारतीय तटरक्षक दलाचे आहे. समुद्री डाकूंपासून इतर जहाजांना सुरक्षा देण्याचे कामगिरी या जहाजावर सोपवण्यात आली आहे. कोचीनपासून 800 मैल लांब असणाऱ्या जहाजांना आयएनएस सुमित्राने वाचवले.

लाल समुद्र आणि अरबी समुद्राच्या परिसरात चाच्यांची दहशत पाहायला मिळत आहे. येथे व्यावसायिक जहाजांना लक्ष्य करण्यासाठी ड्रोन हल्ले केले जात आहेत. 7 ऑक्टोबर 2023 रोजी सुरू झालेल्या इस्त्रायल-हमास युद्धानंतर लाल समुद्रात इराण येमेनच्या हुथी बंडखोरांनी क्षेपणास्त्रे आणि ड्रोनद्वारे अनेक व्यापारी जहाजांना लक्ष्य केले आहे. यामुळे भारतीय आयएनएस सुमित्राने या भागात मोर्चा सांभाळला आहे. त्याला चांगले यश आले आहे.